सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १३ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १८४ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# आता पाकसोबत चर्चा केवळ दहशतवाद, व्याप्त काश्मीरवरच

## ● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा थेट इशारा ● सैन्य कारवाई तूर्त स्थगित केली

### 'ऑपरेशन सिंदूर' हेच आमचे धोरण

◆ **नवी दिल्ली, १२ मे**

ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाविरोधातील आमची नवी नीती आहे. भारताने संघर्ष थांबविण्यासाठी आमच्याकडे विनंती केली आहे. यापुढे दहशतवादी आणि लष्करी कारवाया केल्या जाणार नसल्याचे पाकिस्तानने याचना करताना सांगितले. पाकिस्तान भविष्यात कसा वागतो हे पाहिल्या जाईल. त्यामुळे आम्ही केवळ सध्या ऑपरेशन सिंदूर फक्त स्थगित केली आहे. पाकिस्तान सोबत यापुढे केवळ दहशतवाद आणि व्याप्त काश्मीरच चर्चा केली जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला ठणकावून सांगितले. मोदी यांनी सोमवारी रात्री आठ वाजता देशाला संबोधित करताना पाकिस्तानला स्पष्ट शब्दात सुनावले.

२२ एप्रिल रोजीचा पहलगाम हल्ला, ७ ते १० मे पर्यंत झालेल्या भारत-पाकिस्तान संघर्षावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रथमच सार्वजनिक भूमिका मांडली.

भाषणाच्या प्रारंभीच पंतप्रधानांनी तिन्ही



सेनादल, निमलष्करी दल आणि नागरिकांचे आभार मानले. मोदींचे आजचे भाषण म्हणजे पाकिस्तानबाबतची भविष्यातील भूमिका आणि रणनीती मानल्या जात आहे. दहशतवाद आणि लष्करी कारवायांबाबत स्पष्ट शब्दात पाकिस्तानला सुनावले आहे.

आमच्या भगिनींच्या कुंकवाला हात घालाल तर त्याचे किती भयंकर परिणाम होतात हे दहशतवादी आणि पाकिस्तानने अनुभवले आहे. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर हल्ला केल्यानंतर याचा बदला घेण्याची आणि दहशतवाद्यांना न भूतो न भविष्यती धडा शिकविण्याचा निर्णय भारताने घेतला आणि त्याची अमलबजावणी केल्याचे जगाने ७ मे च्या रात्री पाहिले. दहशतवाद्यांनी स्वप्नातही विचारही केला नसेल की भारत एवढा मोठा निर्णय घेईल. पण जेव्हा देश एकजूट असतो तेव्हा असे मोठे आणि पोलादी निर्णय घेतले जातात. ऑपरेशन सिंदूर राबवून भारताने भारताने दहशतवादी अड्ड्यांवर ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले करून ते नष्ट केले. बहावलपूर, मुदिरके ही दहशतवादाची केंद्र जी आम्ही जमीनदोस्त केली, असे पंतप्रधान म्हणाले.

भारताच्या कारवाईमुळे पाकिस्तान बिथरला आणि दहशतावादी कारवायांना पाठींबा देण्याऐवजी भारतावर हल्ला केला. त्याने मंदिर, मशिदी आणि नागरिकांच्या घरांवर हल्ले केले. पण, यामध्येही पाकिस्तान उघडा पडला. जगाने पाहिले की भारताने पाकिस्तानचे ड्रोन्स आणि क्षेपणास्त्र हवेतच हवेत नष्ट केले. भारताचे ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रांनी भयंकर हल्ले केले. पहिल्या तीन दिवसांमध्येच पाकिस्तानला एवढे बर्बाद केले की तो आपली कातडी वाचण्यासाठी रस्ते शोधू लागला. भारताची कारवाई पाहून याचना करू लागला. घाबरलेल्या पाकिस्तानच्या डीजीएमओनी १० तारखेला भारताला फोन केला. पण तोपर्यंत आम्ही दहशतवाद्दी अड्डे नष्ट केले. यापुढे दहशतवादी कारवाया आणि सैन्य कारवाई करणार नसल्याचे सांगितले. यावर आम्ही विचार केला, असे पंतप्रधान म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### शांततेसाठी शक्तिशाली असणे आवश्यक

आज बुद्ध पौर्णिमा आहे. भगवान गौतम बुद्ध यांनी शांतीचा मार्ग दाखविला. पण शांतता ही शक्तीच्या मार्गातून जाते. परिणामी नागरिकांना शांततेत जीवन जगायचे असेल तर भारत शक्तीशाली असणे आवश्यक आहे, असे म्हणत पंतप्रधानांनी पुन्हा एकदा भारतीय सेना, सशस्त्र दलांना आणि भारतीय नागरिकांना वंदन केले आणि आभार मानले. ■

### दहशतवाद आणि चर्चा, हे चालणार नाही

भारत पाकिस्तानच्या धमक्यांना भीक घालणार नाही. आम्ही जगाला सांगू इच्छितो की, यापुढे पाकिस्तानसोबत चर्चा होईल ती दहशतवाद आणि व्याप्त काश्मीरवरच. त्यामुळे दहशतवाद सुरू असताना चर्चा आणि व्यापार होणार नाही. पाणी आणि रक्त एकत्रपणे वाहणार नाही. यापुढे आम्ही आमच्या अटींवर चर्चा करू. कारण, आता दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्स हे आमचे धोरण आहे. ■

### आमची सेना अजूनही सज्ज

पाकिस्तानच्या विनंतीवर आम्ही विचार करून ऑपरेशन थांबविले. पण, मी स्पष्ट करू इच्छितो की आम्ही ऑपरेशन सिंदूर थांबविले नाही तर फक्त स्थगित केले आहे. आमची सेना सज्ज आहे. काही आगळीक केल्यास पुन्हा हल्ला चढवू, अशा इशारा पाकिस्तानला दिला आहे.

### दहशतवादाच्या हृदयावरच घाव

जगात अनेक वेळा दहशतवादी हल्ले झाले. या सर्वांचे तार पाकिस्तानातील केंद्राशी जुळलेले आढळले. त्यामुळी भारताने ही केंद्रच उडविली. या हल्ल्यात भारताने १०० पेक्षा जास्त दहशतवाद्यांना ठार केले. गेल्या तीन दशकांपासून पाकिस्ताना खुलेआम फिरणाऱ्या दहशतवाद्यांना एका झटक्यात खल्लास केले. आम्ही पाकिस्तानच्या हुदयावरच घाव घातल्याचे मोदी म्हणाले.

### आण्विक ब्लॅकमेल करणे खपवून घेणार नाही

यापुढे अण्वस्त्रांची भीती घालणे चालणार नाही. अणुबॉम्बची धमकी देऊन दहशतवाद्यांना आश्रय देणे मुळीच खपवून घेणार नाही.





'ऑपरेशन सिंदूर'विषयी माहिती देताना तीनही सेनादलांचे डीजीएमओ

# पुढील कारवाईसाठी लष्कर सज्ज

## 'ऑपरेशन सिंदूर'वर लष्कराचा खुलासा


**नवी दिल्ली, १२ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीनंतर सोमवारी पुन्हा लष्कराने पत्रकार परिषद घेतली. ऑपरेशन सिंदूरवर तिन्ही दलांच्या महासंचालकांनी पुढे येऊन अनेक नवीन खुलासे केले. यापूर्वी हवाई दलाने असेही म्हटले होते की त्यांनी कराची लष्करी तळालाही लक्ष्य केले होते.

भारतीय लष्कराने म्हटले आहे की त्यांनी एक चिनी क्षेपणास्त्रही पाडले. त्यांनी चीनमध्ये बनवलेल्या संभाव्य पीएल१५ हवेतून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राचे अवशेष प्रदर्शित केले आहेत, जे भारतावरील हल्ल्यादरम्यान पाकिस्तानने वापरले होते. पाक सैन्याने दहशतवाद्यांना पाठिंबा दिला. एअर मार्शल ए.के. भारती म्हणाले की, यावेळी पुन्हा एकदा आपण पाहिले की पाकिस्तानी सैन्याने दहशतवाद्यांना कसे पाठिंबा दिला. पाकिस्तानने दहशतवाद्यांसाठी भारतावर हल्ला करण्याचा पर्याय निवडला, ज्यामुळे आम्हाला प्रत्युत्तर द्यावे लागले. आमची लढाई पाकिस्तानी सैन्याविरुद्ध नाही तर दहशतवाद्यांशी आणि त्यांच्या समर्थन संरचनेविरुद्ध आहे. आमची शस्त्रे काळाच्या कसोटीवर खरी उतरली. आपली स्वदेशी हवाई संरक्षण प्रणाली आकाश चांगली काम करत आहे.

डीजीएमओ लेफ्टनंट राजीव घई म्हणाले की, गेल्या काही वर्षांत दहशतवादी कारवायांचे स्वरूप बदलले आहे. निष्पाप नागरिकांवर हल्ले होत होते. आमची सज्जता असून आम्ही पुढील कोणत्याही मोहिमेसाठी तयार आहोत. आमची लढाई दहशतवाद्यांशी आहे, पाकिस्तानी सैन्याशी नाही. आमचे उद्दिष्ट दहशतवाद्यांचा खात्मा करणे आहे, पाकिस्तानी सैन्याशी लढणे नाही. आमचे सर्व हवाई तळ पूर्वीप्रमाणेच पूर्णपणे कार्यरत आहेत, पाकिस्तानच्या पापांचा घडा भरला आहे. यामुळेच आम्ही दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांना लक्ष्य केल

## विचारपुष्प



आपली ही वैशिष्ट्यपूर्ण पद्धती कार्यान्वित करण्यास आणि ती योग्य रीतीने चालविण्यास आणि यातच विश्वाचे कल्याण आहे, हे दाखविण्यास एक स्वाभिमानपूर्ण, चैतन्यपूर्ण आणि बलसंपन्न तेजस्वी राष्ट्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. हे कार्य सर्वप्रथम करण्याची आणि शेवटपर्यंत निभावीत नेण्याची वस्तू आहे संघटना.

**- श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

## महत्त्वाचे

### आज दहावीचा निकाल

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर होणार आहे. दुपारी १ वाजता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर हा निकाल पाहता येईल. काही दिवसांपूर्वीच बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला होता. तेव्हापासूनच दहावीच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना निकालाची उत्सुकता लागली होती. ही प्रतीक्षा अखेर संपली आहे. मंगळवारी दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना बोर्डाच्या आणि अन्य संकेतस्थळांवर आपला निकाल पाहता येईल. त्यानंतर आपापल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येईल. यंदा दहावीच्या परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले होते. त्यात ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांचा समावेश होता. मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांकडून दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. बोर्डाची पत्रकार परिषद मंगळवारी सकाळी अकरा वाजता होणार आहे. त्यानंतर ऑनलाईन निकाल मंगळवारी दुपारी एक वाजता बोर्डाच्या संकेतस्थळावर जारी होतील.

**११ वीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार**

दहावीचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थी व पालकांना अकरावीच्या प्रवेशासाठी तयारी करावी लागते. यासाठी त्यांना आपल्या पसंतीच्या महाविद्यालयात अनेक फेऱ्या माराव्या लागतात. पण मंडळाने यंदा त्यांची ही गैरसोय टाळण्यासाठी अकरावीची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ■

# सोलापूर शहर व जिल्ह्यातील ६५ हजार विद्यार्थ्यांचे निकालाकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १२ मे**

दहावीच्या २१ फेब्रुवारी ते १७ मार्चपर्यंत झालेल्या परीक्षेचा निकाल आज सकाळी ११ वाजता ऑनलाईन लागणार असून निकालाकडे विद्यार्थ्यांच्या नजरा लागले आहेत. शहर व जिल्ह्यातून १८४ परीक्षा केंद्रातून ६५ हजार ५८५ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती.

२२ परीक्षा केंद्र संवेदनशील होते. त्यामुळे जिल्हा परीषद शिक्षण विभाग, महसूल व पोलीस प्रशासनाने कॉफीमुक्त परीक्षा अभियान राबविले होते. परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही, पर्यवेक्षकांच्या माध्यमातून ब्लॉकवर नजर ठेवण्यात आली होते. शिवाय ड्रोणद्वारे अनेक केंद्रावर लक्ष ठेवण्यात आल्याने परीक्षा शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडली होती. जिल्हा प्रशासनाच्या कॉपीमुक्त अभियानामुळे बारावी परीक्षेच्या निकालावर परीणाम झाला असून अनेक शाळांचा निकाल कमी लागला आहे. त्यामुळे दहावी परीक्षेच्या निकालाकडे पालकांसह विद्यार्थ्यांचे लक्ष राहीले आहे. दहावी निकालावर भविष्यातील शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार असल्याने निकालाकडे लक्ष लागले आहे.





सोलापूर : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त टिळक चौक येथे छावा ग्रुपच्या वतीने ऑपरेशन सिंदूरचा देखावा करण्यात आला आहे.



### विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती

**नवी दिल्ली :** भारताचा फलंदाज विराट कोहलीने सोमवारी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आणि आपल्या कसोटी क्रिकेटमधील भविष्याबद्दलच्या चर्चांना पूर्णविराम दिला. ३६ वर्षीय कोहलीने भारतासाठी १२३ कसोटी सामन्यांमध्ये ४६.८५ च्या सरासरीने ३० शतकांसह ९२३० धावा केल्या. तो आता केवळ एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळेल. तो गत वर्षी टी-२० सामन्यांमधून आधीच निवृत्त झाला आहे. माझ्यासाठी कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेणे सोपे नव्हते.

(सविस्तर वृत्त पान ६ वर)

# आ. सुभाष देशमुख आज करणार आंदोलन

## आश्वासन देऊनही पाणी सोडले नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, १२ मे**

दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सीना नदीकाठच्या शेतकऱ्यांनी पाण्याबाबत सिंचन भवन येथे ५ मे रोजी आंदोलन केले होते. त्यावेळी त्यांना १२ मे रोजी पाणी कुरुल शाखा कालव्यातून कि.मी. १४ मधून महादेव ओढा मार्गे सीना नदीत पाणी सोडण्याचे आश्वासन दिले होते. ते आश्वासन न पाळण्याने आपण स्वतः सिंचन भवन येथे मंगळवारी सकाळी ९ वाजता आंदोलन करणार असल्याचे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

पाणी नसल्याने तीव्र पाणी टंचाई आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा उद्रेक झाला आणि त्यांनी आंदोलन



केले. त्यावेळी आपण अधीक्षक अभियंत्यांना पाणी सूचना केल्या होत्या. त्यांनी १२ मे रोजी पाणी सोडणार असल्याचे लेखी दिले होते. त्या अनुषंगाने आज पाणी सोडणे अपेक्षित होते परंतु अद्याप पर्यंत सोडले नाही. त्यामुळे आपण मंगळवारी सकाळी ९ वाजलेपासून सिंचनभवन कार्यालयासमोर नदीकाठच्या शेतकऱ्यांसह धरणे आंदोलनास बसणार आहे, असे आ. देशमुख यांनी म्हटले आहे.

# शेअर बाजारात 'सुपर मंडे'

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तान दरम्यान युद्धबंदी करार झाल्यामुळे सोमवारी देशांतर्गत बाजार सुरू झाल्यापासून प्रचंड तेजीचा माहौल राहिला. निर्देशांक आणि निफ्टी मोठ्या वाढीसह उघडले आणि विक्रमी तेजी नोंदवत स्थिरावले. सोमवारी मुंबई बाजारातील निर्देशांक १००० अंकांनी वाढून ८०, ८०३.८० वर उघडला.

दुपारी पावणेतीन वाजता हा स्तर ८२ हजारांवर पोहोचला होता. दिवसअखेर निर्देशांक २९५० अंकांनी वाढून ८२,४२९ वर बंद झाला. त्यामुळे बाजारातील कारभाराचा हा 'सुपर मंडे' ठरला. राष्ट्रीय बाजाराचा निफ्टी दिवसअखेर ९१९ अंकांनी वाढून २४,९२७ वर बंद झाला. बाजारातील तेजीमागे जी कारणे होती त्यात भारतपाकिस्तानमधील युद्धविराम हे प्रमुख ठरले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# १७ मे पासून पुन्हा सुरू होणार; अंतिम सामना ३ जून रोजी

**मुंबई, दि.१२ मे**

१७ मे पासून आयपीएल पुन्हा सुरू होईल. लीग टप्प्यातील उर्वरित १३ सामने ६ ठिकाणी खेळवले जातील. प्लेऑफ स्टेज २९ मे पासून खेळवला जाईल आणि अंतिम सामना ३ जून रोजी होईल. बीसीसीआयने त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर ही माहिती दिली.

पाकिस्तान सोबतच्या तणावामुळे ९ मे रोजी आयपीएल स्थगित करावे लागले. देश सध्या युद्धाच्या स्थितीत आहे असे सांगून बीसीसीआयने स्पर्धा पुढे ढकलली होती. अशा परिस्थितीत क्रिकेट स्पर्धा आयोजित करणे योग्य नाही.

आरसीबी आणि एलएसजी यांच्यातील पहिला सामना १७ मे रोजी बंगळुरूमध्ये खेळला जाईल. उर्वरित सामने जयपूर, दिल्ली, लखनौ, मुंबई आणि अहमदाबाद येथे खेळवले जातील. लीग स्टेज २७ मे रोजी संपेल. रविवार, १८ आणि २५ मे रोजी २ डबल हेडर सामने खेळले जातील. म्हणजेच ११ दिवसांत १३ लीग स्टेज सामने होतील. ८ मे रोजी धर्मशाला येथे होणारा पंजाब आणि दिल्ली यांच्यातील सामना पाकिस्तानच्या हल्ल्यांमुळे थांबवावा लागला. हा सामना आता २४ मे रोजी जयपूर येथे खेळला जाईल. प्लेऑफ सामन्यांचे ठिकाण अद्याप निश्चित झालेले नाही. यापूर्वी, हैदराबाद आणि कोलकाता येथे २-२ प्लेऑफ सामने खेळवले जाणार होते.

# हा राष्ट्रीयतेची अनुभूती देणारा वर्ग

**● सहसरकार्यवाह आलोककुमार यांचे प्रतिपादन ● रा. स्व. संघ कार्यकर्ता विकास वर्ग- द्वितीय प्रारंभ**

**◆ नागपूर, १२ मे**

कार्यकर्ता विकास वर्ग- द्वितीय हा राष्ट्रीयतेची अनुभूती देणारा वर्ग आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सहसरकार्यवाह तसेच वर्गाचे पालक अधिकारी आलोककुमार यांनी केले.

रेशीमबागस्थित डॉ. हेडगेवार स्मृती भवन परिसरातील महर्षी व्यास सभागृहात आज सोमवारी सकाळी कार्यकर्ता विकास वर्ग- द्वितीय प्रारंभ झाला. उद्घाटन सोहळ्याप्रसंगी सहसरकार्यवाह तसेच वर्गाचे पालक अधिकारी आलोककुमार, सहसरकार्यवाह रामदत्त चक्रधर, वर्ग सर्वाधिकारी, पूर्व ओडिशा प्रांताचे संघचालक समीरकुमार मोहंती व्यासपीठावर होते. त्यांनी भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पार्पण केले.

देशभरातून आलेल्या शिक्षार्थींना आलोककुमार यांनी संबोधित केले. ते म्हणाले की, कार्यकर्ता विकास वर्ग- द्वितीय हा राष्ट्रीयतेची अनुभूती देणारा वर्ग आहे. येथे शिक्षार्थींना देशातील विविधतेचे दर्शन होते तसेच भारतात विविधता असली तरी मूळ विचार एकच आहे, याचादेखील अनुभव येईल. या वर्गातून सिद्ध कार्यकर्ता बाहेर पडतो. येथे सर्वांसाठी भगवा ध्वज हाच गुरू असतो. बुद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी या वर्गाची सुरुवात होत आहे. भगवान बुद्ध, गांधीजी व योग यांच्यामुळे जगात भारताची ओळख निर्माण झाली आहे. ठरावीक कालावधीत कार्यकर्त्यांचा विकास व्हावा आणि त्यांच्या माध्यमातून संघकार्याची ओळख व्हावी हाच या वर्गाचा उद्देश आहे.कार्यकर्ता क्रमशः विकसित होतो व त्यातूनच कार्यविस्ताराची गती वाढते. तामिळनाडू, केरळ व अनेक राज्यांत कार्यकर्त्यांना संघर्ष करावा लागला. परंतु तेथेदेखील संघटन वाढीस लागले. १९२७ मध्ये नागपुरात प्रशिक्षण वर्गाला सुरुवात झाली. त्यानंतर आता देशभरात शेकडो वर्ग दरवर्षी होतात. मात्र नागपूरच्या पवित्र मातीतच कार्यकर्ता विकास वर्ग द्वितीयचे आयोजन हे कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी असते. येथील संस्कार घेऊनच ते समाजात जातात, असे सहसरकार्यवाह आलोककुमार म्हणाले.

**वर्ग दृष्टिक्षेपात**

यंदाच्या वर्गात देशभरातील ८४० शिक्षार्थी सहभागी झाले आहेत. जम्मू-काश्मीरमधूनदेखील शिक्षार्थी वर्गात आले आहेत. या वर्गात संघाच्या प्रांत व क्षेत्र स्तरावरील वर्गात प्रशिक्षण घेतलेले ४० वर्षांपेक्षा कमी वयाचे स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या २५ दिवसांच्या वर्गाचा सार्वजनिक समारोप ५ जून रोजी होईल. या प्रशिक्षण वर्गात समाज जागरण व सामाजिक परिवर्तन याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.

◀(तभा वृत्तसेवा)




व्यासपीठावर विराजमान आलोककुमार, समीरकुमार मोहंती व रामदत्त चक्रधर. उजवीकडे वर्गात सहभागी देशभरातील शिक्षार्थी

## डॉ. हेडगेवार रक्तपेढीत रक्तदान शिबीर

**सोलापूर १२ मे -**

जागतिक थॅलेसिमिया दिनानिमित्त येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढीत ८ मे रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तपेढीचे नियमित रक्तदाते, संस्था, संघटना यांना अहवान केल्याप्रमाणे १९ जणांनी रक्तदान करून सहकार्य केले. तर १० मे रोजी आपल्या अवाहनाला प्रतिसाद देत वंचित बहुजन आघाडी शिक्षक संघटनेच्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. यावेळी ९ जणांनी रक्तदान केले. जागतिक थॅलेसिमिया दिनाचे औचित्य साधून बालक पालक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यवस्थापक रंगनाथ जोशी, जनसंपर्क अधिकारी संगीता कोरे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगावकर, श्रीकांत तुळजापूरकर, सुशांत कुलकर्णी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### बिरुदेव मंदिर परिसरात एका जावयाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा दि,१२ मे**

हुन्नूर येथील बिरुदेव मंदिराच्या परिसरात एका ३५ वर्षीय जावईबापूने अज्ञात कारणावरुन लिंबाच्या झाडाला गळफास दोरीच्या सहाय्याने घेण्याचा प्रकार घडला असून अमितकुमार महादेव चौगुले असे त्या आत्महत्या करणार्या जावईबापूचे नाव आहे. दरम्यान या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.पोलीस सुत्राकडून मिळालेली माहिती अशी, यातील खबर देणारे रामा शिंदे (रा. पडोळकरवाडी) यांची मुलगी सुनिता अमितकुमार चौगुले (रा.हुन्नूर) ही आजारी असल्याने औषधोपचाराकरिता आई वडिलाकडेच आली होती. दि.१२ मे रोजी सकाळी ७.३० वाजता खबर देणारे घरी असताना भैरु भोसले यांनी फोन करुन सांगितले की तुमचा जावई अमितकुमार चौगुले यांनी बिरुदेव मंदिराच्या गेटच्या आतील बाजूस लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतला आहे. असे सांगितल्यावर खबर देणारे त्यांनी सदर ठिकाणी जावून पाहणी केली असता जावयांनी दोरीने फास घेतल्याचे दिसून आले. याची पोलीसांना खबर दिल्यानंतर पोलीसांनी व तेथील लोकांनी सदरचे प्रेत खाली उतरवुन तपासणीसाठी मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात घेवून आले व डॉक्टरांनी मयत झाले असल्याचे खबरमध्ये म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### बुद्ध समजून घेणे काळाची गरज : डॉ. राहुल पालके

**बार्शी, दि. १२ मे-**

गौतम बुद्ध यांचे विचार व तत्वज्ञान कालातीत आहे. त्यांची चिरंतन तत्त्वे व जीवनकार्य समजून घेणे ही काळाची गरज आहे. त्यांचा ध्येयप्रवास बौद्ध धर्माचे सार प्रस्तुत करतो. सध्यकालीन स्थानिक, राष्ट्रीय व जागतिक पातळीवर गौतम बुध्दांचा विचार रुजवून बुद्ध समजून घेण्याची गरज आहे, असे विचार प्रा. डॉ. राहुल पालके यांनी बुद्ध जयंती दिनी व्यक्त केला. नवीन शैक्षणिक धोरणानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत बी.ए. १ मध्ये भारत ज्ञान प्रणाली हा विषय महाविद्यालयांत शिकविला जात आहे. हिंदू , जैन, सुफी व बौद्ध धर्माचे आकलन विद्यार्थ्यांना व्हावे अशी अपेक्षा आहे. पुढे बोलताना डॉ. पालके म्हणाले, भारतात विविध धर्म नांदतात. बौद्ध धर्माचा उदय भारतात झाला. बौद्ध धर्माचे संस्थापक गौतम बुद्ध यांना तथागत व शाक्यमुनी या नावानेही ओळखले जाते. बौद्ध धर्माचा प्रसार व प्रचार सम्राट अशोकाच्या काळात मोठ्या प्रमाणावर झाला. अशोकाची मुलगी संघमित्रा व मुलगा महेंद्र यांनी या बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी उपखंडात प्रवास केला. मानवतावादी, समतावादी, वैज्ञानिक अशा विविधांगी भूमिका मांडून या धर्मात प्रज्ञा,शील व करुणा या तत्वांची शिकवण आहे. राज्यघटनेच्या मूलभूत कर्तव्यांमध्ये या तत्वांचे अंतरंग दिसून येते. याच हेतूने विद्यार्थ्यांनी धर्माची चिकित्सा करून विवेकाधिष्ठित विचार अंगीकारणे गरजेचे आहे. समाजात धर्माधर्मामध्ये पसरत असलेला द्वेष नाहीसा करून निर्भयमुक्त समाजाची स्थापना हा उद्देशही असल्याचे त्यांनी नमूद केले. नालंदा विद्यापीठात बौद्ध धर्माचे शिक्षण दिले जात असे. डॉ. आंबेडकरांना त्यांचे गुरु कृष्णाजी केळुसकर यांनी बुद्ध एण्ड हिज धम्म हे पुस्तक भेट दिले होते. आंबेडकर गौतम बुद्धांना गुरुस्थानी मानत. बुध्दांनी सांगितलेली चार आर्यसत्य व अष्टांग मार्ग यातून मानवी जीवनाचे सार सांगितले आहे. बौद्ध धर्मात चार शाखा असून मैत्रेय बुद्धाबाबत त्यांनी गोषवारा मांडला.

### आता उरले झाडू मारण्यापुरते

**इस्लामाबाद, १२ मे**

पाकिस्तानचा एक अतिशय महत्त्वाचा एअर बेस सध्या बंद करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या युद्धविराम असला तरी, आधी झालेल्या हल्ल्यांमध्ये भारतीय सैन्याने पाकिस्तानची चांगलीच दाणादाण उडवली आहे. भारताने केलेल्या प्रत्युत्तरच्या हल्ल्यात पाकिस्तानच्या रहीम यार खान या महत्वाच्या लष्करी एअरबेसची धावपट्टी उद्ध्वस्त झाली आहे. या सर्व नुकसानीनंतर पाकिस्तानी सैन्य उद्ध्वस्त एअरबेसवरील कचरा उचलण्याच्या कामी रात्रंदिवस एक करत आहे. पाकिस्तानने हा एअरबेस एका आठवड्यासाठी बंद केल्याचे म्हटले जात आहे. पाकिस्तानी विमान वाहतूक विभागाने एक नोटीस जारी केली होती. या नोटीसमध्ये असे म्हटले आहे की, एअरबेसची मुख्य धावपट्टी १० ते १८ मेपर्यंत बंद राहील. सध्या या धावपट्टीवर काही काम सुरू आहे, म्हणून ती बंद करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. हे काम म्हणजे पाकिस्तानी सैन्य उद्ध्वस्त एअरबेसवरील कचरा उचलत आहे. भारतीय हवाई हल्ल्यात याचे इतके नुकसान झाले आहे की, नव्याने उभारणी करण्यात बराच काळलागणार आहे. कदाचित ते पूर्वीप्रमाणे कार्यरतही राहू शकणार नाही. यावरूनच लक्षात येत आहे की, भारतीय सैन्याने पाकिस्तानला चांगलेच प्रत्युत्तर दिले आहे. पाकिस्तानच्या महत्त्वाच्या धावपट्टीचे मोठे नुकसान झाल्यामुळेच आता दुरुस्तीसाठी ही धावपट्टी बंद ठेवण्यात आल्याचे बोलले जात आहे. (वृत्तसंस्था)

# थॅलेसिमिया मुक्तीसाठी विवाहपूर्व तपासणी आवश्यक : डॉ. ज्योती चिडगुपकर

**बालक पालक मेळावा, समुपदेशन, पोस्टर्स, बॅनर प्रदर्शनाने थॅलेसिमिया याबाबत जनजागृती**

**सोलापूर-( प्रतिनिधी)**

थॅलेसिमिया आई-वडिलांकडून मुलांना होणारा अनुवंशिक आजार आहे. आई वडील दोघेही थॅलेसिमिया कॅरिअर असतील तर होणारे मुल थॅलेसिमिया बाधित असण्याची शक्यता असते. म्हणून यावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विवाहपूर्वी दोघांची तपासणी आवश्यक आहे असे प्रतिपादन डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी केले.

जागतिक थॅलेसिमिया दिनाचे औचित्य साधून डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने बालक पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी रक्तविकार तज्ञ डॉ. संतोष खुबा, डॉ. सुमेधा कंदलगावकर, सचिन गुळग, रंगनाथ जोशी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी दृकश्राव्य माध्यम द्वारे थॅलेसिमिया ची संपूर्ण माहिती उपस्थितांना दिली.




यानंतर डॉ. संतोष खुबा यांनी आपण थॅलेसिमिया पूर्णपणे आपण नष्ट करू शकतो. फक्त योग्य वेळी निर्णय घेण्याची गरज असल्याचे सांगितले गरोदर मातेची तपासणी, युवक युवती युतींमध्ये जनजागृती याद्वारे आपण या आजाराबाबत माहिती दिल्यास युवकांमध्ये जागृती होईल. शाळा, महाविद्यालय, वधू वर- सूचक मंडळ या ठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रम व आरोग्य तपासणी केल्यास वेळीच प्रतिबंध करता येईल असे त्यांनी सांगितले. थॅलेसेमिया वर काम करणारे सहवेदना संघटनेचे अध्यक्ष सचिन गुळग यांनी सर्व स्तरावर जनजागृती करण्यासाठी पथनाट्य, प्रबोधनात्मक कार्यक्रम, तपासणी करणे गरजेचे आहे यासाठी च सहवेदना संघटना कार्यरत असल्याचे सांगितले. तसेच हा कार्यक्रम व्यापक पद्धतीने हाती घेऊन थॅलेसिमिया या मुक्तीसाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी केले. तर सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी संगीता कोरे यांनी व आभार मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगावकर यांनी मानले.

# जनावरांना क्रुरपणाची वागणूक; दोघांविरुध्द गुन्हा

### सांगलीच्या गोरक्षकांनी वाहन पकडून पोलीसांकडे दिले

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि,१२ मे -**

सांगोला बाजारातून मंगळवेढ्याकडे जनावरे घेवून जाणाऱ्या वाहनात जनावरांना क्रुरपणाची वागणूक देवून उपाशी पोटी ठेवून त्याच्या चारा पाण्याची व्यवस्था न केल्याप्रकरणी शिवराज यलाप्पा वलेकर (वय २९,रा.बागलकोट), महांतेश रामाप्पा तोळमट्टी (वय १९,रा.बागलकोट) या दोघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान सांगलीच्या गोरक्षकांना कत्तलखान्याकडे जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पाठलाग करुन मुक्या प्राण्यांचा जीव वाचवल्याने त्यांच्या कार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी साईनाथ बाळासो जाधव (रा. खानापूर जि.सांगली) हे अखिल भारत कृषी गो सेवा संघाचे रक्षक म्हणून २०१५ पासून कार्य करीत आहेत. दि.११ मे रोजी फिर्यादी व सागर शिरकांडे,नितीन तानाजी परीट,ओंकार सतिश त्रिगुणे, अनिकेत विलास फडतरे (सर्व कर्नाटक) आदी मंगळवेढा परिसरामध्ये कतलीसाठी अवैधरित्या जनावरांची वाहतूक करणार्या वाहनाबाबत गोपनीय माहिती मिळाल्याने ते सकाळी ९ च्या दरम्यान सांगोला सोलापूर हायवे रोडवर खोमनाळ नाका येथे आले असता त्यांना एका निळ्या रंगाच्या टाटा कंपनीच्या चार चाकी वाहन क्रमांक के.ए.२९ सी.३३०६ या गाडीचा संशय आल्याने वाहन थांबवून सर्व गोरक्षकाने पोलीसांची मदत घेवून वाहनाच्या मागील हौदावर चढून पाहणी केली असता त्यामध्ये तीन कोसा रंगाचे व काळे पांढरे रंगाचे बैल (खोंड) दाटीवाटीने भरलेले दिसले. त्यांच्या कोणत्याही आरोग्याची व चारापाण्याची सोय न करता घेवून जात असल्याच्या स्थितीत मिळून आले. जनावराकडे खरेदीची पावती विचारली असता ती दाखवली मात्र जनावरे वाहतूकीचा परवाना व जनावराचे मेडिकल सर्टिफिकेट त्यांच्याकडे काहीही नसल्याचे सांगितले. या गाडी मध्ये ४५ हजार रुपये किंमतीची कोसा रंगाचे बैल व ११ हजार रुपये किंमतीचे एक काळे पांढरे रंगाच्या बैलजोड्या सदर वाहनात मिळून आल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान ही तरुण खोंड कर्नाटकातील कत्तलखान्याकडे जात असल्याचा संशय गोरक्षकांनी व्यक्त केला आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# वाहन अपघातात एकाचा मृत्यू; चालकाविरुध्द गुन्हा

### उचेठाण मार्गावरील आपघात प्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१२ मे**

मंगळवेढ्याहून बाजार घेवून जाणाऱ्या एका मोटर सायकलस्वारास कंटेनरने जोराची धडक दिल्याने डोकीस मार लागून मोटर सायकलस्वार पांडुरंग नामदेव ठेंगील (वय ७७, रा.उचेठाण) यांचा मृत्यू झाला असून या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कंटेनर चालक सागर जयवंत निमंगरे (रा.पौट) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान मंगळवेढ्यात आज दिवसभरात तीन अपघात झाल्याचे वृत्त आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,



यातील फिर्यादी रुपाली बालाजी गडदे (वय ३३ वर्षे रा.उचेठाण) हिचे मयत वडिल पांडुरंग नामदेव ठेंगील (वय ७७) हे टी.व्हीएस. कंपनीच्या लुना मोटर सायकल (एम.एच.१३ डी.सी.२१५०) वरुन मंगळवेढ्यात खरेदी केलेला बाजार घेवून उचेठाण येथे जात असताना दामाजी कारखाना चौक येथे आल्यावर दि.१२ रोजी दुपारी १.५४ वाजता कंटेनर (एम.एच.४६ बी.यू.३२७६) वरील चालक तथा आरोपी सागर जयवंत निमंगरे याने आपल्या ताब्यातील कंटेनर रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने निष्काळजीपणे चालवून मयताच्या मोटर सायकलीस जोराची धडक देवून त्यांच्या मरणास कारणीभूत झाला असल्याची फिर्याद पोलीसात दाखल झाली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कांबळे करीत आहेत. दरम्यान सोमवारी दिवसभरात मंगळवेढ्यात विविध ठिकाणी तीन अपघात झाल्याचे वृत्त असून दिवसें दिवस अपघाताची मालिका संपता संपत नसल्याचे दिसून येत आहे. वाहन चालक वाहतूक नियमाचे पालन करीत नसल्यामुळे हे अपघात घडत आहेत. सध्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून लायसन हे एजंट मार्फत मिळत असल्याने त्यांना वाहतूकीच्या नियमांची कोणतीही जाण होत नसल्यामुळेच या अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप होत आहे. पुर्वी आरटीओ कार्यालयाकडून लायसन देताना वाहतूक नियमांची परीक्षा घेवून वाहतूकीचे सिग्नल समजावून सांगितले जात असे आता तसे होत नसल्यामुळेच चालक हे बेजबाबदारपणे वाहन चालविताना दिसून येत आहेत.

# पिलीवमध्ये माजी विदयार्थी स्नेहमेळावा; २० वर्षांनी एकत्र



पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयातील २००४-०५ च्या विदयार्थनचा स्नेह मेळावा.

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.१२ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात २००४-०५ मध्ये इयत्ता दहावीमध्ये शिकणारे माजी विदयार्थी तब्बल २० वर्षांनी एकत्र आले. आपल्या शालेय जिवनातील जुन्या आठवणींना यावेळी त्यांनी उजाळा दिला.

पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात २००४-०५ या वर्षी या विदयालयातुन शिकुन बाहेर पडलेल्या या विदयार्थ्यांनी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य कृष्णा रेडे होते. मेळाव्यास श्री.जगधने, ,सुनिल देशमुख, छगन मदने उपस्थित होते. डॉक्टर, बँक अधिकारी, एपीआय, फौजी ,पोलीस, व्यापारी, प्रगतशील बागायतदार, राजकारणात अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत या विद्यार्थ्यांनी एकत्रित येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी एपीआय अनिल लवटे यांनी वर्षातुन एकदा एकत्र येऊन सामाजिक कार्याची भावना जागृत ठेवू या असे आवाहन केले.

यावेळी डॉकटर तुषार गुळभिले,माजी सरपंच अमीत वगरे,सागर जेऊरकर, विनायक लेंगरे,अनुप देशमुख, गाटे ,सागर तुंगळे,संजय सुळे,नुतन राजमने, निशा कदम ,स्वाती जावळे - तरंगे,आश्वीनी करडे,रुपाली आर्वे, संध्या जावळे,सिमा देशमुख, क्षितीजा देशमुख, सरस्वती काळे,अनिसा बागवान, अपर्णा नष्टे,नागेश कोळेकर, तुषार जावळे,निलेश शिंदे,मदने,काळे,माळी ,सुळ,रजपुत,असिफ तांबोळी , अमित सरतापे यांच्यसह अनेक माजी विद्यार्थी या सदरच्या स्नेह मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नुतन राजमाने ,ओंकार गाटे ,रेडे सर,जगधने सर यांनी मनोगत व्यक्त केले. तर अमित वगरे यांनी आभार मानले.

## अंदाज हवामानाचा

सूर्य महाराजांनी ११ मे रोजी दुपारी १ वाजून १५ मिनिटांनी कृतिका नक्षत्रात प्रवेश केला. त्यावेळेस मंगळ-पुष्य नक्षत्रात बुधअश्विनी नक्षत्र, शुक्र-उत्तराभद्रपदा, गुरू महाराज मृग, शनी महाराज पूर्वभद्रपद नक्षत्रातून भ्रमण करीत आहेत. एकंदरीत ग्रह भ्रमण परिस्थिती बघता पूर्व मोसमी वाऱ्यांमुळे येणारा हा पाऊस महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, राजस्थान या राज्यांमध्ये पुष्कळ जास्त प्रमाणात पर्जन्य वृष्टी करीत आहे. तरी पण नैर्ऋत्य मोसमी वारे केरळच्या तटावर २१ मे रोजी दाखल होतील. पण, नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा प्रवास पुढे संथगतीने होईल. २७ मे रोजी कर्नाटक आणि गोव्यापर्यंत पाऊस पोहोचेल. त्यानंतर अचानक ३ जूननंतर पावसाची वाऱ्याची दिशा बदलेल व बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होण्यास सुरुवात होईल त्यामुळे हे वारे बंगालच्या उपसागराकडे वळतील व तामिळनाडूत पाऊस जास्त प्रमाणात होईल. एकंदरीत मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर पाऊस उशिरा ८ जूननंतर पोहोचेल.

**- डॉ. मुकुंद मोहोळकर**

# शेतकऱ्यांचे मोहोळ तहसीलसमोर धरणे; आंदोलक अन अधिकारी यांच्यात बाचाबाची

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१२ मे-**

वटवटे, जामगाव खुर्द, जामगाव बु येथील शेतकऱ्यांना कॅनॉलचे पाणी यंदा मिळाले नाही. पाठपुरावा करूनही त्याची दखल घेतली गेली नाही म्हणून तेथील शेतकऱ्यांनी मोहोळ तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले. सद्यस्थितीत पाणी देणे शक्य होणार नाही. धरणे आंदोलन स्थगित करावे असे पत्र आंदोलकांना दिल्याने आंदोलक अधिकच चिडले. त्यामुळे आंदोलक आणि पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांच्यात थोडी बाचाबाची झाली.

यावेळी आमच्या हक्काचं व आमच्या वाट्याचं पाणी आम्हाला मिळाले पाहिजे. नाहीतर आम्ही कॅनॉल फोडू असे संतप्त विधान राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते संजय क्षीरसागर यांनी केले. यावेळी 'पाणी आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं' अशी घोषणाबाजी करत आंदोलन झाले. आंदोलनस्थळी भीमा पाटबंधारे उपविभागाचे अधिकारी मो.ब.कादे आले होते. उजनीतील पाण्याच्या परिस्थितीनुसार घोडेश्वर शाखा कालव्यावरील सर्वांना पाणी देणे शक्य नाही, कालावधी कमी आहे, कमी काळात जास्त क्षेत्र भिजवण्यासाठी आवर्तन आटोपते घेण्याशिवाय पर्याय नव्हता. काही शेतकऱ्यांना ५ ते ७ मे या कालावधीत वेगवेगळ्या वेळेत शेतीसाठी पाणी देण्यात आले आहे. काही शेतकरी वंचित राहिले आहेत. आम्हाला पाणी मिळाल्याशिवाय माघार घेणार नाही, दोन दिवसात पाणी न सोडल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. आमच्या रक्ताचे पाट वाहिले तरी चालेल परंतु आम्हाला आमच्या हक्काचं पाणी मिळालेच पाहिजे अशी भूमीका आंदोलकांनी घेतली. या आंदोलनात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते संजय क्षिरसागर ,जकराया शुगरचे संस्थापक ॲड. एम. एन. जाधव, बिरुदेव होनमने, कपिल कांबळे, जब्बार पटेल, कृष्णदेव काकडे, सोन्यापा गावडे, राहुल गावडे, समाधान गावडे, सुधाकर पाटील, आण्णा कांबळे, सायबू गायकवाड, भैय्यासाहेब आतार, देवाभाऊ मडके, बिरदेव कोकरे आदीसह शेतकरी सहभागी झाले होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# उत्तर प्रदेशातील ३५० हून अधिक मशिदी, मदरशांवर बुलडोझर

## सर्व ठिकाणी बेकायदेशीर बांधकाम झाल्याचे आढळले

◆ **लखनऊ, १२ मे**

उत्तर प्रदेश सरकारने नेपाळच्या सीमेला लागून असलेल्या भागात बुलडोझर कारवाई केली. येथे ३५० हून अधिक बेकायदेशीर धार्मिक स्थळांची यादी तयार करण्यात आली, ज्यावर बुलडोझर चालवण्यात आला. उत्तर प्रदेश सरकारने बुलडोझर वापरलेल्या जिल्ह्यांमध्ये श्रावस्ती, बहराइच, सिद्धार्थनगर, महाराजगंज, पिलीभीत, बलरामपूर आणि लखीमपूर खेरी यांचा समावेश आहे.

एकट्या श्रावस्तीमध्ये १०० हून अधिक बेकायदेशीर बांधकामे आढळून आली आहेत. सर्वाधिक बांधकामे श्रावस्तीमध्ये होती, जिथे जिल्हा प्रशासनाने १० आणि ११ मे रोजी बुलडोझरचा वापर केला होता. अहवालानुसार, येथे १०४ मदरसे, एक मशीद, पाच मजार आणि दोन ईदगाह बेकायदेशीर घोषित करण्यात आले होते. प्रशासनाचे म्हणणे आहे की खाजगी जमिनीवर दोन इमारती बांधल्या गेल्या होत्या. यासाठी परवानगी घेण्यात आली नव्हती. अशा मदरशांना सील करण्यात आले आहे. पुढील कारवाई अजूनही सुरू आहे. बहराइचमध्ये १७० हून अधिक बांधकामांवर बुलडोझरचा वापर करण्यात आला. यामध्ये १३ मदरसे, आठ मशिदी, दोन मजार आणि एक ईदगाह यांचा समावेश होता. हे सरकारी जमिनीवर बांधले गेले होते. या सर्वांपैकी पाच सील करण्यात आले आहेत आणि ११ पाडण्यात आले आहेत.

सिद्धार्थनगरमध्ये २३ बांधकामांपैकी चार मशिदी, १८ मदरसे आणि एक बांधकाम बेकायदेशीरपणे बांधले गेले होते. सध्या, २० तारखेला नोटीस बजावल्यानंतर, पाच मदरसे सील करण्यात आले आहेत. त्याच वेळी, ९ मदरशांवर बुलडोझर चालवण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)



### कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई

गुन्हेगार अथवा दोषी असल्याचे सिद्ध झाले तरी एखाद्याचे घर पाडणे हे बेकायदेशीर असून संबंधित अधिकारी आणि प्रशासकीय यंत्रणेविरूद्ध कारवाई करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यामुळे उत्तर प्रदेश प्रशासनाने संबंधित बांधकामाविषयी संपूर्ण माहिती घेऊन परवानगी न घेतलेल्या बांधकामाची यादी तयार करण्याची आणि नोटीस पाठविण्याचे निर्देश उत्तर प्रदेश सरकारने दिले आहे.

## मणिपूरमध्ये तीन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, १२ मे**

मणिपूरमध्ये खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपाखाली सुरक्षा दलांनी दोन प्रतिबंधित संघटनांच्या तीन बंडखोरांना अटक केली आहे, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

रविवारी इंफाळ पूर्व जिल्ह्यातील पोरोमपत डीसी रोड येथून बंदी घातलेल्या प्रेपाक संघटनेच्या एका सक्रिय कार्यकर्त्याला अटक करण्यात आली. हा बंडखोर विविध दुकाने, सरकारी अधिकारी आणि आस्थापनांमधून पैसे उकळण्यात सहभागी होता. त्याच्या ताब्यातून नऊ मागणी पत्रे जप्त करण्यात आली आहेत. पोलिसांनी रविवारी इंफाळ पूर्व जिल्ह्यातील खुराई येथून प्रतिबंधित कांगलेईपाक कम्युनिस्ट पक्षाच्या एका सदस्यालाही अटक केली.

इम्फाळ परिसरातील विविध इंधन भरण्याच्या स्टेशनवरून तो थेट खंडणीत सहभागी होता. ◂(वृत्तसंस्था)



घर पाहावे बांधून अन् लग्न पाहावे करून, अशी म्हण मानवासाठी आहे. पण, पक्ष्यांसाठीही घर पाहावे बांधून.. ही म्हण लागू होते, असे म्हणावे लागेल. पावसाळा जवळ येत असल्याने घरटे बांधण्यासाठी साहित्याची जमवाजमव करताना बगळा.

## ट्रक-दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

◆ **ठाणे, १२ मे**

महाराष्ट्रातील ठाणे शहरात एका ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला, असे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. रविवारी रात्री १० वाजताच्या सुमारास कापूरबावडी पुलाजवळ हा अपघात घडला.

ट्रकचे नियंत्रण सुटले आणि तो एका स्कूटरला धडकला. यामुळे स्वार जागीच मृत्युमुखी पडला, असे नागरी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यासीन तडवी यांनी सांगितले. पोलिस, शहर वाहतूक पोलिस आणि आपत्कालीन रुग्णवाहिकेचे कर्मचारी घटनास्थळी रवाना झाले आणि त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. ट्रक चालकाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# ‘उठ जा यार’... हुतात्मा जवानाच्या पत्नीचा हृदयद्रावक निरोप!

## जवान सुरेंद्र कुमार यांच्यावर अन्त्यसंस्कार

◆ **झुंझुनू, १२ मे**

देशाच्या रक्षणासाठी सीमेवर जाणाऱ्या जवानासाठी प्रत्येक नागरिकाचे उर अभिमानाने भरून येते. याच जवानांना जेव्हा वीर मरण येते देशातील प्रत्येक नागरिकाच्या डोळ्यात अश्रू तरळते. देशवासियांची जर ही अवस्था असेल तर त्यांच्या घरच्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पना न केलेली बरी.

राजस्थानातील झुंझुनू जिल्ह्यातील रहिवासी असलेले भारतीय हवाई दलाचे जवान सुरेंद्र कुमार पाकिस्तानने केलेल्या हल्ल्यात देशासाठी हुतात्मा झाले. त्यांचे पार्थिव गावात आणताच संपूर्ण परिसरात शोकाकुल वातावरण पसरले होते, पण सर्वात हृदयस्पर्शी क्षण तेव्हा होता जेव्हा हुतात्मा पतीच्या शवपेटीजवळ बसलेली त्याची पत्नी रडत म्हणाली, ‘प्लीज उठ जा यार...

पत्नीच्या या भावनिक आक्रोशाने सर्वांचे हृदय पिळवटून निघाले. त्याचे दुःख शब्दात व्यक्त करणे केवळ अशक्य आहे. तिने कधी स्वप्नातही कल्पना केली नसेल की तिला अशा प्रकारे तिच्या जोडीदाराला अंतिम निरोप द्यावा लागेल. तू लवकरच परत येशील असे वचन दिले होतेस, आता मी कसे जगू? त्यांच्या पत्नीच्या या दयनीय रडण्याने देशातील प्रत्येक नागरिकाला हादरवून टाकले. डोळ्यात अश्रू आणि मनात अभिमान घेऊन तिने तिच्या पतीला शेवटचा सलाम केला. संपूर्ण गाव त्या शूर सैनिकाच्या हौतात्म्याबद्दल शोक व्यक्त करत होते.

भारत माता की जय आणि सुरेंद्र कुमार अमर रहेंच्या घोषणांनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### बालपणापासूनच लष्कराची ओढ

सुरेंद्र कुमारला लहानपणापासूनच सैन्यात भरती व्हायचे होते आणि देशासाठी काहीतरी करण्याचे त्याचे स्वप्न होते. आपले स्वप्न पूर्ण करताना हुतात्मा झाले, असे गावकरी आणि कुटुंबातील सदस्यांनी सांगितले. या हल्ल्यामुळे देशाचा आणखी एक शूर सैनिक हिरावून घेतला. सुरेंद्र कुमार सारख्या नायकांमुळेच आपला देश सुरक्षित आहे. त्यांचे हौतात्म्य नेहमीच लक्षात राहील. देश अशा शूर पुत्रांना कधीही विसरू शकत नाही. हे केवळ एका कुटुंबाचे दुःख नाही तर संपूर्ण देशाचे दुःख आहे.





# ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये इस्रोचा प्रवेश

## ● पाकिस्तानच्या अवकाशावर दहा उपग्रहांची नजर ● प्रत्येक हालचाल टिपणार

◆ **नवी दिल्ली, १२ मे**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध थांबले असले तरी भारत आता पाकिस्तानवर आकाशातून लक्ष ठेवून आहे. भारताचे दहा उपग्रह सध्या पाकिस्तानच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत, अशी माहिती इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी एका कार्यक्रमातून दिली आहे.

भारताच्या सीमा भागातील प्रत्येक नागरिक सुरक्षित असल्याची खात्री इस्रोच्या अध्यक्षांनी दिली आहे. केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या एका कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत किमान १०० दहशतवादी आणि पाकिस्तानचे ३५-४० सैनिक मारले गेले. भारत पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर २४ तासांनी तिन्ही सैन्यदलाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन चार दिवस चाललेल्या माहितमेची माहिती दिली. त्यानंतर आता पाकिस्तानकडून होणारे हल्ले थांबले असले तरी भारताकडून पाकिस्तानवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन म्हणाले, देशातील नागरिकांची सुरक्षा आणि सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या धोरणात्मक उद्देशाने किमान १० उपग्रह सतत चोवीस तास कार्यरत आहेत. तुम्हाला सर्वांना आपल्या शेजाऱ्यांबद्दल माहिती आहे. जर आपल्याला देशाची सुरक्षा सुनिश्चित करायची असेल तर आपल्या उपग्रहांद्वारे सेवा द्यावी लागेल. आपल्याला आपल्या ७००० किमी समुद्रकिनाऱ्यावरील भागांचे निरीक्षण करावे लागेल. संपूर्ण उत्तर भागाचे सतत निरीक्षण करावे लागेल. उपग्रह आणि ड्रोन तंत्रज्ञानाशिवाय आपण ते साध्य करू शकत नाही. ◂(वृत्तसंस्था)

# दहशतवाद्याच्या मृतदेहासमोर लष्कराच्या उपस्थितीत कलमा वाचला

## ● पाकिस्तान तोंडावर आपटला ● मृत व्यक्ती निष्पाप असल्याचा दावा

◆ **नवी दिल्ली, १२ मे**

ऑपरेशन सिंदूरअंतर्गत भारताने मुरिदकेवर मारा केल्यावर लष्कर ए तोयबाच्या दहशतवाद्याच्या अन्त्ययात्रेला पाकिस्तानी लष्कराचे अधिकारी उपस्थित होते. जनाजाला लष्करचा कमांडर हाफिज अब्दुल रौफ कलमा पढताना दिसला होता. मात्र, पाकिस्तानने तो दहशतवादी नसून एक राजकीय नेता असल्याची बतावणी केली. भारताने पुरावा सादर केल्यावर पाकिस्तानने घाईघाईत एक फोटो आयडी आणि कागदपत्रे दाखवत तो नेता असल्याचे म्हटले.



पाकिस्तानने सादर केलेले ओळखपत्र हे नेमके अमेरिकेने जाहीर केलेल्या कुख्यात गुन्हेगार आणि दहशतवाद्यांच्या यादीत आहे. अमेरिकेने बंदी घातलेल्या एका दहशतवाद्याचे हे पाकिस्तानी नागरिकत्व सिद्ध करणारे ओळखपत्र होते आणि विशेष म्हणजे अमेरिकेच्या यादीतही या ओळखपत्रातील व्यक्ती आहे कुख्यात दहशतवादी हाफिज अब्दुल रौफ. रौफची ओळख सिद्ध झाल्याने पाकिस्तान पुरता तोंडावर आपटला आहे.

पाकिस्तानी लष्कराचे प्रमुख प्रवक्ते लेफ्टनंट जनरल अहमद शरीफ चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की रौफ हा एक निष्पाप कुटुंबातील सदस्य होता.त्याचा दहशतवादाशी काहीही संबंध नाही. त्यांनी रौफची ओळख पटवणारी माहिती पुरावा म्हणून दाखवली होती. मात्र, असे करताना, त्यांनी रौफ खरोखरच लष्कर-ए-तोयबाचा दहशतवादी असल्याचा ठोस पुरावा दिला, आणि भारताच्या दाव्याची पुष्टी झाली. ◂(वृत्तसंस्था)

## कोडीन जप्त, वैद्यकीय विक्री प्रतिनिधीला अटक

◆ **ठाणे, १२ मे**

महाराष्ट्रातील ठाणे शहरात दोन कोटी रुपयांचे कोडीन पावडर बाळगल्याच्या आरोपाखाली राजस्थानमधील एका वैद्यकीय विक्री प्रतिनिधीला अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

गुप्त माहितीच्या आधारे, अमली पदार्थ विरोधी पथकाने ९ मे रोजी ठाणे रेल्वे स्थानकाजवळील एका हॉटेलवर छापा टाकला आणि आरोपी सुरेश परमार याला अटक केली. पथकाला एक किलोपेक्षा जास्त कोडीन, पावडर स्वरूपात सापडले, ते जोधपूरहून कुरिअर सेवेद्वारे वैद्यकीय विक्री प्रतिनिधी परमार यांच्या ताब्यात आले. जप्त केलेल्या अवैध पदार्थाची किंमत दोन कोटी रुपयांची होती, असे त्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# संरक्षण दलांसोबत राज्य सरकार अधिक समन्वयाने काम करणार : देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ मे :**

पाकिस्तान बरोबरच्या तणावपूर्ण देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

त्यासाठी येणार्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करुया, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले

भारत आणि पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात एक महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेत वर्षा निवासस्थानी झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सुद्धा उपस्थित होते. भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चड्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर



नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन हे बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची यावर प्रामुख्याने चर्चा या बैठकीत झाली. संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर चर्चा झाली. यावेळी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदुर राबविले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्युट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्वपूर्ण आहे. भारताची आर्थिक राजधानी आहे. यापूर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणार्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. असे केले.

बैठकीला राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री सचिवालयातील सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, आदी उपस्थित होते.

# भविष्यातील घातक शस्त्र ठरेल ब्रह्मोस-२

## हायपरसोनिक ग्लाईड व्हेईकलवरही काम सुरू

### वेग, अचूकता आणि शत्रूला चकविण्याची क्षमता

**ब्रह्मोस-२ आणि हायपरसोनिक ग्लाइड व्हेईकल क्षेपणास्त्र ही भारताची भविष्यातील शस्त्रे आहेत. त्यांच्या वेग, अचूकता आणि रडार-चुकवण्याच्या क्षमतेमुळे पाकिस्तान आणि चीनसारख्या प्रतिस्पर्ध्यांसाठी मोठा धोका निर्माण करतील. ही शस्त्रे केवळ भारताचे अभेद्य कवचच नव्हे तर जागतिक संरक्षण बाजारपेठेत भारत एक प्रमुख देश म्हणून उदयास येणार आहे.**





### हायपरसोनिक ग्लाईड व्हेईकल (एचजीपी) :

हायपरसोनिक ग्लाईड व्हेईकल हे अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे. एचजीपी वेगाने म्हणजे ध्वनीच्या वेगापेक्षा ५ पट जास्त उड्डाण करते. तसेच स्टेल्थ तंत्रज्ञानामुळे हल्ला करताना त्याचा शत्रूला पत्ताही लागणार नाही. कुठल्याही प्रकारच्या रडारला चुकवून अचूक लक्ष्यभेद करते.

### वैशिष्ट्ये

**वेग :** एचएसटीडीव्ही अंदाजे ७,४०० ते १४,८०० किमी प्रति तास वेग गाठू शकते. परिणामी शत्रूला प्रतिहल्ला करण्यास वेळच मिळत नाही.
**मारक क्षमता :** रेंज १,५०० ते २,००० किलोमीटरपर्यंत असू शकते. ज्याच्या टप्प्यात संपूर्ण पाकिस्तान आणि चीनचा मोठा भूभाग येणार आहे.



### आकाशातच दिशा बदलण्याची क्षमता

हायपरसोनिक ग्लाईड व्हेईकल हे उड्डाणादरम्यान दिशा बदलू शकते, ज्यामुळे त्याला रोखणे जवळजवळ अशक्य होते.

### पेलोड

हे पारंपरिक आणि अण्वस्त्रे दोन्ही वाहून नेण्यास सक्षम आहे. यामुळे ते धोरणात्मक आणि सामरिक दृष्टीने भारतासाठी अत्यंत महत्वाचे ठरणार आहे.

### स्क्रॅमजेट इंजिन

एचएसटीडीव्ही हे स्क्रॅमजेट म्हणजे सुपरसॉनिक कम्बशन रॅमजेट तंत्रज्ञानावर आधारित आहे. जे त्याला हायपरसॉनिक वेगाने लांब अंतरापर्यंत उडण्याची शक्ती प्रदान करते.

# मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट

## देशात मुसळधार पावसाची शक्यता

**पुणे, १२ मे**

भारतीय हवामान विभागाने देशातील विविध भागांमध्ये पुढील काही दिवसांमध्ये वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाट होईल, असा हवामान स्थितीचा इशारा दिला आहे.

यामध्ये निकोबार द्वीपसमूह, त्रिपुरा, उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम यांसारख्या प्रदेशात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या पावसामुळे स्थानिक जनजीवनावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, तसेच पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या उप-हिमालयीन भागांमध्ये देखील वादळ, विजांच्या कडकडाटासह ताशी ५0 ते ६0 किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. यामुळे शेती, वाहतूक यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अंदमान आणि निकोबार येथे काही भागांत ताशी ३0 ते ४0 किमी वेगाने जोरदार वारे, विजांचा कडकडाट आणि पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पृष्ठभूमीवर स्थानिक प्रशासन आणि नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आलेला आहे.



**हवामान विभागाचा इशारा**
**यलो अलर्ट :** मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, परभणी, जालना, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार जिल्हे.

## इंदूर स्टेडियमला पुन्हा बॉम्बने उडवण्याचा ईमेल

**इंदूर :** सोमवारी मध्य प्रदेशातील इंदूरमधील होळकर स्टेडियममध्ये बॉम्बस्फोटाची धम की मिळाल्यानंतर लोकांना बाहेर काढण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. गेल्या तीन दिवसांत स्टेडियममध्ये बॉम्बस्फोटाची धमकी मिळण्याची ही दुसरी वेळ आहे. आम्हाला मध्य प्रदेश क्रिकेट असोसिएशन कार्यालयाकडून होळकर स्टेडियम उडवून देण्याची धमकी देणारा ईमेल मिळाल्याची माहिती मिळाली आहे.

लोकांना स्टेडियममधून बाहेर काढण्यात आले आणि बॉम्बशोधक पथक परिसराची तपासणी करत आहे. तुकोगंज पोलिस स्टेशनचे प्रभारी जितेंद्र सिंह यादव यांनी सांगितले. एमपीसीएला ९ मे रोजी असाच ईमेल मिळाला होता, परंतु तो खोटा असल्याचे निष्पन्न झाले. गेल्या काही महिन्यांत इंदूर विमानतळ, बँक शाखा, रुग्णालये, शाळा बॉम्बस्फोटाने उडवून देण्याची धमकी देणारे बनावट ईमेल मिळाले आणि एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अग्रलेख...

# अब रण होगा!

पहलगाममध्ये पर्यटकांवर क्रूर हल्ला करून २६ निष्पापांचे बळी घेण्याच्या पापात पाकिस्तानचा सहभाग असल्याचा स्पष्ट ठपका ठेवत दहशतवाद्यांच्या नांग्या ठेचण्याकरिता भारताकडून तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची चिन्हे स्पष्ट होऊ लागली, तसतशी येथील मानवतावाद्यांची मने कळवळू लागली. युद्धाने कोणाचेच भले होत नसते, असा सूर आळविला जाऊ लागला. भारताने युद्ध पुकारले नसून पकिस्तानी हल्ल्याच्या प्रतिकाराची मर्यादितच भूमिका घेत केवळ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करणे हेच उद्दिष्ट असल्याचे जाहीर केल्यानंतरही, गेल्या १० तारखेस पाकिस्तानच्या प्रस्तावानुसार युद्ध थांबविण्याचा निर्णय भारताने जाहीर करताच, त्या क्षणापर्यंत भारतावर युद्धखोरीचा ठपका ठेवणारी तोंडे अचानक विरुद्ध बाजूला वळली आणि वस्तुस्थितीची पूर्ण माहिती असूनही भारताच्या शस्त्रसंधीच्या पवित्र्याविरोधात बोटे मोडण्यास सुरुवात झाली. असा दुटप्पीपणा जेव्हा दिसतो, तेव्हा जनतेच्या मनात सरकारच्या आणि सैन्यदलांच्या क्षमतेबाबत संभ्रम पसरविण्याचाच तो थेट प्रयत्न असतो असे मानावयास हरकत नाही. पाकिस्तानी सैन्याकडून भारतावर सुरू झालेल्या गोळीबाराच्या आणि क्षेपणास्त्र माऱ्याचा मुकाबला करून त्यांचे आक्रमण थोपविण्याच्या जोरदार प्रत्युत्तराने पाकिस्तानचे कंबरडे मोडले, अस्तित्वभयाची तीव्र जाणीव सतावू लागल्यावर जगासमोर बचावाच्या याचनेसाठी हात पसरण्याची वेळ पाकिस्तानवर आली आणि भारताला डिवचल्याचे भयानक परिणाम पाकिस्तानला आणि कदाचित संपूर्ण जगालादेखील भोगावे लागतील याची जाणीव झालेल्या अमेरिकेने आगंतुकपणे युद्धविरामाची घोषणादेखील करून टाकली. गेल्या दोन-तीन दिवसांतील या घडामोडींमागचे वास्तव एव्हाना स्पष्टपणे उघड झाले आहे. गेल्या १० मे रोजी दुपारी साडेतीन वाजता पाकिस्तानी लष्कराच्या महासंचालकाने भारतीय लष्कराच्या महासंचालकांशी तातडीचा संपर्क साधला आणि दोन्ही बाजूंच्या लष्करी कारवाया थाबविण्याचा निर्णय झाला. खरे म्हणजे, भारताच्या लष्कराने सुरू केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेचा तो पहिला दणदणीत विजय होता, पण ज्या तोंडांनी त्याआधी 'युद्ध नको' असा घोशा लावला होता, त्यांनीच या निर्णयानंतर भारत सरकारच्या निर्णयावर, लष्कराच्या क्षमतेवर शंका घेत बेबंद तोंडसुख घेण्यास सुरुवात केली. प्रत्यक्षात लष्करी कारवाई थांबविण्याच्या पाकिस्तानच्या त्या प्रस्तावासही भारताने सशर्त संमती दिली होती आणि या दरम्यान कोणतीही आगळिक झालीच तर ते भारताविरोधातील युद्ध असल्याचे मानून सडतोड प्रत्युत्तर दिले जाईल, असेही त्याच वेळी भारताने स्पष्ट केले होते, ही बाब या दुतोंडी जमातीस चांगलीच माहीत असतानाही संभ्रम पसरविण्याची सुवर्णसंधी समजूनच गळे काढण्याचा कांगावा सुरू झाला होता. पण हे सोंगही त्यांना फार काळ टिकविता आले नाही. युद्ध थांबविण्याचा निर्णय होऊन काही तास उलटण्याच्या आधीच पाकिस्तानकडून भारतीय सीमेवरील अनेक नागरी वस्त्यांवर गोळीबार, क्षेपणास्त्रांचा मारा सुरू झाला आणि भारताने युद्ध थांबविण्यास संमती देताना घातलेल्या अटींचा अधिकार वापरत पुन्हा एकदा जोरदार प्रत्युत्तर देत पाकिस्तानला खिळखिळे करून टाकले.

भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी कारवाई महासंचालकांमधील चर्चेची दुसरी फेरी सोमवारी पार पडली आहे. पाकिस्तान हे विश्वासघातकी राष्ट्र आहे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करण्याची या देशाची नियत नाही आणि अगोदर कबूल केलेल्या कोणत्याही बाबीचे पालन करण्याचा प्रामाणिकपणाही या देशाच्या नेतृत्वाकडे नाही, हे गेल्या पाऊणशे वर्षांपासून सातत्याने भारताने अनुभवलेले असतानाही, केवळ आंतरराष्ट्रीय नीतीचे पालन करण्याच्या प्रामाणिक हेतूपोटी भारताने १० मे रोजी पाकिस्तानच्या त्या प्रस्तावाचा स्वीकार केला होता. प्रत्यक्षात तो निर्णय म्हणजे युद्धबंदी किंवा युद्धविराम नव्हताच, तर केवळ परस्परांविरोधात शस्त्रे न चालविण्याच्या प्रस्तावास संमती होती हेही भारताने स्पष्ट केले होते. त्याखेरीज, भारताची लष्करी कारवाई म्हणजे पाकिस्तानी लष्कराविरोधात किंवा तेथील सामान्य जनतेच्या विरोधात नसून पाकिस्तानच्या आश्रयाने भारतविरोधी कारवाया करणाऱ्या दहशतवाद्यांचे कंबरडे मोडून त्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यापुरतीच मर्यादित आहे, हे भारताने वारंवार जगाला समजावून सांगितलेले असल्याने, भारताच्या बाजूने झालेली लष्करी कारवाई हे तर केवळ पाकिस्तानच्या लष्करी आगळिकीला प्रत्युत्तर होते, हेही स्पष्ट झाले होते.

एखादे अंतःकरण भूतदयेने कितीही ओथंबलेले असले, तरी पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त झाला पाहिजे यावर कोणाचेच दुमत नसते. पाकिस्तानच्या संदर्भात सध्या भारताच्या बहुसंख्य जनतेची हीच मानसिकता आहे. या उपद्रवी देशाचा कायमचा बंदोबस्त करण्याची वेळ त्यांनी स्वतःहूनच ओढवून घेतली असून आपल्या सातत्यपूर्ण आगळिकीने भारतास वारंवार त्यासाठी आमंत्रणच दिले असल्याने ही संधी भारत गमावणार नाहीच, पण या संधीच्या निमित्ताने पाकिस्तानकडून येणे असलेले जुने हिशेबदेखील पूर्ण करण्याची तयारी आता भारताकडून सुरू झाली आहे. युद्ध ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी बाब नसते. येत्या काही दिवसांत जेव्हा पाकिस्तान पुरता कंगाल झालेला असेल, तेव्हा भविष्यकाळाने त्या देशाच्या अस्तित्वाचा अंतिम निर्णय घेण्याची कारवाई सुरू केलेली असेल. भारत हे त्यासाठी केवळ निमित्तमात्र ठरणार आहे. ही प्रक्रिया सुरू होईल तेव्हा भारतीय उपखंडाचा भूगोलही बदललेला असेल आणि नव्या भविष्यनिर्माणाची प्रक्रिया सुरू झालेली असेल. पाकिस्तानच्या निर्मितीपासूनच्या इतिहासात प्रत्येक वेळी भारताने या देशासोबत सुरळीत संबंध राखण्याच्या प्रयत्नांस प्राधान्य दिले होते. मात्र पाकिस्तानकडून त्याला कधीच सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. उलट, दहशतवादी कारवाया घडवत भारतास अस्थिर, असुरक्षित राखण्याचे कुटिल कारस्थान सातत्याने रचले गेले. गेल्या काही दिवसांतील भारताकडून सडेतोड लष्करी कारवायांमुळे आता ही परंपरागत भावना मावळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत आणि भूतकाळाच्या भयाचे भूत गाडून टाकून नव्या भविष्याची आखणी करण्याची भारताची उमेद बळावली आहे. आता पाकिस्तानला भारताकडून मिळणाऱ्या वागणुकीचा बाज पूर्णपणे उलटा झाला आहे आणि नवा भारत त्यामध्ये बदल करेल याची शक्यताही संपली आहे. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, त्या भूमिकेत कोणतीही तडजोड नाहीच, पण पाकिस्तानने बेकायदेशीरपणे बळकावलेला काश्मीरचा भागही भारताला परत मिळाला पाहिजे ही भूमिका भारताने आपल्या शक्तीच्या जोरावर अधिक मजबूत केली आहे. गेल्या अनेक दशकांच्या आगळिकीचे माप पाकिस्तानच्या पदरात घालण्यासाठी सिंधू पाणीवाटप करार स्थगित ठेवण्याची भारताची भूमिका कायम राहिली तर या देशात अराजकाखेरीज अन्य काहीच दिसणार नाही. काश्मीर प्रश्नात उभय देशांखेरीज कोणताही हस्तक्षेप मान्य होणार नाही ही भूमिका घेऊन भारताने अमेरिकेची श्रेयाची धडपडही थांबविली आहे आणि भारतात अतिरेकी कारवाया घडविणाऱ्या प्रत्येक दहशतवाद्याचा हिशेब पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानलाच भाग पडेल, अशी रणनीती आखली जात आहे. गेल्या आठवडाभरात भारताने पाकिस्तानचे कंबरडे मोडले, अतोनात नुकसान करून पाकिस्तानी सैन्याला जेरीस आणले, लष्करी सामर्थ्याचे पूर्ण खच्चीकरण केले, एवढीच माहिती भारतीयांसमोर उघड झाली आहे. कारवाई यशस्वी करणे एवढेच सैन्याचे काम असते. या कारवाईत कामी आलेले शत्रुपक्षाचे मृतदेह मोजणे हे आमचे काम नाही, असे सांगून भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानच्या हानीची ढोबळ जाणीव जगाला करून दिलीच आहे. भूतकाळाच्या पापाचे माप पाकिस्तानच्या पदरात पडले आहे, हा याचा अर्थ आहे. पाकिस्तान जे भोगतो आहे, ते त्या देशाचे वर्तमान आहे आणि त्याचे परिणाम हे त्याचे भविष्य असेल. या साऱ्यात, भूगोल नावाची आणखी एक गोष्ट दडलेली आहे. इतिहास, वर्तमान आणि भविष्याच्या या खेळात भूगोलदेखील बदललेला दिसेल, तेव्हा त्याचे संपूर्ण श्रेय केवळ भारताच्या कर्तबगारीला दिले जाईल यातही शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# 'जैश'ला धडा; मसूदचा अस्त जवळ

भारताने पाकिस्तानवर केलेल्या हल्ल्यानंतर 'जैश-ए-मोहम्मद' या अतिरेकी संघटनेने संघटनेचा प्रमुख मसूद अझहरच्या कुटुंबातील दहा सदस्य आणि चार जवळचे सहकारी मारले गेले आहेत, हे मान्य केले. मृतांमध्ये मसूद अझहरची मोठी बहीण आणि मेहुणे, पुतण्याची पत्नी आणि भाची, पाच मुले यांचा समावेश आहे. पाकिस्तानमधील बहावलपूर येथील सुभान अल्लाह मशिदीवरील हल्ल्यात मसूद अझहरचे नातेवाईक मृत्युमुखी पडले आहेत. याच बहावलपूरमध्ये १० जुलै १९६८ रोजी अल्लाहबक्ष साबीरच्या कुटुंबात मसूद अझहरचा जन्म झाला. अझहरचे वडील साबीर बहावलपूरमधील एका सरकारी शाळेचे मुख्याध्यापक होते. ७ मार्च २०२४ रोजी भारताच्या गृह मंत्रालयाने जाहीर केलेल्या 'मोस्ट वॉण्टेड' लोकांच्या यादीत ५७ वर्षीय मसूद अझहरचे नाव पहिल्या क्रमांकावर आहे. मसूदने भारताविरुद्ध केलेल्या गुन्ह्यांची एक मोठी यादी आहे आणि अनेक प्रकरणांमध्ये त्याचे नाव आरोपी म्हणून येते. या प्रकरणांमध्ये १ ऑक्टोबर २००१ रोजी श्रीनगरमधील तत्कालीन जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या संकुलावर झालेल्या हल्ल्याचा समावेश आहे. त्यात ३८ लोक मारले गेले. यानंतर डिसेंबर २००१ रोजी भारतीय संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातही अझहरचे नाव घेतले जाते. या हल्ल्यात सहा सुरक्षा कर्मचारी आणि इतर तीन जण ठार झाले. १४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे केंद्रीय राखीव दलाच्या ताफ्यावर झालेल्या हल्ल्यामध्ये ४० हून अधिक सैनिक हुतात्मा झाले. त्या हल्ल्यातही मसूद अझहरवर आरोप आहे. तथापि, कंधार अपहरणाच्या वेळी मौलाना मसूद अझहरची सर्वाधिक चर्चा झाली.

१९९९ मध्ये कंधार विमान अपहरणाच्या वेळी सुटकेची मागणी करण्यात आलेल्या तीन अतिरेक्यांमध्ये मसूद अझहरचे नाव समाविष्ट होते. भारत सरकारचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री जसवंतसिंग यांनी मसूद अझहरला एका खास विमानाने कंधारला नेऊन शत्रूकडे सुपूर्द केले. तेव्हापासून भारताच्या सुरक्षा संस्था मसूद अझहरचा शोध घेत आहेत. मसूद अझहर हा भारतात बंदी घातलेल्या 'जैश-ए-मोहम्मद' संघटनेचा म्होरक्या म्हणून ओळखला जातो. भारतातून सुटका झाल्यानंतर मसूदने या संघटनेची स्थापना केली. भारत सरकार सतत दावा करत आहे की, या संघटनेचे मुख्यालय पाकिस्तानच्या पंजाबमधील बहावलपूर येथे आहे. यामुळे भारताने पहिल्यांदाच पाकिस्तानच्या सीमेच्या शंभर किलोमीटर आत हल्ला केला. भारताने वारंवार पाकिस्तानकडे मसूदला भारताच्या स्वाधीन करण्याची विनंती केली आहे; परंतु पाकिस्तानने वारंवार सांगितले आहे की अझहर पाकिस्तानात नाही. भारत २००९ पासून मौलाना मसूद अझहरच्या 'जैश-ए-मोहम्मद'ला संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादी संघटनांच्या यादीत समाविष्ट करण्याची मागणी करत आहे; परंतु चीनने नेहमीच या मागणीविरुद्ध आपला 'व्हेटो' वापरला आहे. सुमारे दहा



वर्षांच्या प्रयत्नांनंतर १ मे २०१९ रोजी, संयुक्त राष्ट्रांनी मसूदच्या संघटनेला दहशतवादी संघटना घोषित केले. त्याबद्दल पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध समितीला प्रश्न केला. त्याच्या नेतृत्वाखाली 'जैश-ए-मोहम्मद' दहशतवादी कारवायांसाठी मोठी भरती मोहीम चालवते आणि तरुणांना भारताविरुद्ध कारवाई करण्यास प्रवृत्त करते.

एका लेखानुसार, मसूद अझहर कराचीमध्ये शिक्षण घेत असताना जिहादी कारवायांमध्ये सामील झाला. तो जानेवारी १९९४ मध्ये सीमेवरून भारतात आला नाही, तर ढाका ते दिल्ली विमानाने आला. दिल्लीतील प्रसिद्ध हॉटेल्समध्ये राहिल्यानंतर तो प्रथम देवबंद आणि नंतर काश्मीरला पोहोचला. भारतीय सुरक्षा दलांनी मसूदला ताब्यात घेतल्यानंतर दहा महिन्यांच्या आतच अतिरेक्यांनी दिल्लीतील काही परदेशी लोकांचे अपहरण केले होते आणि त्यांच्या सुटकेच्या बदल्यात मसूदची सुटका करण्याची मागणी केली होती. सहारनपूरमधून ओलिसांना सोडवण्यात उत्तर प्रदेश आणि दिल्ली पोलिसांना यश आल्याने ही मागणी अयशस्वी झाली. एका वर्षानंतर, 'हरकत-उल-अन्सार'ने पुन्हा काही परदेशी लोकांचे अपहरण करून त्याला सोडवण्याचा प्रयत्न केला; परंतु हा प्रयत्नदेखील अयशस्वी झाला. तेव्हापासून १९९९ मध्ये सुटका होईपर्यंत अझहरला जम्मूतील कोट भालवाल तुरुंगात ठेवण्यात आले. त्यावेळी काश्मीरमधून अटक केलेल्या काश्मिरी, अफगाण आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या संपूर्ण गटाला तिथे तुरुंगात ठेवण्यात आले होते. यामध्ये 'हरकत-उल-मुजाहिद्दीन' या अतिरेकी संघटनेचा तथाकथित श्रीनगर कमांडर सैफुल्ला खान आणि त्याचे दोन अतिरेकी भाऊ यांचा समावेश होता. तिथे असताना तो या सर्वांसमोर जिहादी विचारसरणीवर भाषणे देत असे. मौलाना अझहरच्या भाषणाचा उपस्थित दहशतवाद्यांवर प्रचंड प्रभाव पडला. त्याच्या यूट्यूबवरील क्लिप्स भारताविरुद्ध चिथावणी देणाऱ्या होत्या.

पाकिस्तानमध्ये बंदी असूनही, 'जैश-ए-मोहम्मद'च्या काही कारवाया दिसून आल्या. या संघटनेला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेकडून मदत मिळत राहिली; पण याचे कोणतेही पुरावे नाहीत. १९९९ मध्ये कंधार घटनेनंतर मसूद अझहरने अफगाणिस्तानातील तालिबानच्या मदतीने 'जैश-ए-मोहम्मद'ची स्थापना केली. दोन-तीन वर्षांनंतर त्याला पाकिस्तानात अटक करण्यात आली आणि त्याच्या संघटनेवर बंदी घालण्यात आली. पाकिस्तानमध्ये मसूद अझहरबद्दल चांगले मत नाही. सर्वांना माहिती आहे की, तो एका अतिरेकी गटाचा म्होरक्या आहे आणि अतिरेकी वृत्तीला प्रोत्साहन देतो. तो अनेक अतिरेकी घटनांमध्ये सहभागी आहे. तरुणांचे त्याच्याबद्दलचे मत चांगले नाही; पण असाही एक वर्ग आहे जो त्याला पाठिंबा देतो. हेच लोक भारताला आपला शत्रू मानतात. तथापि, मौलाना मसूद क्वचितच सार्वजनिक ठिकाणी दिसला आहे. हाफिज सईदप्रमाणे, मौलानाशी संबंधित बातम्या पाकिस्तानी माध्यमांमध्ये दिसत नाहीत. गेल्या दोन दशकांमध्ये फक्त दोनदाच मसूदच्या सार्वजनिक उपस्थितीची चर्चा झाली आहे. तो कराचीतील एका मेळाव्यात दिसला होता आणि त्यानंतर मुजफ्फराबादमधील जिहादी संघटनांच्या परिषदेत दिसला. भारताने पाकिस्तानकडून मसूद अझहर आणि त्याचा भाऊ अब्दुल रौफ असगर यांच्या प्रत्यार्पणाची वारंवार मागणी केली आहे. पुलवामा दुर्घटनेनंतरही ही मागणी पुन्हा पुन्हा करण्यात आली. २०१८ ते २०२२ पर्यंत पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री असलेले शाह महमूद कुरेशी यांनी अमेरिकन टीव्ही चॅनेल 'सीएनएन'शी बोलताना म्हटले होते की मसूद अझहर पाकिस्तानमध्ये आहे; पण तो इतका आजारी आहे की अंथरुणावरून उठू शकत नाही. एकीकडे असा कांगावा करताना त्याला तुरुंगात ठेवून हल्ला होणार नाही, याची काळजी पाकिस्तान घेत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमध्ये घुसून 'जैश'चे अड्डे उद्ध्वस्त केले. त्यात त्याचे दहा नातेवाईक आणि चार सहकारी ठार झाले. त्याचा भाऊ रौफ ठार झाला. त्याच्यावर भारतात अनेक दहशतवादी कृत्यांत सहभागी असल्याचा आरोप आहे. मसूदचा मुलगा भारताविरोधात गरळ ओकत होता. तो बेपत्ता आहे. पाकिस्तानी लष्कराने त्याला लपवून ठेवले असण्याची शक्यता आहे. भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून 'जैश'ला आणि मसूदलाही धडा शिकवला गेला आहे. कुटुंब नष्ट झाल्याने तो आता घाबरला आहे. त्यातून मरण्याची भाषा करायला लागला आहे. एका कुख्यात अतिरेक्याचा उदयास्त म्हणून मौलाना अझहर मसूदकडे पाहायला हरकत नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# अन्यथा भविष्य कधीच माफ करणार नाही

व्यसन कोणतेही असो ते शेवटी विनाशाकडेच घेऊन जाते. व्यसनाधीनतेचे परिणाम समाजातील सर्वच घटकांना माहीत आहेत. त्यापासून होणाऱ्या विनाशाचीही पुरेपूर कल्पना आहे. तरीही मनुष्य त्याच्या अधीन जातो. त्यानंतर व्यसनाचा हा फास एवढा घट्ट आवळला जातो की, त्यामधून बाहेर पडणे कठीण होऊन जाते. पूर्वी व्यसनाची साधने फार कमी होती. त्याचे आयाम वेगळे होते. वडिलधाऱ्यांचा धाक होता. एकत्र कुटुंब व्यवस्था असल्याने मुलांच्या संगोपनामध्ये सर्वांचा हातभार असायचा. ही व्यवस्था आम्ही मोडीस काढली. आमचे आदर्श आणि प्रेरणास्थानाची व्याख्या बदलली. सध्या चारही दिशांची प्रगतीची दारे उघडली गेली आहेत. या आधुनिक युगामध्ये विविध प्रकारच्या गॅझेट्सने धुमाकूळ घातला आहे. उमलत्या पिढीला विनाशाकडे घेऊन जाणारा त्यामधीलच एक मोबाईल. मोबाईलवर जगामध्ये विविध देशांमध्ये होत असलेल्या संशोधनाने तर पालक वर्गाची पार झोप उडाली आहे. एवढे घातक आणि गंभीर दुष्परिणाम या मोबाईलच्या वापराने पुढे येत आहेत. तरीही त्याची तमा न बाळगता चिमुकल्यांपासून तर युवावर्गापर्यंत मोबाईलने आई-वडिलाची जागा घेतली आहे. मोबाईल हातात दिल्याशिवाय मुलगा जेवणही करीत नाही, अशा पालकांच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. लहान मुलांवर मोबाईलचा अति वापर अनेक शारीरिक आणि



मानसिक दुष्परिणाम करू शकतो. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर तसेच मेंदूच्या विकासावर नकारात्मक परिणाम होतो. मोबाईल आणि समाजमाध्यमांचे व्यसन लहान मुलांना मानसिकदृष्ट्या अतिशय कमजोर बनविते, विचारशक्तीचा ऱ्हास होतो, असा तज्ज्ञांचा ठाम निष्कर्ष आहे. कोरोना काळामध्ये मुलांचा मोबाईल स्क्रीन टाईम वाढला होता. मुले घरामध्ये बंद होतात. खेळाचे मैदान दूर सारले केले. शाळाही मोबाईलवरच भरायची. त्यावेळी अख्खे जग म्हणजे मुलांसाठी मोबाईलच होता. या सवयीचे गंभीर परिणाम मुलांवर झाले. त्यांच्यामध्ये चिडचिड करण्याचे प्रमाण वाढले. त्यामुळे त्यांच्या मेंदूमध्ये चिंता आणि नैराश्याने कायम घर केले. मोबाईलवर मुले जे बघत असतात, ते त्यांच्यासाठी योग्य की अयोग्य हे त्यांना काहीच समजत नाही. मोबाईलवर दिसणाऱ्या विविध प्रकारच्या चित्रांमुळे त्यांच्या मेंदूमध्ये डोपामाईन नामक एक रसायनाचा स्राव निर्माण होतो आणि त्यामधूनच त्यांना आनंदाची अनुभूती होते. हाच आभासी आनंद लहान मुलांना वास्तविकतेपासून दूर लोटत आहे. भारतामध्ये सध्या जवळपास ५३ कोटी व्हॉट्सॲपचे वापरकर्ते असून युट्यूबचे ४५ कोटी, फेसबुकचे ४१ कोटी आणि जवळपास २ कोटी ट्विटरचे वापरकर्ते आहेत. २०२५ मध्ये इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या भारतामध्ये ९० कोटींपर्यंत वाढू शकते, असा केंद्र सरकारचा अहवाल सांगतो. मोबाईलमुळे संवाद बंद झाला. त्यामुळे मुलांमध्ये संवाद साधण्याची क्षमता क्षीण झाली आहे. पूर्वीची पिढी ज्या अनुभवातून शिकली, तो अनुभव या मोबाईल युगामध्ये मुलांना मिळेनासा झाला आहे. त्यामुळे लहान मुलांमध्ये एकटेपणा वाढला असून आयुष्याला सामोरे जाण्याची आणि संकटाला सामोरे जाण्याची क्षमता मुलांमध्ये कमी होत असल्याचा तज्ज्ञांनी गंभीर इशारा दिला आहे.

मोबाईलच्या अति वापरामुळे जीवघेण्या कॅन्सरचाही धोका निर्माण होऊ शकतो. अनेक अभ्यासपूर्ण संशोधनामधून स्पष्ट झाले आहे की, मोबाईलमधून निघणारे इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन जास्त वेळ मोबाईलचा वापर केल्याने त्वचेमध्ये शोषली जातात. त्यामुळे ब्रेन कॅन्सर होण्याचा धोका तज्ज्ञांनी वर्तविला आहे. या सर्व परिणामांची कल्पना जवळपास सर्वच पालकांना आहे. तरीही मुलांचा स्क्रीन टाईम कमी होत नाही, ही एक अतिशय गंभीर बाब आहे. पाश्चिमात्य संस्कृतीच्या अमर्याद नादी लागून आम्ही आमच्या एकत्रित कुटुंब व्यवस्थेस तिलांजली दिली. आजी-आजोबांपासून नातवंडं दूर गेली. आम्ही आमच्या सनातन संस्कृतीची नाळ तोडली. त्याचे सर्व गंभीर परिणाम आता दिसू लागले आहेत. मोबाईलमुळे देशाची भविष्य घडविणारी ही उमलती पिढी अशा प्रकारे नैराश्याच्या अंधकारात हरविली तर देशाचे भविष्य कसे असणार, याचा गंभीरतेने सर्वांनीच विचार करायला हवा. त्यासाठी कठोरता हा एकच नियम असू शकतो. अन्यथा भविष्य आम्हाला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१७८५६

## प्रासंगिक

शेफाली वैद्य

# आपल्याला इस्राएल सारखं व्हायचंय?

काल डीजीएमएच्या पत्रकार परिषदेत सर्व पुरावे देऊन भारताने निर्विवादपणे दाखवून दिलं की ऑपरेशन सिंदूरमध्ये एकच विजेता आहे आणि तो म्हणजे भारत. ह्या तीन दिवसांच्या युद्धामध्ये आपण पहिल्या दिवशी पाकिस्तानमधील दहशतवादी ट्रेनिंग कॅम्प उध्वस्त केले तर शेवटच्या दिवशी फक्त ९० मिनिटांमध्ये आपण पाकिस्तानमधल्या ११ एअर फोर्स बेसेस वर यशस्वी हल्ले केले आणि त्यातल्या एका बेसवर पाकिस्तानची अणुयुद्धाचे कमांड सेंटर होते. साधारण त्याच वेळेला पाकिस्तानच्या त्या भागात ४.३ क्षमतेचा भूकंपाचा धक्का रेकॉर्ड झाला. भारताने जाणूनबुजून किंवा नकळत पाकिस्तानच्या नुक्लियर स्टॉकपाईलवर हल्ला केला का? माहिती नाही, पण ह्या कैरनाच्या एअर बेसवर हल्ला झाल्या नंतरच अतिशय जलद गतीने चक्रे फिरली, पाकिस्तानने अमेरिकेची मदत मागितली आणि अमेरिकेने मध्यस्ती करून पाकिस्तानच्या डीजीएमऐला भारताला फोन करायला लावला आणि सिजफायर जाहीर झाला.

त्या दिवशी इतर करोडो, राष्ट्रवादी भारतीयांप्रमाणे मीही थोडीशी खट्टू झाले होते. आपण निर्विवादपणे जिंकत होतो, पाकिस्तान बॅकफूटवर होता, अश्या वेळी हे पाऊल का उचलले गेले हे इतर अनेक राष्ट्रवादी नागरिकांप्रमाणे मलाही समजत नव्हतं, पण त्याचं उत्तर कालच्या पत्रकार परिषदेत मिळालं. आपलं ध्येय आत्तातरी पाकिस्तानला नेस्तनाबूत करण्याचं नव्हतं, तर त्यांचे दहशतवादी तळ उध्वस्त करणे, आपली ताकद त्यांना दाखवून देणे आणि मनात आणले तर पाकिस्तानच्या कुठल्याही शहरावर, कुठल्याही बंदरावर, कुठल्याही विमानतळावर, कुठल्याही आर्मी बेसवर भारत हल्ला करू शकतो हे भारताने पाकिस्तानला सप्रमाण दाखवून दिले. हा फार मोठा विजय आहे पण तरीही आपल्यातल्या बऱ्याच लोकांना अजूनही वाटतंय की इतकं तडकाफडकी युद्ध थांबवायला नको होतं. आपण इस्राएल सारखं लढायला पाहिजे होतं. गाझा ज्याप्रमाणे इस्राएलने उध्वस्त केलंय तसं आपण पाकिस्तानबरोबर करायला पाहिजे होतं. अपेक्षा रास्तच आहे, पण आपण इस्रायल नाही आहोत. आपण भारत आहोत आणि आपल्या देशात अंतर्गत वाळवी खूप आहे. गेल्याच वर्षी जानेवारीमध्ये मी इस्रायेलमध्ये होते, एका मीडिया शिष्टमंडळाचा भाग म्हणून. गाझा सीमेवर जोरदार युद्ध सुरु होतं. पण जेरुसलेम शहर जगातल्या कुठल्याही मोठ्या शहरासारखं भासत होतं. रोजचे व्यवहार नेहमीसारखे सुरु होते. कॅफेमध्ये लोक घोळक्या-घोळक्याने बसून गप्पा मारत होते, शाळेत जाणारी मुलं स्कूलबसमध्ये खिदळत होती, शाळा, कॉलेजेस, मॉल, दुकाने, रेस्टॉरंटस सर्व व्यवस्थित सुरु होती. जेरुसलेमच्या जुन्या, ऐतिहासिक भागात लोक सेल्फी घेत होते. वरवर पाहिलं तर कुठेच वाटत नव्हतं की जेरुसलेम पासून फक्त चार तासांवर युद्ध सुरु आहे. पण त्या शांत, तरंग नसलेल्या पृष्ठभागाखाली अस्वस्थतेचा खळाळता भोवरा होता. मधूनच आकाशात गरजत जाणारे फायटर जेट, अधून मधून वाजणाऱ्या सायरन्स, रेस्टॉरंट मध्ये बसून फसफसणाऱ्या बियरचा तरुणाईच्या गर्दीत मिलिटरी ड्रेसमध्ये सधले तरुणही होते जे कमरेला एके ४७ लावून बियरचा आस्वाद घेत होते. आम्ही उतरलो होतो ते जेरुसलेम मधले हॉटेल गाझा सीमेवरून आलेल्या विस्थापितांनी भरले होते. आठ-आठ, दहा-दहा जणांची मोठी कुटुंबे एका खोलीत राहत होती, पण तिथेही त्यांचे रोजचे व्यवहार सुरु होते. वरवर पाहिलं तर सगळीकडे शांतता होती पण ही शांतता युद्ध स्वीकारून आलेली प्रगल्भ शांतता होती. कुठेही अराजक नव्हतं. कोणीही युद्ध थांबवा म्हणून मेणबत्ती मोर्चा काढत नव्हतं. इस्राएलचे अनेक लोक हमासने ओलीस ठेवले होते, त्यांचे फोटो सर्व सार्वजनिक ठिकाणी दिसायचे पण कोणीही दिवसरात्र 'डी-एस्केलेट' म्हणत रडत नव्हते. इंस्टाग्रामवर 'वायोलन्स इज नेव्हर द अन्सर' म्हणत कोणी बाई भरपूर मेकप करून रील्स टाकत नव्हती. युद्धाची झळ इस्राएलच्या घराघरात पोहोचली होती. आम्हाला भेटलेल्या प्रत्येक नागरिकाच्या घरची, प्रेमाची कोणीतरी व्यक्ती गणवेषात होती. कोणाचा २१ वर्षांचा लेक सीमेवर लढत होता, कोणाची मुलगी एअर फोर्समध्ये होती, कोणाचा भाऊ रणगाडा पथकात होता, कोणाचा नवरा बॉम्ब डिफ्युज करायच्या कामात होता तर कोणाची तरी आई गाझाजवळ फील्ड हॉस्पिटल चालवत होती. सर्वांचंच काहीतरी मौल्यवान पणाला लागलं होतं. युद्धाची किंमत प्रत्येक इस्रायली चुकवत होता, आणि म्हणूनच शांतीचे मूल्य त्यांना माहिती होते. मी त्या दौऱ्यात ज्या ज्या इस्रायेली लोकांना भेटले, त्यापैकी कोणीही युद्ध हवे असे एका शब्दानेही कधी म्हटले नाही, पण एकाही व्यक्तीने हे युद्ध आवश्यक नव्हतं, हे युद्ध टाळता आलं असतं, असंही कधी म्हटलं नाही. कारण प्रत्येक इस्रायली व्यक्तीला हे अगदी लहानपणापासून माहिती असतं की जेव्हा तुमच्या अस्तित्वालाच धोका असतो, तेव्हा युद्ध ही निवड नसते, ती एक अपरिहार्यता असते. हामासने इस्राएलमध्ये जी क्रौर्याची परिसीमा गाठली, चिमुकल्या बाळांची शिरं छाटणं, महिलांवर बलात्कार, नागरिकांना जिवंत जाळणं, त्याविरुद्ध इस्राएलचे लोक एकदिलाने उभे राहिले होते. भारतासारखाच इस्रायल हा अंतर्गत राजकीय मतभेदांनी भरलेला देश आहे, पण जेव्हा त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न होता तेव्हा तिथले उजवे, डावे, धार्मिक ज्यू, नास्तिक ज्यू - सर्वांनी एकच सूर लावला होता की इस्रायली लोकांचे सांडलेले रक्त वाया जाता कामा नये, हमासला धडा शिकवलाच पाहिजे, त्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी बेहेत्तर. जेव्हा मी भारताकडे पाहते, तेव्हा मी स्वतःलाच विचारते - आपल्याला हे समजण्यासाठी आणखी किती रक्तपात, आणखी किती उरी, किती पहलगाम घडावे लागतील? हा देश बुद्धाचा आहे, युद्धाचा नाही म्हणत बेंबटणारे लोक हे का विसरतात की बुद्धाच्याही आधी हा श्रीकृष्णाचा देश आहे, जे सांगतात की अधर्माशी युद्ध करणं हा खरा धर्म आहे. शांतीः परमं गतीः म्हणजे आपण झुरळासारखे लपून बसून मिळवलेली शांती नाही तर ती बळावर आधारलेली शांती असावी. कधी कधी मला वाटतं की आपण भारतीय खूप मऊ आणि लिबलिबीत झालेलो आहोत. निष्क्रिय, आळशी, आपल्याला प्रिय असलेल्या गोष्टींचेही रक्षण करण्यास अनिच्छुक. सोयीसुविधांच्या उबदार गादीवर झोपताना बलिदानाचा खडबडीत स्पर्श विसरलेले. इस्राएल जेव्हा हमासवर युद्ध लादतो, तेव्हा तिथला प्रत्येक नागरिक, मग त्याचे राजकीय, धार्मिक विचार काहीही असू देत, आपल्या देशाच्या सरकारमागे ठामपणे उभा राहतो. तो देश एकजुटीनं लढतो. आणि हो, त्या लढाईची पुरेपूर किंमत तिथला प्रत्येक नागरिक मोजतो. आता आपल्या देशात बघा. दोनच दिवसांपूर्वी जे लोक डिसएस्कलेशनचा राग आलापत होते, नेमके तेच लोक आज मोदींवर लशरीशषळीश मान्य केल्याबद्दल तोंडसुख घेतायत! कालपर्यंत ज्यांनी 'ऑपरेशन सिंदूर'चं श्रेय केवळ लष्कराला देऊन त्यामागे असलेल्या राजकीय इच्छाशक्तीचा अपमान केला, तेच लोक आज १९७१ च्या युद्धात इंदिरा गांधी कश्या जिंकल्या ह्याचे कौतुक करत आहेत, जणू काही इंदिरा गांधीने एकटीने पाकिस्तानचा पराभव केला होता! हो, १९७१ मध्ये भारताचा विजय झाला, पण त्यासाठी किती किंमत मोजली आपण त्याची कल्पना आहे? जवळजवळ चार हजार भारतीय सैनिक त्या युद्धात हुतात्मा झाले, सहा हजाराहुन जास्त सैनिक गंभीर जखमी झाले. १९७१ मध्ये आपण युद्ध जिंकलो कारण त्यावेळी संपूर्ण देश एकत्र होता. राजकीय नेतृत्व, विरोधी पक्ष, लष्कर आणि सामान्य जनता - सर्वांनी मिळून तो विजय मिळवला होता. आज परिस्थिती काय आहे? पाकिस्तानसारख्या बाहेरच्या शत्रूशी लढून विजय मिळवणं फार सोपं आहे, पण भारतात राहून पाकिस्तानचे नागरिक असल्यासारखे वागणारे लाखो लोक आहेत ह्या देशात. त्यांचं काय करायचं? लक्षात ठेवा, आपण इस्रायल सारखे बनूच शकत नाही, जोपर्यंत आपलं नैतिक बळ इंस्टाग्राम फिल्टरसारखं खोटं, नकली आणि आभासी आहे. आपल्यातल्या देशद्रोही वाळवीचा कुरूप चेहेरा आधी ओळखायला शिका आणि जिथे दिसतील तिथे त्यांचा प्रतिकार करा. ऑपरेशन सिंदूरची बाजी भारत निर्विवादपणे जिंकला आहे. कालच्या प्रेस कॉन्फरंस मध्ये इतके उघड पुरावे देऊन देखील जर तुमच्या ओळखीतले कोणी हे मान्य करू इच्छित नाही तर जाणून असा की ते देशद्रोही आहेत. इस्राएलसारखं होण्यासाठी, भारताच्या पाठीमागे उभं राहावं लागतं, भूमिका घ्यावी लागते. तुम्हाला जर खरंच इस्राएलसारखा भारत हवा असेल,तर आधी भारतासाठी उभं राहा, आपल्या नेतृत्वामागे ठामपणे उभं रहा, देशाचं रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या पाठिशी ठाम उभे रहा.कधी कधी, शांततेकडे नेणारा एकमेव मार्ग म्हणजे युद्धच असतं, आणि इतिहास नेहमीच लढणाऱ्या राष्ट्रांचीच आठवण ठेवतो, हरणाऱ्या नाही.

### २२ एप्रिलचे उत्तर २२ मिनिटांच्या वक्तव्यात देणारे पंतप्रधान म्हणजे भारताचे नीतीशास्त्रच

२२ एप्रिलच्या घटनेला भारताने २२ मिनिटांचे दिलेले उत्तर म्हणजे एकविसाव्या शतकातील भारताचे नीतिशास्त्र असल्याचे जगाला स्पष्ट सांगणारे नेतृत्व म्हणजे भारताचे युगपुरुष होय असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. 'खून और पानी एक साथ नहीं बहेगा', ऑपरेशन सिंदूर कोट्यावधी लोकांच्या भावनेचे प्रतीक आणि न्यायाचे प्रतीक आहे, असे स्पष्ट म्हणणारे आणि आपल्या सैनिकांना पूर्ण अधिकार देणाऱ्या पंतप्रधानांनी जगासमोर पाकिस्तानचे खरे चित्र दाखवून दिले आहे. तिन्ही सैन्य दलाचे कौतुक करत असताना दुसरीकडे हे युग युद्ध करायचे नाही आणि आतंकवादचे सुद्धा नाही. 'जगाला युद्ध नको बुद्ध हवा' असे सांगत शस्त्र आणि शास्त्राची गरज असल्याचे नमूद केले. याचे जीवंत उदाहरण म्हणजे भारताने पाकिस्तानी नागरिकांना टार्गेट केले नाही. पाकिस्तानात आतंकवादी अड्डे आहेत हे जगाला माहीत असताना आत्ता तरी शहाणे होऊन स्वतःच्या अस्मितेच्या रक्षणासाठी, जगातून आतंकवाद संपवण्यासाठी मनापासून प्रयत्न करावे, अन्यथा जग पाकिस्तानला कधीही माफ करणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींना भारतीय नागरिक व विशेषतः अनेक राजकीय पक्षांनी दिलेला पाठिंबा म्हणजे पंतप्रधानांचे खरे खंबीर व कणखर नेतृत्व होय. देशासाठी कठोर निर्णय घेत दिवस-रात्र एक करत प्रत्येक घटनेवर लक्ष ठेवणारे मोदींसारखे नेतृत्व म्हणजे भारतीय नागरिकांचे अभिमान आहेत यात शंका नाही.

धन्यकुमार बिराजदार/सोलापूर

## महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून वंदन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर,जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, कनिष्ठ अभियंता अजिक्य साळूंखे, तैयब मुलाणी, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.



### प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे लहान मुलांना मिठाई वाटप

**सोलापूर, दि. १२ मे-**

प्रबुद्ध भारत चौक, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर येथे प्रबुद्ध भारत तरुण मंडळातर्फे लहान मुलांना मिठाई वाटप करण्यात आले. प्रारंभी तथागत बुद्ध मूर्ती आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेससामाजिक कार्यकर्ते गौतम इंगळे व भारत बाबरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी श्रीमंत जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी वैशाखी पौर्णिमेनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यानंतर मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या वतीने लहान मुलांना मिठाई वाटप करण्यात आले. यावेळी आरोग्य निरीक्षक जमादार, पी.बी. ग्रुप अध्यक्ष बाबा गायकवाड, ॲड. विशाल मस्के, अरविंद गायकवाड, चंद्रकांत सोनवणे, गोपीनाथ जाधव, धीरज वाघमोडे, यशराज डोळसे,सुधीर वाघमोडे, अक्षय मस्के, आदित्य चंदनशिवे, धोंडीबा कापुरे , अजय इंगळे ,गोविंद राजगुरू,शिरीष गायकवाड, अमोल कुंदुर, अजित जाधव, शुभम कांबळे, सिद्धू तळभंडारे ,प्रमोद साबळे, नंदू जाधव, सचिन घोडके, सतीश अडाकूल, प्रसन्न तळभंडारे, राहुल बागले,जयराज सांगे, रोहन तळभंडारे, निखिल शिंदे, हरी बचुवार , रविंद्र गवळी आदी उपस्थित होते.

# एसटीत लवकरच नोकरभरती होणार : परिवहन मंत्री

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ मे-**

> "एसटीच्या सक्षमीकरणासाठी कुशल मनुष्य बळाबरोबरच तांत्रिकदृष्ट्या सक्षम अधिकाऱ्यांची भविष्यात एसटीला गरज भासणार असून त्या अनुषंगाने भारती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे! "
> **-प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**



एसटीला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी भविष्यात २५ हजार स्वमालकीच्या बसेस घेणार असून त्या कार्यान्वित करण्यासाठी आपल्याला मनुष्यबळाची गरज लागणार असून चालक तथा वाहक पदा बरोबरच अन्य काही वर्गातील पदे देखील येत्या काही वर्षात एसटी महामंडळात भरती केली जाणार आहेत. त्याबाबतच्या ठरावाला नुकतीच संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाने एसटी महामंडळातील नोकर भरतीला सन. २०२४ पर्यंत मनाई केली होती. तथापि, येत्या काही वर्षांमध्ये निवृत्त होणाऱ्या कर्मचारी यांची लक्षणिय संख्या लक्षात घेता, नव्या बसेस चालवण्यासाठी चालक तथा वाहक या पदासह अन्य कर्मचारी व अधिकाऱ्यांची भरती करणे अत्यंत आवश्यक असून याबाबतच्या ठरावाला एस टी महामंडळाच्या ३०७ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात येत आहे.

त्यामुळे भविष्यात वाढत्या चालनीय बस संख्येनुसार कर्मचाऱ्यांच्या नवीन आकृतीबंधाला मंजुरी घेण्यात येईल त्यानुसार पुढील भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

सध्या महामंडळाच्या अनेक विभागांमध्ये कुशल मनुष्यबळाचा अभाव आहे. अनेक ठिकाणी चांगले शिक्षण अधिकारी आवश्यक असून विशेषतः भविष्यात पीपीपी तत्त्वावर विकसित होणाऱ्या एसटीच्या जागे बाबतीत बांधकाम विभागाकडे कुशल अभियंत्यांची गरज भासणार आहे.

त्यामुळे सध्या रिक्त असलेल्या अभियंत्यांच्या जागा करार पद्धतीने आणि सरळ सेवा भरतीच्या माध्यमांतून भरण्यात येणार आहेत.: प्रत्येक खात्यांनी आपल्या विभागातील रिक्त पदांचा फेर आढावा घेऊन आवश्यक असणारी पदे भरावीत.

# नेहरूनगर व सलगरवाडी भागातील रहिवाशांचा पाण्याचा प्रश्न सोडवा

### माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार यांची महापालिकेकडे मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, १२ मे-**

हद्दवाढ भागातील जुना वांगी रस्त्याच्या लगतचे नेहरूनगर व सलगरवाडी भागातील रहिवाश्यांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर असून ते कायमस्वरूपी मिटविण्यासाठी अदित्यनगर टाकीवरून किंवा प्रतापनगरला गेलेल्या २४ इंची लाईनवरून नविन पाईपलाईन टाकून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी मिटवावे, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व्ही. जे. एन.टी. विभागाचे उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महापालिका उपायुक्त रवि पवार यांना निवेदन दिले.

राजस्वनगर ते सिध्देश्वर वनविहार मार्गे प्रतापनगर पर्यंतच्या व जुना वांगी रस्त्याच्या दोन्ही बाजूला गिरीजा शेटेनगर व रेसीडन्सी, राम चंद्र शेटे नगर, सद्गुरू नगर, पोतदार स्कूल परिसर, बुरूडकर डेव्हलपर्स, सुलक्षणा नगरी, व्यंकटेश लारका, साई सृष्टी, स्वामी ट्रिन सिटी, मेघराज उद्यान नगर, पुजा लॉन ॲन्ड रेस्टॉरंट परिसर, क्रिस्टल डेव्हलपर्स, गोकूळ फार्म, शामराव पवार वस्ती, स्वप्नपुष्प सोसायटी, नारायण स्कुल परिसर, सेंट थॉमस स्कूल परिसर आदी भागात नागरीक वास्तव्यास आहेत. सध्या बोअरचे पाणी कमी झाल्याने या भागातील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. टँकरद्वारे विकत पाणी घेणे हे मध्यम वर्गीयांना परवडणारे नसून त्यामुळे या भागातील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवावे. आदित्यनगर टाकीमधून किंवा प्रतापनगरला गेलेल्या २४ इंची लाईनवरून नवीन पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता आहे.

उपायुक्त पवार म्हणाले, नेहरूनगर, सलगरवाडी परिसरात पाणी पुरवठा करणे हा मोठा प्रकल्प असून तांत्रिकदृष्ट्या नियोजन करून पाणीपुरवठा करण्याची गरज आहे आणि लवकरात लवकर या भागातील नागरिकांना पाणीपुरवठा करू.

या शिष्ट मंडळात सुनिल जाधव, संतोष वानखेडे, अविनाश पवार, राज पाटील, देवा चौधरी, अमितकुमार खरटमल, सुशिल गायकवाड, प्रशांत नरळे, प्रदिप डोईजोडे, कल्लप्पा गायकवाड, थॉमस सर, उमेश माने, शहाजी ढोले, गिरीष माळी आदी सहभागी होते.

# रा.स्व.संघाच्या कार्यकर्ता विकास वर्गाचा शुभारंभ

**नाशिक, दि. १२ मे-**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम क्षेत्राचा 'कार्यकर्ता विकास वर्ग- प्रथम' (सामान्य) १८ ते ४० वर्ष या वयोगटातील तरुण स्वयंसेवकांचा प्रशिक्षण वर्ग ११ मे पासून सुरू झाला. येत्या १ जून पर्यंत चालणाऱ्या या वर्गात महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात या तीन राज्यातून म्हणजे संघ रचनेतील विदर्भ, देवगिरी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात आणि सौराष्ट्र अशा सहा प्रांतातील २८० स्वयंसेवक सहभागी झालेले आहेत. यात शेतकरी, लघुउद्योजक, डॉक्टर्स, वकिल, व्यापारी, शिक्षक आदिंसह उच्च महविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले आहेत. नाशिक येथील भोसला सैनिकी विद्यालयाच्या परिसरात या वर्गाचे उद्घाटन रा.स्व. संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी यांच्या हस्ते भारतमाता पूजनाने झाले. या प्रसंगी वर्गाचे सर्वाधिकारी विष्णु वझे, कार्यवाह जयदीप धर्माधिकारी उपस्थित होते. चौधरी यांनी संघाच्या शताब्दी वर्षादरम्यान हा वर्ग होत आहे. त्यामुळे आपले कार्य अधिक गतीने पुढे जावे, त्यासाठी येणारे विविध संघटनात्मक व समाजाभिमुख कार्यक्रम हे अधिक उत्साहाने आणि भारतमातेच्या परमवैभवाकडे जाण्यासाठी या प्रशिक्षणात आपण सहभागी व्हावे असे शिक्षार्थींचे भावजागरण केले. या वर्गात सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी, अ.भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी मार्गदर्शन करणार आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नियमित प्रशिक्षणाचा भाग असलेले असे संघ शिक्षा वर्ग मे महिन्यात भारतभर सर्वत्र होत असतात. यात सहभागी होणारे स्वयंसेवक त्यांच्या त्यांच्या गावी संघ काम विस्तारावे म्हणून विविध दायित्व घेऊन कार्य करत असतात.

# प्रॉव्हिडंट फंड कार्यालयात दलालांना बंदी घाला

### महाराष्ट्र कामगार सेनेची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापुरातील प्रॉव्हिडंड फंड विभागीय कार्यालयातील दलाल व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने अशिक्षित व गरीब महिला विडी कामगारांची आर्थिक लूट व फसवणूक होत असल्याचा आरोप करुन प्रॉव्हिडंट फंड कार्यालयात खाजगी दलालांना येण्यास बंदी घालावी, अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने प्रॉव्हिडंट फंड विभागीय आयुक्तांना देण्यात आले.

सोलापूर प्रॉव्हिडंट फंड विभागीय आयुक्त यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, सोलापुरात विडी, यंत्रमाग, असंघटित, संघटित, विविध उत्पादन कारखाने व इतर अनेक आस्थापने मोठ्या प्रमाणात असून, त्यापैकी विशेष करून विडी उत्पादन कंपन्यात ९०% महिला आहेत. तर बहुतेक कामगार अशिक्षित असल्याचा फायदा घेऊन, खाजगी दलाल (एजंट) येथील कार्यालयातील कर्मचाऱ्यांना हाताशी धरून, कामगारांची व शासनाची लाखो रुपयांची फसवणूक करत आहेत.

यापूर्वीही, असे अनेक गैरप्रकार हे खाजगी दलाल (एजंट) केल्याचा पर्दाफाश शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष प्रणित, महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने उघडकीस आणला. याबाबत केंद्रीय कामगार मंत्रालयाच्या प्रायव्हेट फंड विभागामार्फत आपल्या कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची चौकशी देखील झाली आहे. परंतु त्यानंतर सुमारे पाच ते सहा वर्षानंतर परत एकदा वरील प्रकार होत असल्याचे अनेक महिला विडी कामगारांकडून तक्रारी येत आहेत.

तरी या निवेदनातील म जकुराची गंभीर दखल घेऊन, खाजगी दलाल (एजंट) व आपल्या कार्यालयातील कर्मचारी, विडी कंपनीतील व्यवस्थापन कर्मचाऱ्यांची व विडी कंपनीच्या प्रायव्हेट फंड मुख्य सल्लागारांची चौकशी करून, कामगारांची फसवणूक थांबवावी., व गरीब विडी कामगारांना न्याय द्यावा, अशी विनंती केली होती. विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात श्रीनिवास बोगा, पप्पू शेख, रेखा आडकी, गुरुनाथ कोळी, सुमित भांडेकर, सविता दासरी, पद्माबाई मॅकल, दादासाहेब नीळ, सोनि दासरी, विठ्ठल कुराडकर यांच्यासह कामगार सेनेचे पदाधिकारी व कामगार उपस्थित होते.

# सहकार कायद्यात बदलासाठी समितीची स्थापना

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

### सहकार परिसंवादात शरद पवारही एकाच व्यासपीठावर



**तभा वृत्तसेवा। जमीर काझी**
**मुंबई, दि. १२ मे-**

सहकार क्षेत्राशी निगडित असलेल्या प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम सहकार कायद्यातून झाले पाहिजे. या कायद्यात प्रत्येक क्षेत्राशी निगडित नवीन प्रकरणे दाखल करावी लागणार आहेत. त्यामुळे सद्याच्या प्रचलित सहकार कायद्यातील आवश्यक बदलांसाठी समितीची स्थापना करण्यात येत आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात दख्खनचा उठाव आणि सहकाराची मुहूर्तवेढ, शतकोत्तर सुवर्ण स्मृतिदिन १५० वर्ष, आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्त सहकाराचे सक्षमीकरण आणि राज्य शासनाचे धोरण या विषयावर परिसंवाद झाला. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, व राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. अडगळीत पडलेल्या सहकारी संस्थांना ऊर्जेता अवस्था आणण्याची गरज असल्याचे शरद पवार यांनी यावेळी सांगितले

सहकारी बँकांनी आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेत बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल केले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कोअर बँकिंग प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानयुक्त बँकिंग प्रणाली सहकारी बँकांनी अंगीकारली. ग्राहकपयोगी सर्व सेवा सहकारी बँका देत आहेत. यामुळे फिस्कल कन्सोलिडेशन च्या कालावधीत सहकारी बँका जगल्या आहेत. या काळातही सहकारी बँकांनी उत्तम काम केले आहे. पुणे जिल्ह्यातील सुपे येथे १२ मे १८७५ रोजी सावकारांविरोधात झालेला उठाव म्हणजे ही सहकार क्षेत्राची सुरुवात ठरली. अशा या ऐतिहासिक घटनेला आज दीडशे वर्ष पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रात प्रथमच स्वतंत्ररित्या सहकार मंत्रालय सुरू केले आहे. या मंत्रालयाच्या माध्यमातून देशभर सहकार चळवळीचे सक्षमीकरण होत आहे. देशभरात सहकारी संस्थांचे सक्षमीकरण केंद्र शासनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. सहकारी साखर कारखाने साखर उत्पादनासोबत उपपदार्थही बनवीत आहेत. यामुळे जागतिक स्पर्धेत साखर कारखाने टिकत आहेत. केंद्र शासनाने किमान आधारभूत किंमत, इथेनॉल धोरण यामध्ये सातत्याने बदल केले आहेत. शेतकऱ्यांचे कारखाने शेतकऱ्यांकडेच राहील, अशी राज्य शासनाची भूमिका आहे. त्यामुळे साखर कारखान्यांनी उपपदार्थांच्या निर्मितीकडेही वळले पाहिजे. सहकारी तत्त्वावर सुरू असलेल्या सूतगिरण्यांना विजेचे दर हे जागतिक स्पर्धेत टिकविण्यासाठी अडचणीचे ठरत असल्याच्या तक्रारी असतात. शासन विजेबाबत अनुदानही देत असते. त्यामुळे सर्व सुतगिरण्या सौरऊर्जेवर नेण्यात येत आहे. त्यामुळे सुतगिरण्यांची विजेची सर्वात मोठी अडचण दूर होणार असल्याचे सांगून ते म्हणाले, एकूण सहकारी संस्थांपैकी ५० टक्के या सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. सहकार कायद्यात बदल करून मागील काळात सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी वेगळे प्रकरण ठेवण्यात आले आहे. यामधून सहकारी गृहनिर्माण संस्थांची व्यवस्था उभारण्यात येत आहे. स्वयं पुनर्विकास करण्यासाठी नवीन योजना सहकारी संस्थांसाठी आणलेली आहे. त्यांना राज्य शासन १७ प्रकारच्या वेगवेगळ्या सवलती देत आहे. सहकारी बँकांमधून राज्य शासनाचे व्यवहार मोठ्या प्रमाणात होण्यासाठी याबाबत अभ्यास करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असेही फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन केल्यानंतर देशात सहकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणांचे वारे वाहू लागले आहेत.तर सहकार चळवळीच्या आतापर्यंतच्या इतिहासावर महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेने अहवाल तयार करावा, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सहकार चळवळ खूप पुढे गेली आहे. मात्र भविष्यातील संकट आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी या चळवळीला अधिक बळकट करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रात सध्या अस्तित्वात असले कंपनी कायदा, सहकार क्षेत्रातील कायदा यांचा सुवर्णमध्य साधून एक नवीन कायदा आणावा, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

## जामश्री रिअलटी लिमिटेड

सीआयएनः L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालयः फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर, महाराष्ट्र - ४१३ ००१
इमेल आयडीः jammill1907@gmail.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार दि. २० मे २०२५ रोजी ६०१-बी, ६वा मजला, मोतीमहल, १९५ जे. टी. रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० येथे संध्याकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) इतर गोष्टींसह ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या चौथी तिमाही आणि वर्षा च्या कालावधी करीताचा कंपनीचे लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ग्राह्य धरण्यासाठी आणि संमत करण्यासाठी घेण्यात येणार आहे.

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही/-
राजेश दमाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

तारीख : १२.०५.२०२५
ठिकाण : सोलापूर

## अक्कलकोट नगर परिषद, जि. सोलापूर

फोन नं. ०२१८१-२२०२५३ इ-मेल आयडी- comcakkalkot123@gmail.com
जा.क्र./अनप/कावि/विवि/२०२५/१५० दि. ०९/०५/२०२५

### निविदा सूचना

अक्कलकोट नगर परिषद न. प. निधी व इतर शासकीय निधी अंतर्गत खालील दर्शविलेल्या कामासाठी अनुभवी नोंदणीकृत कंत्राटदाराकडून/निविदाधारकाकडून निविदा मागवीत आहे. कोरे निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून दि. २१/०५/२०२५ पर्यंत कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत खालीलप्रमाणे निश्चित किमत जमा केल्यानंतर न. प. कार्यालयात विद्युत विभागाकडे विकत मिळतील.

१) कंत्राटदाराने मोहरबंद निविदा दोन लिफाफा पद्धतीत मुख्याधिकारी नगर परिषद अक्कलकोट यांच्याकडे दिनांक २१/०५/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात. २) निविदासोबत बयाना रक्कम रोख जमा करणे आवश्यक आहे. ३) जमा केलेल्या बयाना रकमेचा पावती क्रमांक सीलबंद लिफाफ्यावर नमूद करावा ४) प्राप्त झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी ठीक ०५.०० वाजता मा. मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्या दालनात समक्ष उघडण्यात येतील. ५) पात्र निविदा धारकाच्या बिलातून अनामत रक्कम, आयकर, GST, कामगार उपकर इ. बाबींची रक्कम नियमानुसार कपात करण्यात येईल. ६) इतर अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून विद्युत विभागात पहावयास मिळतील. ७) कोणतीही निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार न. प. ने राखून ठेवला आहे. ८) निधी उपलब्धतेनुसार कामाचे देयक प्रदान करण्यात येईल याची नोंद घेऊन निविदा प्रक्रियेत सहभाग घ्यावा.

| अ. क्र. | कामाचा तपशील | अंदाजपत्रक रक्कम | बयाना रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म फीस | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अक्कलकोट शहर हद्दीतील पोल शिफ्टींग करणे व खत डेपो येथे लाईट फिटींगचे काम करणे. | ३,८४,७८८/- | ७,७००/- | ३०,८००/- | ५९०/- | ४५ दिवस |

सही/-
डी. एस. शेळके
विद्युत अभियंता
अक्कलकोट नगर परिषद

सही/-
आर. डी. डाके
मुख्याधिकारी तथा प्रशासक
अक्कलकोट नगर परिषद

## उपनिबंधक, सहकारी संस्था, शहर, सोलापूर यांचे कार्यालय

**सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था. नि.. सोलापूर - ४१३००३**

फोन क्र.०२१७-२६०२८४० ईमेल-dyescitysolapur@gmail.com

### जाहीर प्रकटन

क वर्गातील खालील सहकारी संस्थांचा संचालक मंडळ निवडणूक सन 2022-23 ते 2027-28 साठीचा निवडणूक कार्यक्रम संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सविस्तर पणे संस्थेच्या नोटीस बोर्डावर व या कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेला आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी |
|---|---|---|
| १ | सोलापूर सेवासदन संस्था सेवक वर्ग सहकारी पतपेढी नि., सोलापूर | श्री.डी.पी. सुरवसे, सहाय्यक, सहकारी अधिकारी |
| २ | उमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या क्रं. 12A सोलापूर | श्री. व्ही.टी. चवरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1 |
| ३ | ललिता महिला सर्व व्यवसायी ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर | श्री. एस.व्ही. कोरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1. |
| ४ | शिवशंकर सर्व व्यवसायी सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | कु.एस.एस. मलवे, सहकारी अधिकारी श्रे-2 |
| ५ | तांत्रिक कामगार युनियन कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | श्री. व्ही.टी. चवरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1 |
| ६ | जिजामाता महिला सहकारी घाऊक व किरकोळ ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | श्रीमती. एस. जे. काटे. मुख्य लिपिक |
| ७ | वैभवलक्ष्मी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | कु.एस.एस. मलवे, सहकारी अधिकारी श्रे-2 |
| ८ | सोलापूर शहर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा कृती समिती शालेय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | श्री.डी.पी. सुरवसे, सहाय्यक सहकारी अधिकारी |
| ९ | उमादेवी महिला सर्व व्यवसायी ग्राहक सहकारी संस्था मर्या.. सोलापूर | कु.एस.एस. मलवे, सहकारी अधिकारी श्रे-2 |
| १० | माऊली अर्बन को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर | श्री. व्ही.टी. चवरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1 |
| ११ | किशोर कन्जुमर को-ऑप. सोसायटी सोलापूर | श्रीमती. एस. जे. काटे. मुख्य लिपिक |
| १२ | जुनी मिल चाळ (विरचंदपुर) चाळ व भाडेकरु सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या., सोलापूर | श्रीमती. एस. जे. काटे. मुख्य लिपिक |
| १३ | भाग्यलक्ष्मी मागसवर्गीय सर्व व्यवसायी सहकारी ग्राहक संस्था मर्या., सोलापूर | श्री. एस. व्ही. कोरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1 |
| १४ | विठ्ठल रुक्मिणी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | श्री.डी.पी. सुरवसे, सहाय्यक, सहकारी अधिकारी |
| १५ | एमएससीबी एमप्लॉईज कन्जुमर को. ऑप सोसा लि. सोलापूर (सोलापूर जिल्हा विदुत कामगार ग्राहक सहकारी संस्था मर्या., सोलापूर) | श्री. एस. व्ही. कोरे, सहकारी अधिकारी श्रेणी-1 |

**सदर निवडणूकीसाठीचे महत्वाचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.**

| नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती दिनांक व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी | उमेदवारी मागे घेणे दिनांक व वेळ | मतदान घ्यावयाचा दिनांक वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. 14/05/2025 ते 20/05/2025 वेळ स.11.00 ते दु. 3.00 या. पर्यंत | दि. 21/05/2025 वेळ स. 11.00 ते दु. 2.00 पर्यंत वेळ दु. 3.00 ते 5.00 पर्यंत | दि. 22/05/2025 ते दि. 05/06/2025 वेळ स. 11.00 ते दु. 3.00 वा. पर्यंत | दि. 14/06/2025 (अ.क्र. 1,2,3,4,5, 6. व 12.) वेळ स. 8.00 ते 4.00 वाजेपर्यंत तसेच दिनांक 15/06/2025 (अ.क्र. 7, 8,13 |
| दि. 15/05/2025 ते 21/05/2025 वेळ स.11.00 ते दु. 3.00 वा. पर्यंत | दि. 22/05/2025 वेळ स. 11.00 ते दु. 2.00 पर्यंत | दि. 23.05.2025 ते दि. 06.06.2025 वेळ स. 11.00 ते दु. 3.00 वा. पर्यत | तसेच दिनांक 21/06/2025 (अ.क्र. 9, 10, 11, 14 व 15) वेळ स. 8.00 ते 4.00 वाजेपर्यत ठिकाणी नंतर प्रसिध्द करण्यात येईल. |

स्थळ:- सोलापूर
दिनांक :- 08/05/2025

सही/-
(डॉ. प्र. अ. बागल)
तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर

## महत्त्वाचे

### प्रज्ञानंदसह तिघांना आघाडी

**बुचारेस्ट** : येथे आयोजित ग्रॅण्ड चेस टूरचा भाग असलेल्या सुपरबेट क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीनंतर भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने अन्य दोघांसोबत संयुक्त आघाडी मिळविली असून तो सहाव्या फेरीत काळ्या सोंगट्यानिशी पोलंडच्या डुडा-जान-किर्जिस्टोफविरुद्ध खेळेल. प्रज्ञानंदने या स्पर्धेत आतापर्यंत तिसऱ्या फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हविरुद्ध एकमेव विजय नोंदविला असून उर्वरित पाच डाव बरोबरीत राखले. प्रज्ञानंदने संभाव्य पाचपैकी ३ गुणांची कमाई केली असून तो अमेरिकेच्या फॅबियानो कारूआना व फ्रान्सच्या मॅक्झिम व्हॅचियर-लॅग्रेव्हसोबत संयुक्तपणे आघाडीवर आहे. सर्वात युवा बुद्धिबख विश्वविजेता डी. गुकेशने चार लढती बरोबरीत राखल्या व एक सामना गमावला. दहा खेळाडूंच्या या राऊंड रॉबिन बुद्धिबळ स्पर्धेत अमेरिकेचे लेव्हॉन ॲरोनियन व वेसले सो, डीक बोगदान डॅनियल (रोमानिया) व फिरौझा अलिरेझा (फ्रान्स) हे प्रत्येकी २.५ गुणांसह संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे. डी. गुकेश अब्दुसत्तोरोव्ह, फॅबियानो कारूआना व मॅक्सिम व्हॅचियर-लॅग्रेव्ह हे तिघे संयुक्तपणे आघाडीवीर आहेत.

### दुबई पॅरा-बॅडमिंटनमध्ये भारताने जिंकली १९ पदके

**दुबई** : शिवराजन सोलाईमलाई आणि सुदर्शन सरवणकुमार मुथुस्वामी यांनी एकमेव सुवर्णपदक जिंकले. भारतीय बॅडमिंटनपटूंनी सहाव्या फज्जा पॅरा-बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय- दुबई २०२५ मध्ये १९ पदके जिंकून चांगली कामगिरी केली. या स्पर्धेत दक्षिण कोरिया ६ सुवर्णपदकांसह पदकतालिकेत अव्वल राहिला. पदकतालिकेत कोरियानंतर, मलेशियाने तीन सुवर्णपदके जिंकली तर तुर्की, भारत, इंग्लंड आणि इंडोनेशियानेही प्रत्येकी एक सुवर्णपदक जिंकले. रविवारी येथील शबाब अल अहली क्लबमध्ये संपलेल्या या स्पर्धेत तुर्की, भारत, इंग्लंड आणि इंडोनेशियानेही प्रत्येकी एक सुवर्णपदक जिंकले. भारतासाठी शिवराजन सोलाईमलाई आणि सुदर्शन सरवणकुमार मुथुसामीने पुरुष दुहेरीच्या ६ अंतिम फेरीत त्यांच्या अव्वल मानांकित प्रतिस्पर्ध्यांकडून पुढे चाल मिळाल्यानंतर पुरुष एकेरीच्या ६ अंतिम फेरीत प्रतिस्पर्धी खेळाडूंना दुखापत झाली होती. एकूणच, भारताला १९ पदके मिळाली, ज्यात चार रौप्य आणि १४ कांस्यपदकांचा समावेश आहे. उमेश विक्रम कुमारला एसएल ३ एकेरी आणि पुरुष दुहेरीच्या दोन अंतिम सामन्यांमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर हार्दिक मक्कर आणि रुथिक रघुपती या जोडीला अव्वल मानांकित मलेशियन चियाह लाइक हौ आणि मुहम्मद फरीज अनुअर यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.

### महिला प्रो-लीग हॉकी भारतीय संघाची घोषणा

**नवी दिल्ली** : जूनमध्ये होणाऱ्या महिला प्रो-लीग हॉकीच्या युरोपियन लेगसाठी भारताने सोमवारी २४ सदस्यीय संघाची घोषणा केली. भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार म्हणून मिडफिल्डर सलीमा टेटे कर्णधार असेल. भारत १४ ते २९ जून दरम्यान लंडन, ॲण्टवर्प आणि बर्लिन येथे ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, बेल्जियम आणि चीनविरुद्ध प्रत्येकी दोनदा खेळेल. भारत १४ जून रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. अनुभवी फॉरवर्ड नवनीत कौर या कामगिरीदरम्यान सलीमाची उपकर्णधार असेल. संघात गोलरक्षक सविता व बिचू देवी खरीबाम यांचा समावेश आहे. अनुभवी सुशीला चानू पुख्रम्बम, ज्योती, सुमन देवी थौदम, ज्योती सिंग, इशिका चौधरी आणि ज्योती छत्री हे बचावफळीचे नेतृत्व करतील. मिडफिल्डवर वैष्णवी विठ्ठल फाळके, सुजाता कुजूर, मनीषा चौहान, नेहा, सलीमा, लालरेमसियामी, शर्मिला देवी, सुनीलिता टोप्पो आणि महिमा टेटे लक्ष ठेवतील. दीपिका, नवनीत, दीपिका सोरेंग, बलजीत कौर, रुताजा दादासो पिसाळ, ब्युटी डुंगडुंग आणि साक्षी राणा यासारख्या खेळाडू आक्रमक फळीची जबाबदारी सांभाळतील. राखीव खेळाडूंमध्ये गोलरक्षक बन्सारी सोलंकी आणि डिफेंडर अजमिना कुजूर यांचा समावेश आहे.

### बिली जीन किंग चषक, इटली-चीन लढत

**शेन्झेन** : गतविजेता इटली आपले बिली जीन किंग चषक स्पर्धेचे विजेतेपद कायम राखण्यसाठी सप्टेंबर महिन्यात शेन्झेन येथे यजमान चीनविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीत झुंजणार आहे. मालागा येथे झालेल्या अंतिम फेरीत स्लोवाकियाला हरवून गेल्या वर्षी महिला संघ स्पर्धेत पाचवे विजेतेपद जिंकणाऱ्या जास्मिन पाओलिनीचा संघ उपांत्य फेरीत युक्रेन किंवा स्पेनशी सामना करू शकतो. ड्रॉच्या दुसऱ्या बाजूला, उपांत्यपूर्व फेरीत अमेरिका कझाकस्तानविरुद्ध आणि जपान विरुद्ध ग्रेट ब्रिटन यांचा सामना होईल. शेन्झेन नोव्हेंबरपासून पुढे आणलेल्या अंतिम फेरीचे आयोजन करत आहे आणि किमान २०२७ पर्यंत असेच राहील. पुरुषांच्या डेव्हिस चषक अंतिम फेरीच्या अनुषंगाने या स्पर्धेत १२ संघांवरून आठ संघांचा समावेश करण्यात आला आहे. बिली जीन किंग चषक स्पर्धेचा अंतिम फेरीचे सामने १६ सप्टेंबर रोजी सुरू होतील आणि अंतिम सामना २१ सप्टेंबर रोजी खेळवला जाईल.

# क्रिकेट जगताकडून कोहलीचे अभिनंदन



**नवी दिल्ली, १२ मे**

विराट कोहलीची कसोटी निवृत्ती ही 'एका युगाचा अंत' आणि 'महाकाव्य कारकिर्दीची समाप्ती' आहे, असे क्रिकेट जगताने सोमवारी म्हटले आणि आधुनिक काळातील या भारतीय महान खेळाडूचे कौतुक केले.

३६ वर्षीय कोहलीने सोमवारी कसोटी क्रिकेटमधून आपली निवृत्ती जाहीर केली. १२३ सामन्यांमध्ये ४६.८५ च्या सरासरीने ३० शतकांसह ९२३० धावा केल्या. तो आता केवळ एकदिवसीय सामन्यांमध्ये खेळेल, गेल्या वर्षी टी आंतरराष्ट्रीय सामन्यांमधून आधीच निवृत्त झाला होता.

'कसोटी क्रिकेटमध्ये एका युगाचा अंत झाला, पण वारसा कायमचा चालू राहील! टीम इंडियाचा माजी कर्णधार कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत आहे, असे बीसीसीआयने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.'टीम इंडियासाठी त्याचे योगदान कायमचे जपले जाईल!'

मला कोहलीची नेहमी आठवण येईल, तो ध्येयवेडा आहे, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले.

जागतिक प्रशासकीय मंडळ आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) कोहलीचे भारतातील महान कसोटी खेळाडूंपैकी एक म्हणून कौतुक केले.

'भारतातील महान कसोटी खेळाडूंपैकी एकाने कसोटी क्रिकेटमध्ये बराच कालावधी घालवला. श्वेतवस्त्र उतरवले, मुकुट अबाधित. विराट कोहलीने कसोटी क्रिकेटला निरोप दिला, एक अतुलनीय वारसा मागे सोडला, असे आयसीसीने म्हटले आहे.

उत्कृष्ट कसोटी कारकिर्दीबद्दल कोहलीचे अभिनंदन. टी-२० क्रिकेटच्या उदयादरम्यान शुद्ध स्वरूपाचे विजेतेपद मिळवल्याबद्दल आणि शिस्त, तंदुरुस्ती आणि वचनबद्धतेमध्ये एक असाधारण उदाहरण मांडल्याबद्दल धन्यवाद. लॉर्ड्सवरील तुमच्या भाषणाने सर्व काही सांगितले - तुम्ही मनापासून, धैर्याने आणि अभिमानाने कसोटी खेळलात, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह यांनी लिहिले.

कोहलीच्या आयपीएल संघ रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने (आरसीबी) म्हटले आहे की, त्यांना कसोटी क्षेत्रातील स्टार खेळाडू आणि माजी कर्णधाराची आठवण येईल. आम्हाला त्या सर्वांची आठवण येईल. एका स्मारकीय कसोटी युगाचा पडदा पडतो. पण त्याचा वारसा अजूनही जिवंत आहे, काळाच्या ओघात कोरलेला आणि अभिमानाने कोरलेला आहे. विराट कोहलीला त्याच्या धाडसाबद्दल, शौर्याबद्दल आणि अतुलनीय उत्कटतेबद्दल धन्यवाद. तू केवळ हा फॉरमॅट खेळला नाहीस, तर तो उंचावलास, असे जय शाह म्हणाले.

दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्सनेही कोहलीची स्तुती केली. अजिंक्य रहाणे, युवराज सिंग, चेतेश्वर पुजारा, संजय मांजरेकर, माजी फिरकी गोलंदाज हरभजन सिंग यांनी कोहलीने रेड-बॉल क्रिकेटमध्ये आणलेल्या उत्साह आणि समर्पणावर प्रकाश टाकला.

कसोटी क्रिकेटने तुमच्यातील लढाऊ खेळाडू बाहेर काढला आणि तुम्ही त्याला सर्वकाही दिले! असे युवराजने लिहिले. माजी भारतीय क्रिकेटपटू आणि समालोचक यांनी कोहलीच्या कसोटी क्रिकेटवरील वचनबद्धतेचे कौतुक केले. आधुनिक क्रिकेट युगातील सर्वात मोठा ब्रँड ज्याने क्रिकेटच्या सर्वात जुन्या फॉरमॅटसाठी सर्वस्व दिले. कसोटी क्रिकेट हे विराट कोहलीचे ऋण आहे,'' मांजरेकर यांनी ट्विट केले. कोहलीच्या नेतृत्वाखाली कसोटी पदार्पण करणारा भारताचा आघाडीचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने कृतज्ञता व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

# ऑस्ट्रेलियन खेळाडूंचा भारतात परतण्यास नकार

## खेळाडूंच्या निर्णयाला क्रिकेट ऑस्ट्रेलियाचा पाठिंबा

**मेलबर्न, १२ मे**

भारत-पाकिस्तान तणावमुळे एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आल्यानंतर आपल्या मायदेशी परतलेले खेळाडू आता पुन्हा आयपीएलसाठी भारतात येऊ इच्छित नाही. ऑस्ट्रेलियन खेळाडूंच्या या निर्णयाला क्रिकेट ऑस्ट्रेलियाने आपला पाठिंबा दर्शविला आहे.

आयपीएलमधील विविध संघांतील ऑस्ट्रेलियन खेळाडू आधीच आपल्या घरी पोहचले आहे. केवळ रिकी पॉण्टिंग, ब्रॅड हॅडिनसारखे काही माजी खेळाडू अजूनही भारतात मुक्कामास आहे. ते प्रशिक्षण चमूतील सदस्य आहे. अन्य प्रशिक्षक जस्टीन लँगर व माईक हसी हे सुद्धा मायदेशी परतले आहे. शनिवारी युद्धबंदीची घोषणा झाल्यानंतर एका आठवड्यात आयपीएल पुन्हा सुरु करण्याचा बीसीसीआयचा विचार आहे. विविध फ्रॅन्चायझींनी आपापल्या संघातील विदेशी खेळाडूंना भारतात परतण्यास सांगितले आहे.

परंतु काही ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी पुन्हा आयपीएल खेळण्यास नकार दिला आहे. द्विधा मनःस्थितीत सापडलेल्या ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी भारतात परतण्यास नकार दिला आहे. खेळाडूंच्या या निर्णयाला क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पाठिंबा दिला आहे, असे दी सिडनी मॉर्निंग हेराल्डच्या वृत्तात म्हटले आहे.

ट्रॅव्हिस हेड, मिचेल स्टार्क, कर्णधार पॅट कमिन्स व सहकारी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड सारखे कसोटीपटू दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यासाठी इंग्लंकडे रवाना होण्यापूर्वी काही वेळ घरी घालवू इच्छित आहे. वेस्ट इंडीजविरुद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेनंतर लगेच हा अंतिम सामना खेळला जाणार आहे (वृत्तसंस्था)

# बार्शी व मास्टर्स संघाची विजयी सलामी

### बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट

### तन्मय वाघमोडे, विघ्नेश गवळी सामनावीर



**सोलापूर, दि. १२ मे-**

बंदपट्टे चषक १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत हायपरफॉर्मन्स बार्शी व मास्टर्स संघाने विजयी सलामी दिली.

मास्टर्स अकादमीने आयोजित केलेली ही स्पर्धा दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू झाली. या स्पर्धेत सलामीच्या सामन्यात बार्शीच्या हायपरफॉर्मन्स संघाने मॉडेल क्रिकेट अकादम ीवर चार धावांनी मात केली. नाबाद अर्धशतक करणारा तन्मय वाघमोडे सामन्याचा मानकरी ठरला. दुसऱ्या सामन्यात युनायटेड क्रिकेट क्लबविरुद्धच्या सामन्यात पावसाच्या व्यत्ययामुळे डकवर्थ नियमानुसार मास्टर्स संघाला विजयी घोषित करण्यात आले. सामनावीर विघ्नेश गवळी (नाबाद ३५) ठरला. पंच म्हणून नबीलाल पटेल व मोहसिन शेख तर गुणलेखक म्हणून राजवर्धन जिल्हा यांनी काम पाहिले. या स्पर्धेचे उद्घाटन राजू बंदपट्टे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी राकेश उदगिरी, स्पर्धेचे आयोजक राजेश येमुल व दत्तात्रय बडगू उपस्थित होते.

**संक्षिप्त धावफलक :**

**एच.पी.सी.सी., बार्शी** : २८ षटकात ४ बाद १८७ (तन्मय वाघमोडे नाबाद ५६, हर्ष जगताप ५४, अर्जुन काळे २-२४) वि. वि. **मॉडेल अकादमी** : २८ षटकात ७ बाद १७४ (आध्या पाटील ५७, पूर्णचंद्रा नाबाद ५३, आदित्य चटके ३-२०, तन्मय वाघमोडे ३-२७).

**युनायटेड अकादमी** : २८ षटकात ६ बाद १३७ (वरद चिपडे नाबाद २०, नयनीश गारमपल्ली नाबाद २० धावा, कुशाग्रह वागज १-२६) पराभूत विरुद्ध **मास्टर्स संघ** : १६.४ षटकात १ बाद १११ धावा केला (धनराज बंदपट्टे नाबाद ४०, विघ्नेश गवळी नाबाद ३५).

**आज होणारे सामने**

मॉडेल विरुद्ध युनायटेड मास्टर्स विरुद्ध एचपीसीसी, बार्शी

# महाराष्ट्राचा महिला बास्केटबॉल संघ उपांत्य फेरीत

### यजमान बिहार संघाचा १०३ गुणांनी धुव्वा

**पाटणा, १२ मे**

महाराष्ट्र महिला बास्केटबॉल संघाने सलग दोन सामने जिंकून ७ व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत उपांत्य फेरीतील धडक मारली आहे.

पाटीलपुत्र क्रीडा संकुलात सुरू असलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत पहिल्या सामन्यात महाराष्ट्र संघाने केरळ संघाचा ७२-५९ गुणांनी पराभव केला. महाराष्ट्र संघाकडून त्विशा शर्मा २५ गुण, रेवा कुलकर्णी १२ गुण, वैष्णवी परदेशी ११ गुण, आर्या फटांगरे ९ गण, रिशिता कुलकर्णी ७ गुण, हर्षला पाटील ६ गुण यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मध्यंतराला महाराष्ट्राचा संघ ३३ विरुद्ध ३० अशा तीन गुणांनी पिछाडीवर होता. उत्तरार्धात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपला खेळ उंचावत संघाला १३ गुणांनी विजेतेपद प्राप्त करून दिले. अन्य सामन्यात महाराष्ट्र संघाने यजमान बिहार संघाचा १०३ गुणांनी धुव्वा उडवत ११८ विरुद्ध १५ असा विजय मिळवला. महाराष्ट्र संघाकडून तनवी जाधव १९ गुण, रेवा कुलकर्णी १८ गुण, साईशा भगत १८ गुण, वेदिका सिंग १७ गुण यांनी मोलाची कामगिरी बजावली. उद्या महाराष्ट्राचा संघ पंजाब विरुद्ध आपल्या गटातील अंतिम सामना खेळेल. प्रशिक्षिका मुद्रा अग्रवाल तसेच सहप्रशिक्षक शिवछत्रपती पुरस्कार विजेते शत्रुघ्न गोखले यांचे संघाला मार्गदर्शन मिळत आहे. गत तामिळनाडू स्पर्धेत महाराष्ट्राने कांस्यपदक जिंकले होते. (वृत्तसंस्था)





# तायक्कांदो स्पोर्टस कौन्सिलचे कलर बेल्ट व प्रमाणपत्र प्रदान

**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापूर जिल्हा तायक्कांदो स्पोर्टस कौन्सिलच्या वतीने आयोजित कलर बेल्ट व प्रमाणपत्र प्रदान समारंभ नुकताच भाजपाचे जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांच्या हस्ते झाले.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिखर बँक मुंबई अध्यक्ष अविनाश महागांवकर, सोलापूर तायक्कांदो असोसिएशन अध्यक्ष मोहन भूमकर, शिवदारे महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री पाटील, सोमशेखर भोगडे, मंजूर शेख, प्रतीक्षा खंडाळकर आदी उपस्थित होते.

# युनायटेड क्लबला हरवून बार्शीची विजयी सलामी

### किरण पवार करंडक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धा



**सोलापूर, दि. १२ मे-**

किरण पवार करंडक १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत बार्शी येथील एचपीसीसी संघाने सोलापूरच्या युनायटेड क्रिकेट क्लबचा आठ गडी राखून पराभव करीत विजयी सलामी दिली.

डॅनिश केक पुरस्कृत सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेली ही स्पर्धा येथील डॅनिश केकचे मालक प्रदीप सलगर यांनी पुरस्कृत केली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन येथील भंडारी मैदानावर उद्योगपती शोभाकुमार ठाकूर यांचे हस्ते झाले. यावेळी सोलापूर जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष बसवराज सलगर, आयपीएल पंच अनिस सहस्त्रबुद्धे, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेंबरसो, उपाध्यक्ष प्रकाश भुतडा, टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन संजय वडजे, १६ व १९ वर्षाखालील निवड समितीचे चेअरमन सुनील मालप, १४ वर्षाखालील निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे, टूर्नामेंट कमिटी सदस्य ऋत्वीज चव्हाण आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन शिवानंद अकलूजकर यांनी केले. या स्पर्धा सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन रणजीतसिंह मोहिते पाटील, व्हॉइस चेअरमन श्रीकांत मोरे, माजी अध्यक्ष दत्ता सुरवसे व सचिव धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत.

**संक्षिप्त धावफलक :**

**युनायटेड क्रिकेट क्लब** : सर्व बाद १०१ धावा (आयुष साळवे ४२, श्रीराज गवळी १४, अभिजीत सिंग ५-१४, हर्षराज देशमुख ३-१७) पराभूत विरुद्ध **एचपीसीसी बार्शी** : दोन बाद १०२ (गौरव फुले नाबाद ३२, प्रथमेश थावरे २९, मनीष १६, प्रथमेश चमकेश्वरा १-२४, श्रीराज गवळी १-२९)

**आजचा सामना : मास्टर क्रिकेट क्लब विरुद्ध भंडारी क्रिकेट क्लब**

# मानांकित पंगुडवालेस बिगरमानांकीत भोसलेने बरोबरीत रोखले

### जीएच रायसोनी मेमोरियल चषक बुद्धिबळ स्पर्धा



**सोलापूर, दि. १२ मे-**

'जीएच रायसोनी मेमोरियल चषक' बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात येथील आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त विजय पंगुडवाले यास बिगरमानांकित शिवाजी भोसले याने बरोबरीत रोखून स्पर्धेत खळबळजनक निकाल नोंदविला.

जीएच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन, कल्पना प्रकाश वेल्फ अर फाउंडेशन व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीत केलेल्या खुल्या तसेच ११ वर्षाखालील मुले व मुलींच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पुण्याचा आंतरराष्ट्रीय कँडिडेट म ास्टर प्रथमेश शेरला, सोलापूरचा मानस गायकवाड, पुण्याचा ओम लामकाने, बार्शीचा शंकर साळुंके, सागर गांधी, लातूरचा अथर्व रेड्डी, आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे, सृष्टी गायकवाड, वेदांत मुसळे यांच्यासह २९ आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली. जुळे सोलापूर येथील टाकळीकर मंगल कार्यालय येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत सोलापुर शहरासह माळशिरस, करमाळा, पंढरपुर, मंगळवेढा, बार्शी, अक्कलकोट, माढा तसेच पुणे, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील १४१ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. ११ वर्षाखालील गटात श्रेयस कुदळे, हर्ष जाधव, श्लोक चौधरी, हिमांशु व्हानगावडे, बार्शीची पृथा ठोंबरे, माळशिरसची अनन्या बाळापुरे या मानांकित खेळाडूंनी देखील उत्कृष्ट खेळ करत विजय नोंदविले. तत्पूर्वी स्पर्धेचे उद्घाटन किरियाड हॉटेल उद्योग समूहाचे महाव्यवस्थापक दर्शन सिंग व शिवा कंट्रक्शनचे मालक शिवानंद चीनगुंडे यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. अध्यक्षीय मनोगतात दर्शन सिंग यांनी पालकांनी खेळाडूंना मोबाईल पासून परावृत्त करून बुद्धिबळ सारख्या बौद्धिक क्षमतेच्या विकास साधणाऱ्या खेळाकडे प्रोत्साहित करावे असे आवाहन करत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, भरत वडीशेरला, अभिजित बावळे, यश इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले.

# महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत बोटिंगचा समावेश करावा



**सोलापूर, दि. १२ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धे त कॅनोइन काय किंग (स्पोर्ट्स बोटिंग) क्रीडा प्रकाराचा समावेश करावा अशी मागणी मागणी भारतीय संघटनेचे जॉईंट सेक्रेटरी व महाराष्ट्र संघटनेचे सचिव दत्ता पाटील यांनी केली आहे.

ऑलिंपिक दर्जाचा व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धे त कॅनॉइन व कायकिंग हा खेळ आहे. तसेच शासनाच्या पाच टक्के नोकरीच्या आरक्षणामध्येही याचा समावेश आहे. त्यामुळे याचे निवेदन विद्यापीठ क्रीडा संचालक व प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांना देण्यात आले. यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य प्रा.संतोष गवळी, सोलापूर जिल्हा कॅनॉइग व कायकिंग चे सचिव दिपक चिकणे, महावीर आखाडे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## वळसंगमध्ये बुध्द पौर्णिमेनिमित्तच्या शिबीरात २८ जणांचे रक्तदान

**वळसंग, दि. १२ मे-**
वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे बुध्द पौर्णिमा निमित्त झालेल्या शिबीरात २८ जणांनी रक्तदान केले. येथील भिम नगर ऐतिहासिक बावडी (विहीर) स्मारकात हे शिबीर झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूरच्या मल्लिकार्जुन ब्लड सेंटरने रक्तसंकलन केले. मंडळातील सर्व पदाधिकारी व भिमनगर मधील सर्व बांधव असे २८ जणांनी रक्तदान केले. उत्सव मंडळाचे अध्यक्ष अक्षय गायकवाड, खजिनदार मोहन गायकवाड, माजी जि.प.सदस्य संजय गायकवाड, सिध्दाराम वाघमारे, संतोष गायकवाड, अनिल गायकवाड, अंकुश कांबळे, मसाजी गायकवाड, मेजर करन गायकवाड व सर्व भिमसैनिक उपस्थित होते.



## कल्याणशेट्टी महाविद्यालयात बुद्ध पौर्णिमेनिमित्त अभिवादन

**अक्कलकोट, दि. १२ मे-**
येथील मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात बुद्ध पौर्णिमानिमित्त अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशनतर्फे झालेल्या कार्यक्रमास मल्लिनाथ कल्याणशेट्टी, अंबणप्पा भंगे, मलकप्पा भरमशेट्टी, कॉमर्स असोसिएशन प्रमुख प्रा. शिल्पा धुमशेट्टी, प्रा. शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी, शरणय्या मसुती, रवींद्र कालीबत्ते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ बाळासाहेब पाटील यांनी केले. गौतम बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महानिर्वाण या तिन्ही घटना पौर्णिमेला घडल्या त्यांच्या जीवनात हा अपूर्व योग आला. मानवाने जीवनात शांततेचा मार्ग स्वीकारला पाहिजे असा संदेश भगवान गौतम बुद्धांनी दिला. परंतु आज युद्धाचा मार्ग अवलंबला जात आहे. ही घटना मानवतेला विनाशाकडे घेऊन जाणारी आहे. त्यामुळे युद्ध नको बुद्ध हवा असे मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी सांगितले. शिल्पा धूमशेट्टी यांनी आभार मानले.

## पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी घेतले श्री स्वामी समर्थांचे दर्शन

**अक्कलकोट, दि १२ मे-**
येथील श्री वटवृक्ष निवासी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मंदिरात आज पौर्णिमेनिमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती. हजारो भाविकांनी दर्शन घेतले. पहाटे ५ वाजता श्रींची काकड आरती नैवेद्य आरती संपन्न झाली. पहाटेपासूनच सर्व पुरुष व महिला भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात आले. श्री स्वामी समर्थांचे अनेक भक्त दर पौर्णिमेला अक्कलकोटची वारी करतात. सुलभ स्वामी दर्शनासाठी मंदिर समितीच्यावतीने चेअरमन महेश इंगळे यांनी विविध उपाय योजना राबविल्या आहेत. काही दिवसांपासून श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात पुरुष व महिला स्वामी भक्तांना वेगवेगळ्या रांगेतून दर्शनास सोडण्यात येत आहे. वयोवृद्ध व विकलांग भाविकांना व्हीलचेअरची सोय असून स्वतंत्र दर्शन व्यवस्था आहे. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, सेक्रेटरी आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे, श्रीपाद सरदेशमुख, सिद्धाराम कुंभार, ऋषिकेश लोणारी आदींसह सेवेकऱ्यांनी उपस्थित सर्व स्वामी भक्तांच्या सुलभ स्वामी दर्शनासाठी परिश्रम घेतले.



## निधन वृत्त...

### प्रमिला शिंदे



**सोलापूर, दि.१२ मे-**
उळेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील इंदिरानगरमधील रहिवाशी प्रमिला शिंदे यांचे आज दि. १२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी ९ वाजता अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, तीन विवाहीत मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### भागवत गायकवाड



**अकलूज, दि. १२ मे-**
जुन्या पिढीतील आंबेडकर चळवळीतील एक निष्ठावंत कार्यकर्ता भागवत केरू गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षाचे होते. सोलापूर जिल्ह्यात त्यांची निळी टोपी प्रसिद्ध होती. त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाचे काम केले होते. माळशिरस तालुका, जिल्हा ते पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणीवर एक पदाधिकारी म्हणून त्यांनी आयुष्यभर पक्षाचे काम केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना दलित मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# सैन्याच्या सन्मानार्थ अक्कलकोटमध्ये तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१२ मे-**
भारतीय सैनिकांचा विजय असो ! भारतचा विजय असो! बहादुर सैनिक को सलाम ! अमर रहे! अमर रहे! शहीद जवान अमर रहे चा जयघोष करीत भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ वंचीत बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मंडीखावे यांच्या नेतृत्वात तिरंगा रॅली काढण्यात आला.




भारत देशात संध्या भारत-पाकिस्तान युध्द चालू असताना भारत देशाने जो युध्दामध्ये पाकिस्तान देशाला जी धूळ चारली त्याबददल भारतीय सैन्याचे अभिनंदन करण्यासाठी सोलापूर चार हुतात्मा चौक येथे जिल्हयातील सर्व तालुका अध्यक्ष व महिला आघाडी, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याप्रसंगी भारतावर दहशवादी हल्ला झाल्यावर भारतीय सैन्याने त्याचा चोख प्रतीउत्तर दिले. त्याबददल वंचीत बहुजन आघाडी कडून अभिनंदन करण्यात आले.

सदर रॅलीत शहर अध्यक्ष प्रशांत गोणेवार, विनोद इंगळे, अनिरुध्द वाघमारे, संजय हरीजन, श्रीनिवास संगेपाग, विक्रांत गायकवाड, पल्लवी सुरवसे, सरिफ शेख, प्रफुल दुपारगुडे, विजय गायकवाड, वेगवई राजमन्तिक हितम, रधि शोनात. देशमुख, शंकर जिंद आदि पदाधिकारी उपस्थित होते.



# करमाळ्याच्या कर्करोग शिबिरात २५६ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१२ मे-**
येथील उपजिल्हा रुग्णालयात झालेल्या कर्करोग जनजागृती मोहीम शिबीरात २५६ रूग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन आमदार नारायणआबा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आदिनाथ कारखान्याचे संचालक डॉ. अमोल घाडगे, उपजिल्हा रुग्णालयाचे रुग्ण कल्याण समितीचे सदस्य फारूक जमादार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन गुंजकर, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. काटकर, करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे, स्त्री रोग तज्ञ डॉ. स्मिता बंडगर, जयंत दळवी, विशाल परदेशी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक वैद्यकीय अधीक्षक डॉ. गजानन गुंजकर यांनी केले. यावेळी डॉ. अमोल घाडगे, डॉ. कविता कांबळे आदींनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी आमदार पाटील यांनी कर्करोगाला घाबरून न जाता लवकर निदान करून उपचार करण्याबाबत आवाहन केले तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सोयी सुविधांबाबत शासना कडे पाठपुरावा करु असे आश्वासन दिले. शिबीरासाठी अत्याधुनिक कॅन्सर व्हॅन उपजिल्हा रुग्णालय येथे उपलब्ध करण्यात आली होती. या शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ.बंडगर यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. दंतरोग चिकित्सक डॉ. गोरक्षनाथ शिंदे यांनी ओरल कॅन्सर संदर्भात तपासणी व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी उपजिल्हा रुग्णालयातील सर्व डॉक्टर व सर्व कर्मचारी तसेच तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैदयकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, राष्ट्रीय बालस्वास्थ अधिकारी व कर्मचारी,आरोग्य सेविका, सेवक, आशा गटप्रवर्तक, आशा स्वयंसेविका यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बोरगाव येथे वीज पडून बैल ठार

**अक्कलकोट, दि. १२ मे -**
बोरगाव (ता.अक्कलकोट) येथे शावरसिद्ध मारुती गावडे यांच्या शेतात वीज पडून बैल ठार झाला. तालुक्यात आज सायंकाळी पाच वाजता वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. साडेपाचच्या दरम्यान जोरात आवाज होऊन वीज चमकली व गावडे यांच्या शेतात बांधलेल्या बैलावर वीज कोसळल्याने ५० हजार रुपये किमतीचा बैल दगावल्याने श्री. गावडे यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.



# जय भारत माता सेवा समितीतर्फे बुध्दजयंती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**
बुद्धम शरणम गच्छामि ! बोलो भारत माता की जय! वंदे मातरम ! असा जयघोष करीत जय भारत माता सेवा समितीच्या हजारो भक्तांनी राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात बुध्दपौर्णिमा उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला.

जुळे सोलापूर ओम गर्जना चौकातील मारूती मंगल कार्यालयात सामूहिक राष्ट्रगीताने विविध धार्मिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम पार पडले. यावेळी भारत पाकिस्तान युद्धात शहीद झालेल्या जवानाना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी डॉ मुर्त्युजंय निलंगे, अर्बन डेव्हलपमेंट संचालक महादेव राठोड (विजापूर), माजी उपसभापती सिध्दार्थ गायकवाड, मणेप्पा बिराजदार, जय कर्नाटक प्रदेश अध्यक्ष मल्लिकार्जुन सारवड (कलबुर्गी), नांदेडचे दासराव हनबर्डे, लातूरचे तत्कालीन तहसीलदार पांडुरंग जगदाळे, त्रिंबक शिंदे, पाणी पुरवठा अधिकारी शिवाजी मस्के, सुग्रीव शिंदे पैलवान, माणिक सोनवणे, रामचंद पेडंगे, महेश माशाळकर (व्यापारी), अतुल बोळे, गलांडे पंढरपूर, आदि उपस्थित होते.



> देश सेवा हेच ईश सेवा आहे. कोणीही जात, पात,धर्म,पक्ष यांच्या आधारावर लढू नये. आज प्रत्येकासाठी देश आणि राष्ट्रधर्म हा सर्वोच्च असला पाहिजे. देशाची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा ठेवणे ही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे. सर्वांनी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन देशाच्या भल्यासाठी झटले पाहिजे.
> **- राष्ट्रीय संत श्री हवा मल्लिनाथ महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष, जय भारत माता सेवा समिती, नवी दिल्ली.**

रविवारी दि. ११ रोजी पहाटे दीड वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत सद्‌गुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजांच्या दर्शनाचा लाभ अनेकांनी घेवून जल्लोष साजरा केला.

# पाच धरणांतील गाळ काढण्याबाबत खा. उदयनराजेंना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१२ मे-**
उजनीसह पाच धरण क्षेत्रातील गाळ काढण्याचा प्रलंबित प्रश्न पावसाळी अधिवेशनात संसदेत मांडावा या संदर्भातील निवेदन खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडे रयत क्रांती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील यांनी दिले.



भिमानगर येथे माजी कृषी सभापती संजय पाटील यांच्या घरी खासदार उदयनराजे यांना प्रा. पाटील यांनी निवेदन दिले. उजनी धरणासह गिरणा (नाशिक), गोसीखुर्द (भंडारा), जायकवाडी (छत्रपती संभाजी नगर) आणि मुळा (अहिल्यानगर) या पाच धरणांतील गाळ काढण्याचा निर्णय झाला होता. परंतु काही तांत्रिक कारणांमुळे निवीदा रखडली आहे. या संदर्भातील प्रश्न येत्या पावसाळी अधिवेशनात संसदेत मांडावा असा आग्रह खासदार उदयनराजे भोसले यांच्याकडे करण्यात आला. उजनी धरण १२३ टीएमसी पाणी क्षमतेचे आहे. परंतु त्यामध्ये गाळ मिश्रित वाळू आहे. दरवर्षी उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरले जाते. परंतु १५ मे नंतर एक महिना उजनी धरणातील आवर्तने बंद झाल्यानंतर शेतकऱ्यांची संपूर्ण पिके धोक्यात येतात असे यामध्ये म्हटले आहे. यावेळी रांजणीचे माजी सरपंच पांडुरंग माने,सोसायटीचे चेअरमन वसंत चौगुले, सुदाम देशमुख, परमेश्वर कदम,संतोष पानबुडे आदीजण उपस्थित होते.



# लोकसेवा महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

### वीस वर्षांनी एकत्र आले विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**
लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २००४-५ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयात शिकणारे माजी विद्यार्थी वीस वर्षांनी एकत्र आले. कला शाखेत शिकणार्या माजी विद्यार्थ्यांचा रविवारी ११ मे रोजी लोकसेवा प्रशालेत स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. माजी प्राचार्य विश्वनाथ घेरडी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य बसवराज कुमठेकर यांची उपस्थिती होती. यावेळी पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, शिवशंकर अडवितोटे, नरहरी कुलकर्णी, सिद्राम म्हेत्रे, अमोल गोंडाळ, नरेश पवार, ऊर्मिला खंडागळे, अरविंद राठोड उपस्थित होते

यावेळी उपस्थित प्राध्यापकांनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून समाजात आदर्श नागरीक बनून लोकसेवा प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे नावलौकीक करण्याचे आवाहन केले.अनेक माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैरागमध्ये बुद्ध जयंतीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १२ मे-**
वैराग येथे तथागत गौतम बुद्ध यांची जयंती मोठ्या उत्साहात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने साजरी करण्यात आली.

प्रारंभी तथागत गौतम बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला त्रिसरण पंचशील ग्रहण करून पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा मध्यवर्ती जयंती उत्सव समिती वैराग यांच्या वतीने सत्कार व सन्मान करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती महाउपासक श्रीकांत बनसोडे, तसेच वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, डॉक्टर सुहास मोटे, दीपक शिंदे, गोपनीय विभागाचे किसन कोलते, नगरसेवक श्रीशैल भालशंकर तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीचे अध्यक्ष विजय बापू वाघमारे, विजय दत्तात्रय वाघमारे, अमोल वाघमारे, नाना क्षीरसागर, बाबासाहेब बाबर आदी पदाधिकारी माता-भगिनी बौद्ध उपासक उपासिका सर्व जाती धर्माचे लोक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त श्रीकांत बनसोडे यांच्या परिवारासह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती वैराग यांच्यावतीने भोजनदान करण्यात आले.

# अक्कलकोट नगरपालिकेने चार वर्षाचा हिशोब द्यावा

### आरपीआय तालुकाध्यक्ष मडीखांबे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**
अक्कलकोट नगरपालिकेला केंद्र व राज्य शासनाकडून विविध प्रकारचे अनुदान मिळते. पालिकेत त्याचे प्री ऑडिट होते मात्र पोस्ट ऑडिट होत नाही. किती अनुदान आले, किती खर्च झाला व शिल्लक किती? याबाबतचे गेल्या ४ वर्षातील ऑडीट करण्याची मागणी आर.पी.आय. आठवले गटाचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

मागणीत अविनाश मडीखांबे यांनी नमूद केले आहे कि, अक्कलकोट नगरपरिषदेत गेल्या ४ वर्षापासून प्रशासकराज आहे. गेल्या ४ वर्षात तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या नंतर सध्या मुख्याधिकारी म्हणून रमाकांत डाके हे कार्यरत आहेत. सचिन पाटील हे कार्यरत असताना राज्य व केंद्र शासनाचा विविध योजनेचा निधी मिळाला आहे.

या निधीतून मनमानी पद्धतीने विकास कामे हाती घेण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर विकास विभागाच्या मंजुरी नंतर कोट्यावधी रुपयांची विकासकामे निकृष्ट दर्ज्याची झालेली आहेत. यामध्ये प्रामुख्याने कारंजा चौकातील तारामाता उद्यान, नविन राजवाडा रोड, व्ही. आय. पी. रस्त्यावरील लहान मुलांकरिता लाखो रुपयांचे खेळाचे मनोरंजनात्मक साहित्य बसविण्यात आले हे देखील मनमानी पद्धतीने निविदाद्वारे सदरचे काम मर्जीतील ठेकेदारास देऊन पूर्ण करण्यात आले. मात्र सदर लोकार्पण अद्यापही झालेले नाही. याबरोबरच त्यांच्या काळात रस्ता स्वच्छ करण्याचे भले मोठे ट्रक घेण्यात आले, चक्क ते नगरपरिषदेसमोर गेल्या २ वर्षापासून धूळ खात पडून आहेत.

> **आयलॅन्डचा कारंजा अन् शहराला १५ दिवसाला पाणी पुरवठा**
> सांगवी जलाशयात मुबलक पाणी असताना नगरपरिषदेच्या नियोजना अभावी १२ ते १५ दिवसाला पाणी पुरवठा केला जातो. अक्कालकोटची पाणी व्यवस्था कोलमडलेलीच आहे. नगरपरिषदेकडून ए-वन चौकातील आयलॅन्डचा कारंजा सुरु ठेऊन जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. कुरनूर असो वा सांगवी, धरण उशाला कोरड घश्याला अशी अवस्था शहरवासीयांची झाली आहे. - अविनाश मडीखांबे, तालुका अध्यक्ष ,आर.पी.आय. (आठवले गट).

सध्या श्री क्षेत्र अक्कलकोटमध्ये तीर्थक्षेत्र विकास निधी सोडून कोट्यावधी रुपयांची कामे सुरु आहेत. यासह यात्रा अनुदान, राज्य नगरोत्थान, रस्ता अनुदान, यात्रा अनुदान या केंद्र व राज्य शासनाच्या निधीच्या माध्यमातून कामे देखील सुरु आहेत. ही कामे सध्या मुख्याधिकारी डाके यांच्या अधिपत्याखाली सुरु आहेत. यांच्या व तत्कालीन मुख्याधिकारी सचिन पाटील यांच्या कार्यकाळात विकासकामे व निधीचे लेखा परीक्षण व्हावे अशी मागणी आर.पी.आय. (आठवले गट) चे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी उपमुख्यमंत्री शिंदे व राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे केली आहे.

## महत्वाचे...

### निरंजन बोध्दूल यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. १२ मे-**

पत्रकार सुरक्षा समिती महाराष्ट्र राज्यच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार-२०२५ यंदा निरंजन बोध्दूल यांना देण्यात आला. दि.१२ मे समाज कल्याण केंद्र येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रमूख अतिथी म्हणून अरुण कदम माजी सहाय्यक पोलिस अधिकारी, प्रा. अजय दासरी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख, मिनाक्षी पेठे- सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, अँड. संजिव सदाफुले- हायकोर्ट वकिल, अँड. शिवकैलाश झुरले, यशवंत पवार- पत्रकार सुरक्षा समिती प्रदेश अध्यक, रामचंद्र सरवदे- कार्यकरणी सदस्य पत्रकार सुरक्षा समिती आदिंची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विविध जिल्हयातील पत्रकार बांधव मोठ्या संस्थेने उपस्थिती होते.




### रेल्वे विभागीय वापरकर्ता समितीपदी केतन वोरा यांची निवड

**सोलापूर, दि. १२ मे-**



सूत व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते केतन वोरा यांची मध्य रेल्वे विभागीय वापरकर्ता समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. ही निवड २ वर्षाकरिता असून, खा. प्रणिती शिंदे यांच्या शिफारशीनुसार मध्य रेल्वे मुंबई कार्यालयाने नुकतेच त्यांना हे पत्र दिले आहे. त्यांची ही निवड तिसऱ्यांदा झाली असून, यापूर्वी २०१७-१९ व २०२१-२३ कालावधीकरिता त्यांनी या समितीवर कार्य केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल उद्योगवर्धिनी संस्थेतर्फे अध्यक्षा चंद्रिका चौहान यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

### अल्पवयीन मुलीला अश्लिल फोटो पाठवून लैंगिक छळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ मे-**

अल्पवयीन मुलीला सोशल मिडीयावर अश्लिल फोटो पाठवून तिचा लैंगिक छळ करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन प्रणव सुरवसे (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जानेवारी २०२५ ते ६ मे २०२५ या कालावधीत यातील पिडीता ही घरी असताना प्रणव सुरवसे याने पिडीतेच्या स्नॅप चॅट आयडीवर अश्लिल मेसेज करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे फोटो पावठविले. तसेच ५ मे रोजी दुपारी पिडीता ही क्लासला जात असता तिचा पाठलाग करून प्रणव याने तिचा हात पकडून मी तुझ्यावर प्रेम करतो असे म्हणून तिच्याकडे उधार पैसे मागितले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक जाधव पुढील तपास करीत आहेत.

### जागा खाली करण्यासाठी दमदाटी करणाऱ्या महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ मे-**

जागा खाली करण्यासाठी महिलेला दमदाटी करणाऱ्या महिलेसह तिघांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्राची प्रसन्न धनशेट्टी (वय ३८, रा. मोहिते नगर शेजारी, होटगी रोड, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन सनबाशा अब्दुलसाब काळगी (रा. सुशिल मराठी शाळा, गरीबी हटाव झोपडपट्टी नं. २, सोलापूर) आणि इतर तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राची धनशेट्टी यांचे पती हे रायचूर येथे खासगी नोकरी करीत असून त्यांना मजरेवाडी येथील बिनशेती प्लॉट सर्वे नं १५०/१/२/२ पैकी प्लॉट नं. ३७ याचे क्षेत्रफळ ३३०० फुट जागा वंशपरंपरागत मिळाली आहे. २३ एप्रिल रोजी रात्री सनबाशा काळगी व इतर तिघांनी मिळून धनशेट्टी यांच्या घराजवळ येऊन मजरेवाडीची जागा आमच्या मालकीची आहे, तुम्ही आता खाली करा नाही तर तुम्हांला तुमचे सामानासह रस्त्यावर फेकून देईन अशी धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक तरंगे पुढील तपास करीत आहेत.

### नाडी ॲट्रॉसिटी; दोघांना उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन

**सोलापूर, दि. १२ मे-**

नाडी (ता. माढा) येथे पूर्वीच्या भांडणाचा राग मनात धरून जातीवाचक शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी बालाजी तांबे सह दोघांना मुंबई उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणाची हकीकत अशी की, यातील फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये घटने पूर्वी भांडणे झाली होती. घटने दिवशी फिर्यादी हे मोटर सायकलवरून गावातील दूध डेअरी समोरून जात असताना आरोपींनी पूर्वी झालेल्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादिला जातीवाचक शिवीगाळ केली व खोऱ्याच्या लोखंडी पाईपने फिर्यादिला मारहाण केली अश्या आशयाची फिर्याद कुर्डुवाडी पोलीस ठाण्यात दाखल झाली होता. आरोपी बालाजी तांबे व संतोष तांबे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज बार्शी सत्र न्यायालयाने फेटाळला होता. त्यानंतर आरोपी बालाजी तांबे व संतोष तांबे यांनी ॲड. जयदीप माने यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदर जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्यासमोर झाली. आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादात न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की फिर्यादीने फिर्याद देण्यास तीन आठवड्यांचा अक्षम्य विलंब केला आहे, या उलट सह आरोपीने घटने दिवशी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत फिर्यादी हा आपल्याला ट्रॉसिटीच्या गुन्ह्यात गुंतवण्याची धमकी देत आहे असे म्हटले आहे. यावरून फिर्यादीने केलेला ॲट्रॉसिटीचा आरोप धादांत खोटा आहे असा युक्तिवाद केला. या प्रकरणात आरोपींतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. संगीता शिंदे यांनी काम पाहिले.

# सोलापुरात मेघगर्जनेसह अवकाळी पावसाच्या सरी

**● दिवसभर उकाड्याने हैराण; सायंकाळी मात्र वातावरणात गारवा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

काही दिवसापूर्वी सोलापूरच्या तापमानाने यंदाचा उच्चांकी विक्रम करत ४४.७ अंश सेल्सियस इतकी नोंद केली होती. त्यानंतर मात्र हलकासा पाऊस पडल्यानंतर तापमान ३८, ३९ अंशांपर्यंत खाली घसरले होते. यानंतर रविवारी मात्र पुन्हा अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने सोमवारी दिवसभर उकाडा जाणवत होता.

दरम्यान, सायंकाळी मेघगर्जनेसह अवकाळीच्या सरी कोसळल्याने हवेत गारवा निर्माण झाला होता. सोमवारी सायंकाळी ४ ते साडेचारच्या दरम्यान वारे सुटले आणि पावसाला सुरुवात झाली. विजांच्या गडगडाटात सुरू झालेला पाऊस मजोरात येतो की काय असे वाटत होते. आभाळही तसेच आले होते मात्र ५ ते १० मिनिटेच पावसाच्या सरी आल्या आणि पाऊस बंद झाला. रविवारीही सोलापूर शहराच्या बहुतांशी भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. उकाड्याने हैराण झालेल्या



सोलापूरकरांना या दोन दिवसांच्या पडलेल्या पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला. अद्याप उन्हाळा सुरु असून, सोलापूरला खऱ्या अर्थाने जुलैपासून मोठ्या पावसाला सुरुवात होते. परंतु गेल्या काही वर्षात मान्सूनच्या आगमनानंतर ७ जूनला सोलापुरात पाऊस हजेरी लावत आहे. यामुळे पेरण्याही लवकर होत आहेत. जिल्हा कृषी विभागाकडूनही खरिपाच्या हंगामासाठी लवकरच बि-बियाणे, खते उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. यंदाही पाऊस वेळेवर आणि चांगला येण्याचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात येत असल्याने शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## सोलापूरकरांचा दुबईत स्नेहसंवाद व सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

दुबईमध्ये सोलापूरच्या आणि महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत यशस्वी ठरलेल्या मान्यवरांचा स्नेहसंवाद व सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या विशेष सोहळ्यात आमदार सुभाष देशमुख यांनी उपस्थितांना प्रेरित करत, आपण सोलापूरच्या मातीतून उभं राहून जागतिक पातळीवर आपला ठसा उमटवला आहे. आता वेळ आलीय आपल्या सोलापूरच्या वैभवासाठी एकत्र येण्याची, त्याच्या विकासासाठी हातभार लावण्याची. चला, एकत्र येऊ, पुढे जाऊ आणि आपल्या सोलापूरचं स्वप्न साकार करूया! असं आवाहन केलं. यावेळी उपस्थिती मान्यवरांनी संवाद साधत सोलापूरच्या मार्केटिंग साठी मदत करण्याची ग्वाही दिली. यावेळी सोलापूर दुबई फोरम स्थापन करून त्याच्या माध्यमातून सोलापूरच्या विकासासाठी यापुढे देखील कार्यरत राहण्याचे निश्चित केले. यावेळी व्याख्याते गणेश शिंदे, चंद्रशेखर जाधव, सोमनाथ पाटील, अमित जैन, प्रकाश पवार यासह विविध मान्यवर उपस्थिती होते.




### छत्रपती संभाजी महाराज बुध्दभुषण देखावा...

सोलापूर : छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त चार पुतळा परिसरात चौपाड येथील छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने बुध्दभुषण महाराजांच्या ग्रंथाचा देखावा उभा करण्यात आला आहे.





### लक्ष्मी नरसिंह मंदिरात कल्याणोत्सव

सोलापूर : अशोक चौक परिसरात सोमवारी दुपारी श्री लक्ष्मी नरसिंह देवस्थानात कल्याणोत्सव उत्साहात संपन्न झाला. परिसरातील भाविकांनी याचा लाभ घेतला. (छायाचित्र : केवल तिवारी)




## महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी संजय चिखले

**● प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यकारिणी जाहीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

महाराष्ट्र नाभिक मंडळाच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी संजय चिखले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच युवक जिल्हाध्यक्षपदी श्रीकांत राऊत, शहराध्यक्षपदी संदीप पवार, शहर युवक अध्यक्षपदी नागेश कोरे, कर्मचारी शहर अध्यक्षपदी जनार्दन वाघमारे यांचीही निवड झाली.

महाराष्ट्र नाभिक महामंडळ सोलापूर शहर जिल्हा नूतन कार्यकारणीची निवड समाज कल्याण केंद्र येथे पार पडली. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे हे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रदेश उपाध्यक्ष वैभव शेटे सर पश्चिम विभागीय उपाध्यक्ष सुदर्शन विभुते तसेच आरोग्य विभागाचे कक्ष प्रमुख प्रशांत वायकर हे उपस्थित होते. प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात श्री संत सेना महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष कल्याणराव दळे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले व युवकांनी समाज संघटित करून सामाजिक प्रश्न सोडवावेत असे सांगितले.

याप्रसंगी भारतीय सैन्यदिलाचे जवान सीमेवर सध्या पाकिस्तान विरुद्ध लढत आहेत, त्यांना पाठिंबा देण्यासाठी तिरंगा झेंडे फडकवून वंदे मातरम व भारत माता की जय अशा घोषणा देण्यात आल्या व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किरण शेटे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीकांत राऊत व शिवशरण सुरवसे यांनी केले.

## चेन स्नॅचिंग करणाऱ्या टोळीवर मोक्का

**● अटकेतील आरोपीवर २० गुन्हे दाखल; ८ गुन्हे उघडकीस**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मे-**

विधी संघर्षित बालकांच्या मदतीने चेन स्नॅचिंग करणाऱ्या आंतरजिल्हा गुन्हेगारांच्या टोळीवर पोलिस आयुक्त यांनी मोक्काअंतर्गत कारवाई केली आहे. या टोळीतील आरोपीवर २० गुन्हे दाखल असून त्याच्याकडून सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ९ गुन्हे उघडकीस आणले आहे.

राजेंद्र भिमा चव्हाण उर्फ पप्पू घिसाडी (वय रा. टाकळीभान, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे मोक्का लावलेल्या आरोपीचे नाव आहे.

गेल्या काही दिवसामध्ये सोलापूर शहरामध्ये चेन स्नॅचिंगच्या अनेक घटना घडल्या असून या गुन्ह्याचा तपास शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून सुरु होता. शेळगी परिसरात मोटारसायकलवर थांबलेला असताना पोलिसांनी राजेंद्र चव्हाण यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर चव्हाण व त्याच्या साथीदाराने अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीराम पूर शहर, संगमनेर शहर, शिर्डी, राहता, कोपरगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत चैन स्नॅचिंगचे गुन्हे केल्याचे सांगून सन २०१५ पासून जबरी चोरी, दरोडा तयारी असे १२ गुन्हे केल्याचे सांगितले.

राजेंद्र चव्हाण यानग त्याच्या विधी संघर्षित बालकाच्या मदतीने छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर, सांगली, सोलापूर या जिल्ह्यामध्ये ८ गुन्हे केलेले असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याकडून २ तोळ्याचे सोन्याची चैन व एक दुचाकी जप्त केली आहे.

राजेंद्र चव्हाण हा सन २०१५ पासून संघटीत गुन्हेगारी टोळी तयार करून जबरी चोरीचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्याविरुध्द तसेच त्याच्या अल्पवयीन साथीदाराविरुध्द मोक्का कायद्यांतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव जोडभावी पेठ पोलिसांकडून पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी दिली असून मोक्का अंतर्गत कारवाई झाल्यामुळे या गुन्ह्याचा पुढील तपास सहायक पोलिस आयुक्त प्रताप पोमण करीत आहेत.

ही कारवाई उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, पोलिस निरीक्षक सुहास चव्हाण, सहायक पोलिस निरीक्षक संजय क्षिरसागर, अमंलदार सिध्दाराम देशमुख, अजय गुंड यांनी केली.

# घराघरात, बुद्ध विहारात बुद्धवंदना

**● बुद्धम् शरणम् गच्छामिचा घुमला मंगल स्वर; बौद्ध साहित्य मंडळाच्या आवाहनास सर्वत्र प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

बौद्ध साहित्य मंडळाच्या वतीने विश्वशांती अन् कल्याणासाठी तथागत बुद्ध जयंती दिनी सोमवारी सकाळी ९ वाजता घराघरात आणि प्रत्येक बुद्ध विहारात, चला बुद्ध वंदना म्हणूया ! या उपक्रमास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. बुद्धम् शरणम् गच्छामिचा मंगल स्वर सर्वत्र घुमला. धम्ममय वातावरणात उत्सव साजरा झाला.

बुद्ध पौर्णिमा हा महत्त्वाचा सण व उत्सव जगभरात साजरा केला जातो. बौद्ध साहित्य मंडळाने भारत व पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर विश्वशांती अन् कल्याणासाठी तथागत बुद्ध जयंती दिनी घराघरात आणि प्रत्येक बुद्ध विहारात, चला बुद्ध वंदना म्हणूया ! हा उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते.



या उपक्रमात सहभागी होऊन अनोख्या पद्धतीने सामूहिकपणे एकाच वेळी शहरातील विविध विभागात घराघरात अन् बुद्ध विहारात बुद्ध जयंती साजरी केली. यावेळी तथागत गौतम बुद्ध मूर्ती आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण- पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली. बौद्ध अनुयायांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. बुद्धम् शरणम् गच्छामि... धम्मम शरणं गच्छामि... संघम शरणम् गच्छामि.! हा मंगल स्वर सर्वत्र घुमला असल्याचे धम्ममय वातावरण दिसून आले. बौद्ध साहित्य मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, सरचिटणीस किरण बनसोडे , सम न्वयक डॉ. सुरेश कोरे यांच्यासह पदाधिकारी व सदस्यांनी विविध ठिकाणच्या बुद्ध विहारात उपस्थित दर्शवली. मिलिंद नगर येथील बुद्ध विहारात भंते बी सारीपुत्त यांच्या मंगल उपस्थितीत बुद्ध वंदना घेण्यात आली.

यावेळी गौतम गायकवाड चंद्रकांत आखाडे, सिंधू गायकवाड, कुसुम तळमोहिते , दयानंद उघडे, धम्मपाल माने, श्रीनिवास थोरात, बौद्ध साहित्य मंडळाचे सरचिटणीस किरण बनसोडे, देवा उघडे दयानंद गायकवाड उपस्थित होते. नवी पेठ येथील कामगार शक्ती युनियनच्या कार्यालयात सामुदायिक बुद्ध वंदना झाली.

याप्रसंगी ज्येष्ठ कामगार नेते जनार्दन शिंदे, बौद्ध साहित्य मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, सरचिटणीस किरण बनसोडे, कामगार नेते चांगदेव सोनवणे, भालचंद्र साखरे, डॉ. हिराकांत जाधव, केरबा माने, भोगाव ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत बनसोडे, श्रावण भंडारे, नारायण बनसोडे, प्रमोद सोनवणे, संकेत ओव्हाळ उपस्थित होते. नालंदा बुद्ध विहार, वेळूवन बुद्ध विहार, मिलिंद नगर बुद्ध विहार यासह विविध बुद्ध विहारांमध्ये जयंती साजरी करण्यात आली.

## प्रलंबित व चालू कमिशन वेळेत मिळावे

**रेशन दुकानदारांचे मंत्री कदम यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

जिल्ह्यासाठी रेशनचा आणखी वाढीव इस्टांक मिळावा व जिल्ह्यातील राशन दुकानदारांचे प्रलंबित कमिशन, चालू कमिशन वेळेत मिळावे या मागणीचे निवेदन देवून अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्री मंत्री योगेश कदम यांना रेशन दुकानदार जिल्हा संघटनेच्या वतीने देण्यात आले.

संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील दुकानदारांना दैनंदिन अडीअडचणी मांडल्या. अपात्र शिधा मोहीमेबाबत दुकानदारांना फॉर्म प्रिंट बाबतीत होत असलेला आर्थिक भुर्दंड व अपात्र शिधापत्रिकेबाबत होत असलेली सक्ती व महाराष्ट्र भरात ई-



केवायसी जवळपास ७५ ते ८० टक्केच्या टप्प्यावर येऊन ठेपलेले असताना लहान व वयोवृद्ध अशा शिधापत्रिकेतील सदस्यांचे न होणाऱ्याचे धान्य कपात होऊ नये, त्याचप्रमाणे गोडाऊन मधून दुकानदारांना धान्य मोठ्या प्रमाणात तूट येत असल्याबाबतची तक्रारी मांडल्या. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, जिल्हा संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर, पंच कमिटी सदस्य बापूसाहेब गंदगे , उपाध्यक्ष उमेश आसादे, सचिव राज कमटम, सहसचिव मुद्दसर शेख, नितीन पेंटर आदींची उपस्थिती होती.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## श्री काशी जगद्गुरूंच्या हस्ते गुरुवारी दोन ग्रंथांचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

श्री संत शिवदास कृत श्री सिद्धराम चरित्र आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी कृत श्री सद्गुरु महाशिवयोगी सिद्धरामेश्वर पुराण (कथासार) या ग्रंथांचे प्रकाशन गुरुवार दि. १५ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे, अशी माहिती राजेंद्र बलसुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा प्रकाशन सोहळा श्री सिद्धेश्वर मंदिर, सोलापूर येथे होणार आहे. श्रीकाशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आ. विजयकुमार देशमुख, वेदमूर्ती बसवराज शास्त्री हिरेमठ, वीरशैव मराठी साहित्याच्या अभ्यासक डॉ. अनिल सर्जे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. गुरुशांत रामपुरे, महानंदा टेंगळे स्वामी, मल्लिनाथ टेंगळे स्वामी, राजशेखर गणेचारी, सचिन विभुते, चिदानंद मुस्तारे, महेश मैंदर्गीकर, सिद्धराम य्या हिरेमठ, गुरुशांत रामपुरे आदी उपस्थित होते.



## ▶▶ महत्वाचे...

### शिरोळवाडीत बैलगाडी पलटी झाल्याने शेतकरी जखमी

**सोलापूर, दि. १२ मे -**

शेतातून जाताना शेताच्या अलीकडे ५० मीटर अंतरावर बैलगाडी पलटी झाली. यात शेतकरी जखमी झाला ही घटना दहा मे रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घडली.शरणप्पा शंकर दर्शनाळी ( वय ३४, या. शिरोळ वाडी. या. अक्कलकोट) अशी जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. १० मे रोजी दिवसभर शेतातील कामे उरकून शरणप्पा हा सायंकाळी सातच्या सुमारास बैलगाडी जुंपून घराकडे निघाला होता. शेतापासून साधारण पन्नास मीटर अलीकडे आल्यानंतर तो जात असलेली बैलगाडी अचानक पलटी झाली. यामध्ये खाली पडल्याने त्याच्या उजव्या हाताला जखम झाली. खासगी दवाखान्यात उपचार करून आज रोजी तो शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हल पोलीस चौकी झाली आहे.

### चुकीच्या दिशेने जाताना रिक्षाला कारची धडक; चौघे जखमी

**सोलापूर, दि. १२ मे -**

सोलापूर ते अक्कलकोट चुकीच्या दिशेने जाताना रिक्षाला समोरून येणाऱ्या कारची धडक बसली. या अपघातात अक्कलकोट तालुक्यातील तीन व सोलापुरातील एक असे चार प्रवासी जखमी झाले. शिवाजी श्रीपती पवार ( वय ५५, या वागदरी या. अ.कोट), सुमनबाई श्रीपती पवार (वय ७० रा. वागदरी अक्कलकोट), शरणप्पा बाबुराव कारभारे ( वय ३१, रा. मंगोळगी), मोहन गुलाब चुंगे (वय २७, रा. सलगरवाडी) अशी जखमी झालेल्या रिक्षातील प्रवाशांची नावे आहेत. जखमी प्रवासी हे सर्वजण सोलापूर इथून रिक्षात बसून अक्कलकोट कडे जात होते. दरम्यान अक्कलकोट पासून काही अंतरावर चुकीच्या दिशेने जाणारे रिक्षाला समोरून येणाऱ्या कारची धडक बसली. यामध्ये सर्व प्रवासी मार लागून जखमी झाले. तसेच सर्वांना मुकामार लागला आहे. जखमी अवस्थेत सर्वांना रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### सोलापूर-तुळजापूर रस्त्यावर कारच्या धडकेत तरुण ठार

**सोलापूर, दि. १२ मे-**

तुळजापूरहून सोलापूरकडे दुचाकीवरून येताना उळे पुलाजवळ रात्री ८.१५ च्या सुमारास अज्ञात कारने धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या सोलापुरातील २७ वर्षे



तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. प्रथमेश अमर गोटीपामूल (वय २७, रा. भद्रावती पेठ सोलापूर) असे अपघातात मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री तो दुचाकीवरून तुळजापूर-सोलापूर असे येत होता. दरम्यान रात्री आठ पंधराच्या सुमारास तो उळगाव येथील पुलाजवळ आला असता, त्याला अज्ञात कारच्या चालकाने धडक दिली. यामध्ये त्याच्या डोक्याला आणि पायाला जखम झाली. रात्री नऊ पंधराच्या सुमारास मित्र अक्षय भुरे यांनी त्यास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



### तेरामैल चौकात दोघांना जमावाकडून मारहाण

**सोलापूर, दि. १२ मे-**

मंद्रूप ते सोलापूर दरम्यानच्या १३ मैल चौकात दोघांना अज्ञात कारणातून सात ते आठ जणांच्या जमावाकडून मारहाण करण्यात आली. रविवारी सायंकाळी पाच वाजता हा प्रकार घडला. महेश शिवानंद गुंजाटी (वय ३२, रा. मंद्रुप, द. सोलापूर) व अमोगसिद्ध प्रकाश बिराजदार (वय २९, रा. विंचूर, ता द सोलापूर) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. रविवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास महेश आणि अमोघ सिद्ध हे दोघे मंजूर परिसरातील १३ मध्ये चौकात थांबले होते त्यावेळी तेथे आलेल्या सात ते आठ जणांच्या जमावाने अज्ञात कारणातून त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत दोघांना मुका मार लागल्याने त्यांनी मंदुप येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात रात्री दाखल झाले. या घटनेची नोंद शिबिर पोलीस चौकी झाली आहे.

# मित्रासाठी मित्राचे पक्षविरहित राजकारण

**सभापतीपदी दिलीप माने विराजमान** | **पालकमंत्र्यांच्या एन्ट्रीने बाजार समितीच्या राजकारणात नव्या ट्विस्टची चर्चा**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यंदाच्या पंचवार्षिक निवडणुकीत पक्षविरहित राजकारण पाहावयास मिळाले. असे म्हटले जाते, युद्धात आणि प्रेमात सर्वकाही माफ! परंतु आता त्यामध्ये बाजार समितीच्या राजकारणात सर्व काही माफही एक ओळ समाविष्ट करावी लागेल. त्याला कारण म्हणजे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी आम दार दिलीप माने यांचे उदाहरण होय. एका मित्राने आपल्या मैत्री खातर शब्द दिला. आणि तो तंतोतंत पाळला. मित्राने मित्रासाठी पक्ष बाजूला ठेवत मैत्री जपली, अन् सभापतीची माळ आपल्या मित्राच्या गळ्यात घातली.

भाजपाने सोलापुरात पाठविलेले पालकमंत्री जयकुमार गोरे यांची जिल्ह्यातील राजकीय खेळी यशस्वी झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था आणि सहकारी संस्थांच्या राजकारणात पक्ष बाजूला ठेवून राजकारण केले जाते. त्याला बाजार समितीच्या राजकीय घडामोडी उत्तम उदाहरण ठरत आहेत. सदरची राजकीय खेळी सोलापूर बाजार समितीत यशस्वी झाली. या राजकीय स्ट्राईकमध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची भूमिका मोलाची ठरली. निवडणूक रणधुमाळीत पालकमंत्री गोरे यांनी माजी आमदार दिलीप माने यांच्या निवास्थानी दिलेली भेट, महाराष्ट्र दिनादिवशी शासकीय विश्रामगृहात पालकमंत्री गोरे व माजी आमदार माने यांची झालेली





गुप्त भेट सत्कारणी लागल्याचे दिसते. दरम्यान, बाजार समितीसाठी माजी आमदार दिलीप माने यांच्याकडे निर्णायक संख्याबळ होते. विजय निश्चित होता. परंतु बाजार समितीच्या सत्तेला राज्यातील सत्तेची साथ मिळविण्यासाठी त्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांचा विश्वासू शिलेदार हवा होता. हा शिलेदार म्हणून त्यांनी त्यांचे मित्र तथा पालकमंत्री गोरे व अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची मदत घेतल्याचे दिसले.

आमदार कल्याणशेट्टी यांच्यामुळे माजी आम दार माने यांना सुरेश हसापुरे यांच्याकडील मते व आमदार कल्याणशेट्टी यांच्याकडील मतांचीही साथ मिळाली. पालकमंत्री गोरे व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मदतीने माजी आमदार माने यांच्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंतची वाट अधिक सुलभ झाल्याचे दिसले. दिलीप माने यांची २०१९ व २०२४ मध्ये आमदारकीची संधी हुकली. मित्राच्या मदतीतूनच आज त्यांच्या अंगावर २०१८ सालानंतर बाजार समितीच्या विजयाचा गुलाल पडला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची व सोलापूर जिल्हा मध्यवर्ती दिलीप माने सहकारी बँक निवडणुकीपूर्वी पालकमंत्री गोरेंचा पॉलिटिकल स्ट्राईक यशस्वी झाल्याने भविष्यातील महापालिका, त्यानंतर येणारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये असे स्ट्राईक शहर व जिल्ह्यात होऊ शकतात. असे तर्क वितर्क लढवले जात आहेत.

राज्यातील दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या बाजार समितीवर भाजपच्या मदतीने काँग्रेसचा सभापती झाला. यापूर्वी काँग्रेस आणि भाजप यांच्या सहकार्याने भाजपचा सभापती झाला होता. परंतु आता चित्र वेगळे आहे. पक्षविरहित राजकारण करण्याचा नवा पायांडा बाजार समितीच्या माध्यमातून राजकारणात रुजू होतोना दिसत आहे. भविष्यातील विविध निवडणुकांमध्ये अशी चित्र दिसले तर नवल वाटू नये. कारण युद्धात प्रेमात आणि राजकारणात सर्व काही माफ! हे म्हण लवकरच प्रचलित होईल, असे बोलले जात आहे.

### उपसभापतींना अडीच-अडीच वर्षे

सभापती म्हणून सुरवातीची दोन वर्षे दिलीप माने, त्यानंतरची दोन वर्षे जिल्हा बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्यासाठी ठरल्याचे आज स्पष्ट झाले. सभापतिपदाचे उर्वरित एक वर्षे कोणाला? हा प्रश्न सध्या तरी सोडविण्यात आलेला नाही. उपसभापती म्हणून सुरुवातीची अडीच वर्षे सुनील कळके यांना तर नंतरची अडीच वर्षे श्रीशैल नरोळे यांच्यासाठी राखीव ठेवण्यात असल्याचे सांगण्यात येत आहे.



**डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

## मनीषा माने-मुसळे यांना आज न्यायालयात हजर करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापुरातील प्रसिद्ध न्यूरो फिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या मनिषा माने-मुसळे हिला पोलिस कोठडीच्या मागणीसाठी मंगळवारी न्यायालयात उभा करण्यात येण्याची शक्यता आहे.

डॉ. वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी रात्री ८:३० च्या सुमारास राहत्या घरातील बाथरूम मध्ये स्वतः कडील पिस्तूल मधून डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्म हत्या केली. यानंतर याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात त्यांचा मुलगा डॉ. अश्विन वळसंगकर यांच्या फिर्यादीवरून रुग्णालयातील महिला कर्मचा- याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी महिला कर्मचारी मनीषा मुसळे-माने हिला ताब्यात घेतले. त्यानंतर तपास कामासाठी पाच दिवस तिला पोलीस कोठडी मिळाली होती. न्यायालयाने म निषा मानेला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, मनिषा माने हिला पोलिस कोठडी मिळावी म्हणून मानेला मंगळवारी सदर बझार पोलिसांकडून न्यायालयात हजर करण्याची शक्यता आहे. मनिषा म ने हि डॉ. वळसंगकर हॉस्पीटलम ध्ये काम करीत असताना तिचे व्यवहार हे संशयास्पद असून त्यासाठी पुढील तपासासाठी पोलिस कोठडीची मागणी करण्यात येणार असल्याचे तपास अधिकारी अजित लकडे यांनी सांगितले.

## कोट्यावधींच्या फसवणूक प्रकरणातील महिलेचा जामीन नामंजूर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

शेअर बाजारात पैसे गुंतविण्याचे आमिष दाखवून कोट्यावधी रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या महिलेचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी फेटाळला.

सुरेखा निवृत्ती पैलवान (रा. १०५, आर्श रेसिडेन्सी, एसआरपीएफ कॅम्पजवळ, सोरेगाव, सोलापूर) असे जामीन अर्ज फेटाळलेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आशिष अशोक पाटील (वय २५, रा. न्यु संतोष नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजपूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीचे बेकायदा प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली लोकांचा विश्वास संपादन करून त्यांना अधिकचा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून कोट्यावधी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी आशिष पाटील यांच्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात निवृत्ती पैलवान व त्यांची पत्नी सुरेखा पैलवान यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास विजापूर नाका पोलिसांकडून करण्यात येऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर यातील आरोपी सुरेखा पैलवान हिने जामीन मिळण्याकरीता जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. या अर्जावर जिल्हा व सत्र न्यायाधीश राणे यांच्यासमोर सुनावणी झाली. सरकारी वकिल व फिर्यादीच्या वकिलांनी केलेला युक्तीवाद करून आरोपीचा गुन्ह्यात प्रत्यक्षदर्शी सहभाग असून तिने अपहार केलेल्या रकमेतून सोन्याचे दागिने खरेदी केले असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. चौकशीच्या टप्प्यावर आरोपी जामीनावर सुटला तर त्याचा विपरित परिणाम खटल्यावर होईल असा युक्तीवाद मान्य करून न्यायाधीश राणे यांनी पैलवानचा जामीन अर्ज नामंजूर केला.

याप्रकरणी सरकारच्यावतीने अॅड. श्रीमती बागल यांनी तर फिर्यादीकडून अॅड, वैशाली गुप्ता-म्हेत्रे यांनी काम पाहिले.

## दक्षिण तालुक्यात आत्महत्येच्या दोन घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव परिसरात गळफास घेऊन आत्महत्येच्या दोन घटना घडल्या आहेत. पहिल्या घटनेते मुळेगाव तांडा परिसरातील अहिल्या नगरात तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी सायंकाळी ७.३० च्या सुम ारास उघडकीस आला.

आकाश बाळू गामने (वय २९, रा. अहिल्यानगर, मुळेगाव तांडा सोलापूर) असे गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी सायंकाळी आकाश हा त्याच्या अहिल्या नगर येथील राहत्या घरात होता. त्यावेळी त्यांनी अज्ञात कारणातून राहत्या घराच्या लोखंडी अँगल ला साडी ने गळफास घेतला. ही बाब माहीत होतास नातेवाईकांनी त्यास गळफासातून सोडवले. त्यानंतर तालुका पोलीस ठाण्यातील हवालदार शेख यांनी त्यास रात्री शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले.परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



दुसऱ्या घटनेत मुळेगाव शिवारातील शेतात झाडाच्या फांदीला स्काफणे गळफास घेऊन एकाने आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी सायंकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आला.यल्लाप्पा शिवाजी बनसोडे (वय ४२, रा. मुळेगाव तांडा, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. मुळेगाव तांडा येथे राहणारा यल्लाप्पा याने परिसरातील सुरेश माळी यांच्या शेतातील झाडाच्या फांदीला स्कार्फने गळफास घेतला. ही बाब सायंकाळी सहाच्या सुमारास उघडकीस आली.

त्यानंतर त्यास गळफासातून सोडून तालुका पोलिस ठाण्यातील हवालदार महिंद्रकर यांनी रात्री दहा पंधरा च् सुमारास बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.दोन्ही घटनेच्या नोंदी सिव्हिल पोलीस चौकीत झाल्या आहेत.



# जग मे बुद्ध का नाम है, यही भारत की शान है!

## सोलापुरात बुद्ध जयंतीनिमित्त उत्साहात मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ मे-**

जग मे बुद्ध का नाम है, यही भारत की शान है ..जय भीम... असा जयघोष करत बुद्ध जयंती निमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सोलापूर शहरात मंगलमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली.

सजवलेल्या आकर्षक रथातून तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. माता रमाबाई आंबेडकर नगर येथील धम्मगंध बुद्ध विहार येथे पुष्पांजली व बुद्ध वंदना घेण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून या मिरवणुकीस प्रारंभ झाला. प्रारंभी जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब वाघम रे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. भंते सारीपुत्त थेरो यांची मंगल उपस्थिती होती.यावेळी समता सैनिक दलाने मानवंदना दिली. त्यानंतर पुढे दानमय बुद्ध विहार येथे पुष्पांजली व वंदना घेण्यात आली. सम्राट चौक मार्गे मिलिंद नगर येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी येथे अभिवादन करण्यात आले. मिलिंद नगर बुद्धविहार येथे पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

दरम्यान, नवी पेठेतील जुनी नगरपालिका (सध्याचे महापालिका शिक्षण मंडळ कार्यालय) येथील क्रांतीसूर्य ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून पुढे पार्क स्टेडियम जवळील डॉ. आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बुद्ध नगर फॉरेस्ट येथील डॉ. आंबेडकर मेम ोरियल हायस्कूलच्या प्रांगणातील बोधीवृक्षाचे पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन या मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. शिस्तबद्धरित्या शांततेत ही मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब वाघमारे, शारदा गजभिये, धम्मरक्षिता कांबळे, निर्मला कांबळे, बाबू रणखांबे, आशा शिवशरण, यशवंत साबळे, नंदा काटे, श्याम शिंगे , जगन्नाथ शिंगे, जीवक माने, आम्रपाली सर्वगोड, रंजना दिलपाक, लतिका इंगळे, एम. एस. शिवशिखरे यांच्यासह पदाधिकारी, उपासक - उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, सोलापूर शहरात विविध सामाजिक संस्था, संघटनांच्या वतीने बुद्ध जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विविध ठिकाणी बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. सामुदायिक त्रिशरण पंचशील बुद्ध वंदना घेण्यात आली. खीर आणि लाडू वाटप करण्यात आले.

## मातृदिनी मुलाचा आईवर खुनी हल्ला

- मुलास दोन दिवसांची पोलिस कोठडी
- अन्नपूर्णा संकुल अपार्टमेंटमधील घटना
- आईच्या डोक्यात कुकर मारून खूनाचा प्रयत्न




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

शहरातील अन्नपूर्णा संकुल अपार्टमेंटमध्ये मातृदिनीच मुलाने आईच्या डोक्यात कुकर मारून तिच्या खूनाचा प्रयत्न केला. ही घटना ९ मे रोजी घडली असून याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, पोलिसांनी खुनी हल्ला करणाऱ्या मुलास अटक केली असून न्यायालयाने त्यास दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

विजयालक्ष्मी रामकृष्ण चिंचणसुरे (वय ६३, रा. फ्लॅट नं. ४०३, बी विंग ४ था मजला, अन्नपूर्णा संकुल अपार्टमेंट, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. याबाबत अमित सुरेश धुपद (वय ४५, रा. सोमवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हर्षल रामकृष्ण चिंचणसुरे (वय ३२, रा. भारत नगर, कुमठा नाका, सोलापूर सध्या रा. फ्लॅट नं. ४०३, बी विंग ४ था मजला, अन्नपूर्णा संकुल अपार्टमेंट, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हर्षल चिंचणसुरे यास पोलिसांनी अटक केली आहे.

विजयालक्ष्मी यांचा हर्षल हा मुलगा आहे. विजयालक्ष्मी यांना हर्षल हा सांभाळत होता. परंतु, विजयालक्ष्मी या त्यांचे पेन्शनचे मि ळणारे पैसे हे हर्षलच्या भावंडावर खर्च करीत होत्या. त्याचा राग मनात धरून हर्षल याने ९ मे रोजी सायंकाळी अन्नपूर्णा अपार्टमेंट येथील घरात रागाच्या भरात आई विजयालक्ष्मी यांच्या डोक्यात कुकर मारून त्यांच्या खूनाचा प्रयत्न केला. विजयालक्ष्मी यांच्या डोक्यात कुकर लागल्याने त्यांच्या डोक्यास जबर जखम झाली आहे. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होतास पोलिसांनी हर्षल यास अटक करून सोमवारी न्यायालयात हजर केले होते. त्यावेळी न्यायालयाने हर्षल यास दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. महिला सहायक पोलिस निरीक्षक ज्योत्सना भांबिष्टे पुढील तपास करीत आहेत.

# एसटीमध्ये बसण्यासाठी प्रवाशांचा जीवाशी खेळ

## जागेसाठी चिमुकल्यांना खिडकीतून ढकलले जाते आत; उन्हाळी हंगामात जीवावर बेततोय प्रवास

### एसटी महामंडळ देणार का लक्ष ?

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१२ मे-

उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागल्याने शिवाय लग्नसराईचा मौसम असल्याने एसटीच्या प्रवाशांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यामुळे अनेक वेळा स्थानकात थांबण्यासाठी आणि गाडीत बसण्यासाठी जागा मिळेना झाली आहे. यामुळे प्रवाशांची तारांबळ उडत आहे. यावर युक्ती म्हणून प्रवाशांनी एसटी बसेस मध्ये जागा पकडण्यासाठी चिमुकल्या बालगोपाळांचा आधार घेतला आहे. जेव्हा एसटी स्थानकात प्रवेश करते तेव्हा, प्रवासी बस मधून उतरत असताना दुसरीकडे खिडकीमधून चिमुकल्यांना एसटीच्या आत ढकलले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, उन्हाळ्याच्या कालावधीत प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. यासाठी राज्य परिवहन महामंडळाकडून जादा सोडण्यासाठी विशेष परवानगी देण्यात येते. सोलापूर विभागातून ही जादा बस सोडल्या जात आहेत. परंतु प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने सदरच्या गाड्या अपुऱ्या पडत आहेत. वाढती गर्दी पाहता एसटीमध्ये बसण्यासाठी जागा मिळत नाही. परिणामी प्रवासी आपल्या लहान मुलांना खिडकीच्याद्वारे एसटीमध्ये जागा पकडण्यासाठी आतमध्ये ढकलत आहेत. काही ठिकाणी तर स्वतः वयोवृद्ध प्रवासी देखील खिडकीच्या माध्यमातून आपले साहित्य ठेवून स्वतः आत प्रवेश करताना दिसले.






सोलापूर बसस्थानकात एसटी बसेसमध्ये जागा पकडण्यासाठी प्रवाशांनी चक्क आपल्या जीवाशी खेळ करत खिडकीमधून प्रवेश करताना तर दुसऱ्या छायाचित्रात आपल्या चिमुकल्या बालगोपाळांना खिडकीच्या माध्यमातून एसटीमध्ये ढकलत असतानाचे टिपलेले छायाचित्र.

### क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी असल्यास दंड

काही महिन्यांपूर्वी आरटीओ प्रशासनाने अचानक तपासणी मोहीम घेतली. यात एका एसटीमध्ये तब्बल ८० प्रवासी आढळले. म्हणजेच क्षमतेच्या पेक्षा जास्त प्रवासी आढळल्याने एसटी गाडीवर दंड ही लावण्यात आला होता. यामुळे अशाच प्रकारे पुन्हा कधी कारवाई होईल का, अशी भीती कर्मचाऱ्यांना वाटत असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली.

### वातानुकूलित गाड्यांना प्रतिसाद

सध्या उन्हाचा पारा ४५ अंशापर्यंत जात आहे. यामुळे वातानुकूलित शिवाई आणि शिवशाही गाड्यांमधून प्रवास करण्याऱ्यांची संख्या वाढत आहे. सध्या सोलापुरातून मुंबई, ठाणे शिवाय पुणे मार्गावर या वातानुकूलित गाड्या धावत आहेत. सोलापूर आगारात एकूण २३ शिवाई, १९ शिवशाही आहेत. या गाड्या पुणे, लातूर, सातारा, बीड मार्गावर धावत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### प्रवाशांनी सुरक्षित प्रवास करावा

प्रवाशांची गर्दी वाढत आहे. यामुळे त्यांच्या सोयीसाठी जादा गाड्या सोडण्यात येत आहेत. काही मार्गावर जादा गाड्यांची सोय करून ही काही वेळा प्रवाशांची मागणी वाढते. त्यावेळी आम्ही आणखी विशेष गाड्या सोडत आहोत. परंतु प्रवासी एसटीत जागा पकडण्यासाठी खिडकीद्वारे साहित्य टाकतात. परंतु आता लहान मुलांनाच खिडकीतून आत ढकलले जात असल्याचे दिसून येत आहे. या प्रवाशांनी आपल्या व आपल्या मुलांच्या जीवाशी खेळ करू नये. एखादे वेळी उशीर झाल्यास हरकत नाही. परंतु व्यवस्थित प्रवास करावा. प्रवाशांना कोणतीही इजा होऊ नये यासाठी खबरदारी घेत आहोत.

- नागनाथ जाधव, स्थानक प्रमुख सोलापूर

सोलापूर बस स्थानकावर एसटी बसचे संख्या अपुरी पडत आहे. एसटीची वाट पाहत ताटकळत प्रवासी उभे आहेत. वाढते ऊन पाहता प्रवाशांनी झाडाची सावली पाहून एसटीची वाट पाहणे पसंत केले. बऱ्याच कालावधीनंतर एसटी स्थानकात प्रवेश करताच, प्रवाशांनी धावत पळत एसटी गाठली. तर काहींनी खिडकीमधूनच एसटीच्या आतमध्ये जाण्याचा मानस करत, आपले साहित्य टाकले आणि स्वतः खिडकीच्या माध्यमातून आत चढण्याचा प्रयत्न केला. अशाप्रसंगी एसटीची खिडकी निघून अपघात होण्याचा धोका संभवतो आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांनी खिडकीमधून प्रवास करणे टाळावे असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११४

**ऐसे युक्तिचेनि हातें । जैं इंद्रियां ओपिजे भातें ।**
**तैं संतोषासी वाढतें । मनचि करी ॥**

योगाभ्यासाने कुंडलिनी शक्ती कशी जागृत करता येते, ती जागृत झाल्यानंतर शरीरात , मनात कसे बदल होतात. हे भगवंतानी अर्जुनाला स्पष्ट करून सांगितले. कुंडलिनी जागृत झाल्यानंतर, ती तिचे संपूर्ण कार्य करून टाकते. त्यानंतर ती निस्तेज होते. त्याबरोबरच देहातील पंचमहाभुतांचे स्वरुपही लुप्त होते. अशा योग्याचा देह एक चमत्कार वाटू लागतो. कुंडलिनी शक्तीच्या जागृतीमुळे येणारा अनुभव हा केवळ सांगून समजणारा विषय नव्हे तर तो प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा विषय आहे. अर्जुनाने श्रीकृष्णाच्या तोंडून हा सर्व योग ऐकला. योग ऐकून त्याला खूप आनंद वाटला. तुम्हा आम्हाला जसे हा योग वाचून-ऐकून आनंद वाटत असेल तसे अर्जुनाला प्रत्यक्ष योग ऐकून आनंद वाटला. परंतु अर्जुन म्हणाला, देवा माझ्याकडे या योगाचा अनुभव घेण्याचे सामर्थ नाही. माझ्याजवळ जेवढे सामर्थ आहे, तेवढ्या सामर्थ्याने हा योग साधता येईल काय ? हा योग कोणालाही मनात इच्छा झाली तर साध्य करता येईल का ? असे प्रश्नही अर्जुन भगवंताना विचारीत आहे. खरे म्हणजे हे प्रश्न आपले सुध्दा आहेत. अर्जुनाने आपल्याच मनातील प्रश्न भगवंताला विचारले आहेत असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. उत्तरादाखल भगवंत म्हणाले की, अशी असाधारण कार्ये सिध्दीस नेण्यासाठी अधिकाराची आवश्यकता असते.



अर्जुनाच्या प्रश्नाची उत्तरे देतांना भगवंत म्हणाले, ऐसे युक्तिचेनि हातें । जैं इंद्रियां ओपिजे भातें। तैं संतोषासी वाढतें । मनचि करी ॥ अर्थात, माणसाने हा देह जोपासण्यासाठी जे आवश्यक आहे तेवढे केलेच पाहिजे. अन्नसेवनासारखे कार्य करायलाच पाहिजे. नियमाप्रमाणे आवश्यक त्या सर्व क्रिया केल्या पाहिजेत. मोजके बोलणे, बेताच्या पावलांनी चालणे, योग्यवेळी झोपणे या क्रिया कराव्या लागतील. नियमाच्या हाताने इंद्रियांना विषयाचे खाद्य दिले तर मन संतुष्ट राहते. योगाभ्यासासाठी मन संतुष्ट असणे आवश्यक असते. दुराग्रहवृत्तीने, जिद्दीने तहान, भूक सोडण्याने किंवा हट्टाने झोप टाळल्याने, स्वतःला देहदंड करून घेण्याने ही योगसाधना तडीस जात नाही. विषयाचा अतिरिक्त उपभोग घेण्याचे सुध्दा सोडले पाहिजे. अर्थात विषय, विषयवासनांचा त्याग न करता केवळ विहीत कर्मे केल्याने ही योग्यता प्राप्त होत नसते. निती नियमाचे पालन करून कर्मे करीत राहिले तर इंद्रियांना आपोआप योग्य वळण लागते. योगाचा अभ्यास न करताही सहज योग प्राप्ती होऊ शकते. एकीकडे योगाभ्यासाची अवघड वाट भगवंतानी अर्जुनाला सांगितली आणि दुसरीकडे अत्यंत सोपा मार्ग भगवंतानी सांगितला. निती नियमाला अनुसरुन जर माणसाने वर्तन ठेवले तर शरीर, मनाला कुठलेही दंड देण्याची गरज नाही. आपल्या कर्तव्याची वाट आपोआप योगाभ्यासाची वाट बनते. माणूस कर्तव्यातून आत्मसुख मिळवू शकतो. नितीनियमाची वाट चालण्यासाठी इंद्रिये ताब्यात आली पाहिजेत. इंद्रियांना ताब्यात आणणे कठीण असते तरीही ते अशक्य नाही. कुंडलिनी योगासाठी कठीण अभ्यास भगवंतानी अर्जुनाला सांगितला. एवढा कठीण अभ्यास मला शक्य होईल का ? असे अर्जुनाने विचारले असता भगवंतानी आपले नैतिक कर्तव्ये, सदवर्तन या मार्गाच्या प्राप्ती पर्यन्त नेऊन सोडू शकते असे स्पष्ट केले आहे. यावरुन कर्तव्य किती महत्वाचे असते हे लक्षात येऊ शकेल.

**जय जय राम कृष्ण हरी.**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. १३ मे २०२५ | नारद जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | महारुद्र मारुती पंचमी यात्रा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. प्रतिपदा (२४.३५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - विशाखा (०९.०८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (अहोरात्र) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (११.३२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** - मनासारखी प्रगती सुखी रहायचे असेल, तर कानावर आलेली प्रत्येक गोष्ट मनावर नाही घ्यायची. राशी स्वामी मंगळ सुखस्थानी असल्याने फार दगदग करू नये.

**वृषभ** - अडचणींची चिंता नको मनात तेच लोक राहतात, ज्यांच मन साफ आहे. राशीत गुरु असल्याने विविध समस्यांतून मार्ग निघत जाईल.

**मिथुन** - वादाचे प्रसंग टाळावेत सर्व वेळेचा खेळ आहे. कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते.

**कर्क**:-घाईने निर्णय नको रूप आणि रुपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही.

**सिंह**:-प्रकृतीची दखल घ्यावी एखाद्याच्याजवळ तितकंच जायचं असतं जितकं ते आपल्याला जवळचे मानतात.

**कन्या** - कौटुंबिक समस्या जीवनाची परीक्षा अचानक होते. त्यासाठी अभ्यासक्रम, वेळ नसते. लाभात मंगळ असल्याने वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल.

**तुला** - संधीचे स्वागत करावे समस्यांशी झगडत राहणे हाच प्रगतीचा मार्ग आहे. धनेश सप्तमेश, मंगळ दशमात आहे.

**वृश्चिक** - महत्वाची कामे करावीत सुखात त्यांचाच निर्माण व्हावे, जे दुःखात न बोलविता येतात. षष्ठातील रवि- बुधामुळे अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती होईल.

**धनु** - विचाराने रहावे आपला विचार प्रामाणिक असेल तर दोस्त कमी पण विरोधक जास्त भेटतात. चतुर्थात शनि, अष्टमात मंगळ त्यामुळे मार्गक्रमण सुलभ नाही.

**मकर** - कला-गुणांचा विकास आज काही नसताना जे तुमच्या सोबत आहेत, ते खरे आहेत.

**कुंभ** - चिंता नको मन नाजूकच असतं. आयुष्यात आलेली काही चुकीची माणसं त्याला दगड बनवतात.

**मीन** - फार काळजी करू नका सर्व यशाची वेळ निर्धारित असते. कधीही हिम्मत हारू नका. राशीतील विविध ग्रहांमुळे अपेक्षित फलप्राप्ती होत नसली तरी फार काळजी करू नका.

---

# मातृत्व दिनानिमित्त जैन महिला संघटनेतर्फे मातांचा सन्मान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१२ मे-

मातृत्व हा भारतीय जैन संघटनेच्या पायाभरणी कार्यक्रमांच्या मालिकेतील पाचवा पायाभरणी कार्यक्रम आहे. जैन समाजात आईचे महत्व पटवून देणे, कौटुंबिक नाते दृढ करणे आणि समाजात मातेबद्दल आदराची भावना वाढवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन जिल्हाध्यक्षा प्रविणा सोलंकी यांनी केले.

जागतिक मातृत्व दिनानिमित्त या मालिकेत ११ मे रोजी भारतीय जैन संघटना महिला जिल्हा विभाग सोलापूर (महाराष्ट्र) तर्फे मातृत्व कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाची सुरुवात नवकार महामंत्राने झाली. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील सहा मातांना साडी, नारळ व पुष्पहार देऊन गौरविण्यात आले. यामध्ये शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आईप्रमाणे असलेल्या मुख्याध्यापिका वसुंधरा शर्मा यांचा सत्कार करण्यात आला. अनाथ मुलांसाठी आश्रम चालवणाऱ्या शिक्षिका लक्ष्मी पाटील, वृद्धाश्रमातील वृद्ध स्त्री-पुरुषांची सेवा करणाऱ्या श्रीलक्ष्मी चव्हाण, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती ओळखून स्वावलंबी झालेल्या तुलसी भीमनपल्ली आणि माधुरी चव्हाण, ज्या महिलेने आपल्या जीवनासाठी आणि आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि उज्वल भविष्यासाठी इतरांच्या घरी सफाई कामगार म्हणून काम केले त्या रुपाली नरळे यांचा यावेळी गौरव करण्यात आला.




या कार्यक्रमात संतोष बंब यांची महाराष्ट्र राज्य सचिवा व माया पाटील यांची विभागीय अध्यक्ष या पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सोलापूर जिल्हा महिला विभागातर्फे सत्कार करण्यात आला. राज्य सचिव संतोष बंब यांनी उपस्थित सर्व महिलांना मातृत्व या विषयावर मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष प्रविणा सोलंकी यांनी महिलांशी आईचे महत्व व त्यांच्याप्रती असलेली कर्तव्ये यावर संवाद साधला. उपस्थित सर्व महिलांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात लकी ड्रॉ म्हणून दोन सदस्यांना भेटवस्तू देण्यात आल्या. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष केतन शहा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमात राज्य सचिवा संतोष बंब, विभागीय अध्यक्षा माया पाटील, शहराध्यक्षा कल्पना भन्साळी कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हा सचिव निर्मला मेहता यांनी केले.



## प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघाकडून पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

सोलापूर, दि. १२ मे-

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांकडून राज्याचे ग्रामविकासमंत्री मा.ना.श्री. जयकुमार गोरे साहेब यांच्या बोराटवाडी या त्यांच्या मुळगांवी जावून सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक संघटनेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असल्याने याची ग्रामविकास विभागाकडे नोंदणी होणेबाबत दिलेल्या निवेदनावर मंत्री महोदयांनी ग्रामविकास विभागाच्या मा.प्रधान सचिवांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. तसेच मुख्याध्यापक संघटनेस पूर्ण सहकार्य करणार असल्याचे व मुख्याध्यापकांच्या अडीअडचणीच्या संदर्भात लवकरच बैठक लावण्यास असल्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय पोतदार, सचिव औदुंबर बंडगर, खजिनदार महादेव इटेकर, सदस्य राजीव कोळी, रमेश घोदे व धोंडप्पा रुणुरे आदी शिक्षक बांधव उपस्थित होते.



## आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे बुद्ध जयंती साजरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ मे-

आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक कुणाल बाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. बुद्धवंदना घेण्यात आली.

मुलांना सुगंधी दूध वाटप करण्यात आले. यावेळी उत्सव अध्यक्ष श्रीशैल हिरेमठ, रोशन मुखाणी, सुमित शिवशरण, अँड. राज बाबरे, शेरा तुळसे, नवीन तळभंडारे, रोहन गायकवाड, निहाल बाबरे, गणेश सोनवणे, उज्वल बाबरे, मिलिंद कांबळे, लखन घाटंगे उपस्थित होते.

## दिव्यांग शिक्षकाने दिला आत्मदहनाचा इशारा

सोलापूर, दि. १२ मे-

मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप करत येत्या १६ मे रोजी मुंबई मंत्रालयातील शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्या कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिव्यांग अंध शिक्षक सुरेश सरगम यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

दिव्यांग अंध शिक्षक सुरेश सरगम (मनपा मुले मराठी शाळा क्रमांक पाच) यांनी याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर उच्च न्यायालयाने निर्णयही दिला मात्र अद्यापही त्यानुसार कार्यवाही झाली नाही.

सेवा सातत्य व इतर लाभ लागू करण्याविषयी शासनास चार आठवड्याचा कालावधी दिला होता परंतु प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांनी यासंदर्भात अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही असा आरोप शिक्षक सरगम यांनी केला आहे. यामुळे याकडे लक्ष वेधण्यासाठी मंत्रालयात प्रधान शिक्षण विभाग प्रदान सचिवाच्या कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे.



## अल्पसंख्यांक पंजीकृत संस्थेला राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार

सोलापूर, दि. १२ मे-

येथील भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अल्पसंख्यांक पंजीकृत संस्थेला एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना यांच्याकडून राज्यस्तरीय आदर्श संस्था पुरस्कार प्रदान करण्यात आला. गृहराज्यमंत्री योगेश कदम, बापूसाहेब अडसुळे, मंगेश चिवटे, सुभाष माने, रमेश हन्सुरे, मनीष काळजे, संभाजी शिंदे, आदित्य ढोबळे या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्था अध्यक्ष हारुन पठाण, सचिव आसिफ पठाण, मुख्याध्यापिका तस्लिम पठाण, मुख्याध्यापिका आफरीन सय्यद, पिरअहमद सय्यद, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गुणवंत कामगारांना न्याय द्या; असोसिएशनची मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १२ मे-

राज्य सरकारच्या इतर विभागाच्या पुरस्कार्थीना, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कारप्राप्त पुरस्कार्थीना कोणताही लाभ दिला जात नाही. ही बाब अन्यायकारक आहे.

१३ मे रोजी मुंबई येथे होणाऱ्या विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार वितरण सोहळ्यात कामगार मंत्री आकाश फुंडकर व राज्य मंत्री आशिष जयस्वाल हे पुरस्कार्थीना एस.टी. प्रवास सवलतीची घोषणा करतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कामगार मंत्र्यांनी राज्यातील गुणवंत कामगारांना न्याय दयावा अशी मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशन प्रदेशाध्यक्ष सुरेश केसरकर व उपाध्यक्ष तात्या भोसले यांनी राज्य सरकारकडे पत्राद्वारे केली आहे. राज्य शासनाच्या कामगार विभागा मार्फत सामाजिक, शैक्षणिक, साहितीक, सांस्कृतिक, कला क्रिडा, संघटना तसेच समाजातील, वंचित व उपेक्षीत घटकासाठी कामगिरी करणाऱ्या नोंदीत कामगाराना विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देवून गौरवण्यात येते हा कार्यक्रम राज्यपाल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगारमंत्री, कामगार राज्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री, आमदार व खासदार, संचालक मंडळ तसेच प्रमुख प्रशासकीय मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. राज्य सरकारच्या इतर विभागाच्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत दिली जाते. मात्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कार्थीना आज पर्यंत कोणताही लाभ दिला जात नाही.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ११ फेब्रुवारीच्या मंत्रालयीन भेटीत याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले आहे. त्यामुळे कामगारमंत्री व राज्यमंत्री यांनी गुणवंत कामगाराना राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून प्रवास सवलतीचा लाभ दयावे असे भोसले यांनी सांगितले. यावेळी बसवराज म्हेत्रे, सुधीर चंदनशिव, अशोक अलदार, लक्ष्मण जगताप, दिनकर देशमुख, ज्ञानेश्वर तळीखेडे, हरीभाऊ कुलकर्णी अर्जुन शितोळे, अजित डोके, शुकुर शेख, सौ. लता साठे, शांताताई येळमकर आदि उपस्थित होते

## संगीता एखंडे यांच्या काव्यसंग्रहाचे शनिवारी सोलापुरात प्रकाशन

सोलापूर, दि. १२ मे-

येथील संगीता एखंडे यांनी लिहिलेल्या कवितेच्या प्रांगणात या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ शनिवार, दि. १७ मे रोजी सायंकाळी ६ वाजता श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृह (अॅम्फी थिएटर) येथे होणार आहे. अशी माहिती प्रशांत एखंडे यांनी दिली. पुस्तक प्रकाशनाचा समारंभ महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर शाखेच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्येष्ठ साहित्यिका जोहडकार श्रीमती सुरेखा शहा, ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, ज्येष्ठ अभिनेत्री व नृत्यदिग्दर्शिका श्रीमती वनमाला किणीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी आणि सोलापूर आकाशवाणीचे निवेदक अभिराम सराफ यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तरी या पुस्तक प्रकाशन समारंभाला साहित्य रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रशांत एखंडे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांची फसवणूक खपवून घेणार नाही : आ. अभिजीत पाटील

## माढा तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.१२ मे-**

केंद्र व राज्य शासन शेतकरी हिताच्या अनेक योजना राबवित असून त्या योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा असे आवाहन माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी केले आहे. खरीप हंगामाच्या नियोजनासाठी पंचायत समिती, कुर्डूवाडी येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन आढावा बैठकीच आयोजन करण्यात आले होते.

करमाळ्याचे आमदार नारायण पाटील, जि.प.सदस्य भारत आबा शिंदे, नगराध्यक्षा मिनल साठे, भारतनाना पाटील, बाळासाहेब ढवळे, सुर्वणा शिवपुरे, जिल्हाकृषी अधीक्षक शुक्राचार्य भोसले, वाकडे एस. ज्योती कुलकर्णी, बाळासाहेब पाटील, तालुका कृषीअधिकारी अविनाश चंदन, मिरगने आदींची उपस्थिती होती.

खरीप हंगाम पूर्व नियोजनाची बैठक पार पडली. हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व अधिकारी प्रशासनाने आवश्यकती तयारी करावी. बियाणे, खते व कीडनाशके यांचा पुरवठा वेळेत आणि योग्य दराने करावा. कुणीही शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.
**-अभिजीत पाटील, आमदार**



बैठकीत खरीप हंगामातील पेरणी पूर्वतयारी, बियाणे आणि खतांचा पुरवठा, कीड नियंत्रणाचे उपाय शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना मोहिमा याविषयी सविस्तर माहिती शेतकऱ्यांना मिळाली. शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खत कसे उपलब्ध होईल याबाबत नियोजन करावे अशा सुचना केल्या असून गेल्या काही हंगामांमध्ये बी-बियाण्यांबाबत अनधिकृत दर आकारणी केल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्यास खपवून घेणार नसल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी आपण स्वतः लक्ष घालणार असून, वेळेवर व योग्य दरात शेतकऱ्यांपर्यंत कृषी सेवा पोहोचावी यासाठी प्रशासनाने पूर्ण तयारी ठेवावी. अशा सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.



# मंगळवेढ्यातील २४ गावांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील

## शिरसी, गोणेवाडी गावभेट दौऱ्यात खासदार प्रणिती शिंदे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मंगळवेढा तालुक्यातील शिरसी आणि गोणेवाडी या गावी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच ग्रामस्थांचे निवेदने ही स्वीकारून त्यांच्या अडचणी लवकरात लवकर सोडविण्याची ग्वाही दिली.

यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना खा.शिंदे म्हणाले, २४ गावच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मी प्रयत्नशील असून शासन याचा गांभीर्याने विचार करत नाही म्हणून शासनाचे विचार न करता चेन्नई येतील खासगी संस्था यांच्यामार्फत मंगळवेढाच्या २४ गावांचा व उर्वरित सर्वच दुष्काळग्रस्त गावांचा विकास करण्यासाठी त्या संस्थेमार्फत काही गावात काम सुरू केले आहे. मंगळवेढ्याचा दुष्काळ संपवण्यासाठीच मी खासदार झाले असून लवकरात लवकर दुष्काळ संपवण्याचा प्रयत्न करणार आहे. यावेळी मंगळवेढा तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, युवक अध्यक्ष रविकरण कोळेकर, शिरशीचे सरपंच बाबासाहेब कसबे, माजी सरपंच गायकवाड गोणेवाडी चे माजी सभापती संभाजी गावकरे, विलास गवळी आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पंढरपुरात दोन मंदिर ट्रस्टची निवडणूक; बाबासाहेब अधटराव पॅनेल विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ मे-**

पंढरीतील वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असणाऱ्या प्राचीन श्री पुंडलिक व महादेव देवस्थान ट्रस्टची निवडणूक रविवारी पार पडली. ट्रस्टचे विद्यमान अध्यक्ष, माजी नगराध्यक्ष प्रभाकर उर्फ बाबासाहेब अधटराव यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने सर्व अकरा उमेदवार बहुमताने निवडून आले.

या निवडणूकी बाबत माहिती देताना, माजी नगरसेवक तथा पॅंनेल मधील विजयी उमेदवार अनिल अभगंराव यांनी सांगितले की, ट्रस्टने मागील १० वर्षात केलेल्या विकास कामात श्री पुंडलिक मंदिर येथे दररोज नियमित भाविकांना अन्नदान, दिनदयाळ महादेव मंदिर परिसरात ट्रस्टच्या जागेत दोन मजली भव्य मंगलकार्य सर्व सोयीयुक्त करत सभोवती कपांऊड बांधले,सर्वांकरीता स्वर्गर थाची सोय उपलध्ब केली पुंडलिक मंदिराचे शिखर दुरुस्ती रंगकामासह पूर्ण केली आहे, ट्रस्टचे मांडवखडकी येथे नूतन बांधकाम व पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे, कोळीगल्ली येथील मारुती मंदिराचे नूतन बांधकाम केले आहे, यासर्व विकासकामामुळे सर्व मतदारांनी बहुमताने पॅनेलचे उमेदवार निवडले. दरम्यान निकाला नतंर कोळी समाज बांधवांनी गुलालाची उधळण करीत मोठा जल्लोष केला व नूतन विश्वस्ताचे स्वागत केले.

**विजयी उमेदवार**

(अभंगराव तक्षिमीतून) अनिल शशिकांत अभंगराव, हणमंत अनिल अभंगराव. (अधटराव तक्षिमीतून) प्रभाकर बाबूराव अधटराव, नितिन पांडुरंग अधटराव. (नेहतराव तक्षिमीतून) सतिश हरिभाऊ नेहतराव, मुकूंद शिवाजी नेहतराव. (परचंडराव तक्षिमीतून) सुरेश केरु परचंडराव, महादेव लक्ष्मण परचंडराव. (संगितराव तक्षिमीतून) उमेश प्रकाश संगितराव, मारुती सुधाकर संगितराव. (कांबळे झुंजारराव तक्षिमीतून) दत्तात्रय देवाप्पा कांबळे बिनविरोध निवडून आले.

हा केवळ अधटराव पॅनेलचा विजय नसून दहा वर्षात आम्ही पुंडलिक देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून केलेल्या विविध विकासात्मक तसेच समाजउपयोगी कामांची मतदारांनी आम्हाला दिलेली ही पावती आहे.
**- प्रभाकर अधटराव,** पॅंनेल प्रमुख तथा माजी नगराध्यक्ष



# सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये बुद्ध जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १२ मे-**

संपूर्ण विश्वाला शांतीचा, अहिंसेचा, करूणेचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्धांची जयंती सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, (ता.सांगोला) येथे साजरी करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. म नोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

# ना-दुरूस्त एसटी बसमधून १८० लिटर डिझेलची चोरी

**सोलापूर** - अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर येथे रस्त्याच्या कडेला लावलेल्या ना-दुरुस्त एस टी बसच्या डिझेल टाकीतून चोरट्याने १६ हजार ४७० रुपये किंमतीचे १८० लिटर डिझेल चोरून नेले. याबाबत वैजिनाथ बिभिषन शिंदे (वय ४०, रा. हांबेवाडी, पो. करंजे, ता. करमाळा, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. ११ मे रोजी पहाटे एकच्या सुमारास सुमारास मल्लिकार्जुन नगर येथे असलेल्या एमएच ४० वाय ५०३४ क्रम ांकाच्या एस टी बसच्या डिझेल टाकीतून चोरट्याने डिझेल चोरून नेले. म्हणून एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार उबाळे पुढील तपास करीत आहेत.



## १५ मे पासून बचेरी येथील महालक्ष्मी देवीची यात्रा; विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १२ मे-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील महालक्ष्मी देवीच्या यात्रेस १५ मे पासून सुरुवात होत आहे. यानिमीत्त यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये १५ मे रोजी सकाळी ७ वाजता दंडस्तानाचा कार्यक्रम, दुपारी ३ वाजता जंगी कुस्त्याचे आयोजन तर रात्री ८ वाजता पोतराजांच्या गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन, तर १६ मे रोजी सकाळी १० वाजता गझीढोल कार्यकमाचे आयोजन, रात्री ८.३० वाजता अहील्यादेवी होळकर चौकात मनोरंजनाचा कार्यक्रम तर १७ मे रोजी रात्री ७.३० वाजता देवीचा छबीना, डॉल्बी व फटाकयांची आतिषबाजी आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अनैतिक मानवी व्यापार गुन्हा प्रकरण; बार्शीत दोघांचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे-**

येथील बेकायदेशीर पद्धतीने कुंटणखाना चालवणाऱ्या लॉजवर सोलापूर येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने अचानक छापा टाकून कुंटणखाण्यातून सहा महिलांची सुटका केली. याप्रकरणी लॉज मालक व व्यवस्थापकावर बार्शी शहर पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अटक असलेले उदय लॉजचा मालक आनंद माने व मॅनेजर सुनिल माने यांना बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन मंजूर झाला.

मसपोफौ सविता सुर कोकणे नेमणूक अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, सोलापूर ग्रामीण यांनी याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की, पेट्रोलिंग करीत बार्शी तालुक्यात आलो असता, पोलीस निरीक्षक रणजीत माने यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दत्त बोळ, बार्शी येथील उदय लॉज येथे लॉजचा मालक हा महिलांना डांबून ठेवून त्यांचेकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करवुन घेत आहेत. अशी बातमी मिळाल्याने बातमीच्या अनुषंगाने त्याठिकाणी जावून छापा टाकुन कारवाई करणेकामी पोलीस निरीक्षक माने यांनी बनावट गि-हाईक तयार करुन, दत्त बोळ येथील उदय लॉज या ठिकाणी लॉजचा मालक हा वेश्याव्यवसाय करीता महिला आणून त्यांना दाबून ठेवून त्यांच्याकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. असा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी लॉज मालक व मॅनेजर यांना अटक करुन त्यांचेवर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा कलमान्वये गुन्हा दाखल झाला.

यातील आरोपींनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला. यात सरकारी वकील आणि तपास अधिकाऱ्यांनी आरोपींना जामीन देऊ नये, अशी मागणी केली. न्यायालयाने अर्जदार यांचे विधीज्ञ यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एल. एस. चव्हाण यांनी अर्जदार आरोपींचा जमीन अर्ज मंजूर केला. अर्जदार आरोपींच्यावतीने ॲड. प्रशांत एडके, ॲड. समाधान सुरवसे व ॲड. आकाश मस्के यांनी काम पाहिले.

# मंद्रूपच्या तलावात कालव्याचे पाणी सोडण्याची मागणी

## पाणी सोडल्यास शेकडो एकर क्षेत्र ओलिताखाली येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

मंद्रूप येथील गावतलावात येणाऱ्या पाण्याच्या मार्गात अडथळे तयार झाल्याने व ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे घरांचे बांधकाम करण्यात आल्याने तलावात येणारा पाण्याचा विसर्ग बंद झाला आहे. त्यामुळे गावतलाव कोरडा पडला असून तलावात काटेरी झुडुपे वाढली आहेत. त्यामुळे नागरीकांचे अतिक्रमण होत आहे. म्हणून गावतलावात पाणी सोडल्यास हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली येऊन शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

गावतलावसचे क्षेत्र व्यापक असल्याने पाणी साठवण क्षमता अधिक आहे. पूर्वी या तलावात लोकसेवा शाळा, जिल्हा परिषद शाळेपासून मोठया प्रमाणात पाणी येत होते. कालांतराने सोइच्या राजकारणाम ुळे सर्वपक्षीय नेत्यांनी तलावात पाणी येणाऱ्या मार्गावरील अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केल्याने पाण्याचा विसर्ग बंद झाले.

शिवाय दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत असताना त्याकडे गांभीर्याने पाहीले जात नसल्याने तलाव कोरडा पडला आहे. तलावात काटेरी झुडुपे वाढल्याने तलावाची दुर्दशा झाली आहे. तलावापासून कॅनॉल एक किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे कॅनॉलच्या पाण्यासाठी चर करून पाणी सोडल्यास बागायत क्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे. या तलावातील पाणी साठवणमुळे हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली होता. सध्या तलावात पाणी नसल्याने व अवकाळी पावसामुळे शेती संकटात आली आहे. म्हणून गावतलावात कॅनॉलचे पाणी सोडण्याची मागणी करण्यात येत आहे. तसेच पावसाळ्यातील पाणी तलावात जाण्यासाठी अडथळे व अतिक्रमण काढण्याची मागणी करण्यात येत आहे.



**पाणी मार्गावरील अडथळे काढावे**



गावतलावात पाणी येण्यासाठी पाणी मार्गावरील अडथळे काढल्यास पावसाचे पाणी येण्यास मदत होणार आहे. संजय नगर, सेवालाल नगर, विठाइ नगर येथील रस्त्याशेजारील अतिक्रमण काढल्यास पावसाळ्यात पाणी साठवण अधिक होणार आहे. म्हणून ग्रामपंचायत व शेतकऱ्यांनी पाणी मार्गावरील अडथळे काढावे.
**- राजकुमार अतार, शेतकरी मंद्रूप**

**शेती वाचविण्यासाठी गावतलावात पाणी सोडा**



गावतलावात पाणी सोडल्यास हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. तलावात पाणी असल्यास परीसरातील विहीर व बोअरच्या पाणी पातळीत वाढ होण्यास मदत होते. दहा वर्षापासून तलावात पाणी नसल्याने परीसरातील शेती व्यवसाय संकटात आली आहे. त्यामुळे शेती व्यवसाय वाचविण्यसाठी व शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गावतलावात पाणी सोडण्यात यावे.
**- गुरूनाथ जोडमोटे (इंजिनिअर), शेतकरी मंद्रूप**

## महत्वाचे...



### विंचूर जि.प. शाळेत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर

**दक्षिण सोलापूर, दि. १२ मे-**

जिल्हा परीषद प्राथमिक शाळा विंचूर येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी विंचूर गावचे सरपंच बाळासाहेब पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून विस्तारअधिकारी गुरूबाळा सनके, आयुब कलबुर्गी साहेब, रमेश घंटेनवरू ,संतोष मुरूमकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे व खो-खो मैदानाचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी राज्यस्तरीय खेळाडू समर्थ सोनगी, जैद शेख व शिबीरास सहकार्य करणारे पालक, महादेव साबळे, शांतप्पा कोळी,दिपक घाडगे यांचाही सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमास मुख्याध्यापक बसवराज बनपुरे, पंचाक्षरी प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक लिगाडे, पोलिस पाटील, मल्लिकार्जुन झाडबुके, प्रभाकर बाराजदार, सुरेश मलाबदे, महादेव कोळी, दिपक घाडगे, यल्लप्पा कोळी, विजयकुमार बिराजदार, महेश माने, विकास पवार, भिमाशंकर सोनगी, सुरेश म्हेत्रे, गिरीष साबळे, अप्पासाहेब कोटे, अप्पासाहेब कोष्टी, नागेश फुलारी, खंडप्पा पाटील दशरथ कोळी, अशोक साळुंके, सुनंदा जमादार, मीना नळे उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षक तुळशीराम शेतसंदी यांनी केले व आभार शांतप्पा कोळी यांनी मानले.



### हर्षल बागल यांना छत्रपती संभाजी महाराज युवारत्न पुरस्कार

**कुर्डुवाडी, दि. १२ मे-**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदचा २०२५चा राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार व्याख्यान माध्यमातून प्रबोधन क्षेत्रात दिलेल्या योगदानबद्दल कराड येथे व्याख्याते हर्षल बागल यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सिक्कीमचे मा. राज्यपाल तसेच मा खासदार श्रीनिवास पाटील, राज्याचे माजी पाणी पुरवठा मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, लोकशाही वृत्तवाहिनीचे संपादक विशाल पाटील, अ भा मराठी साहित्य परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, साहित्यिक शुभांगी काळभोर, बेळगावचे रवींद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये या पुरस्काराचे वितरण यशवंतराव चव्हाण स्मृती सदन सभागृहमध्ये करण्यात आले.

### श्रीनाथ विद्यालय व ज्युनिअर महाविद्यालयाचा बारावीचा निकाल १०० टक्के


**पिलीव, दि. १२ मे -**



माळशिरस तालुक्यातील यशोदीप शिक्षण संस्थेच्या तरंगफळ येथील श्रीनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स तरंगफळ यांनी स्थापनेपासून इयत्ता बारावीच्या निकालाची १०० टक्केची परंपरा याही वर्षी कायम स्वरुपी राखली आहे. सन २०२४-२५ मध्ये झालेल्या एच एस सी परीक्षेत श्रीनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन करीत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यामध्ये अविनाश शेंडगे ८१:००(प्रथम), सृष्टी कोळेकर ७८:६७ (द्वितीय), प्रणव सुरवसे ७६:०० (तृतीय) अशा प्रकारचे गुण मिळवून यशाचे शिखर गाठले आहे व विद्यालयाची म ान उंचावली आहे. यासाठी प्राचार्य संतोषकुमार आबासाहेब शेंडगे, मार्गदर्शक शिक्षिका अश्विनी शेंडगे तसेच सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल माजी शिक्षण संचालक नामदेवराव जरग, तरंगफळचे सरपंच, उपसरपंच त्याचप्रमाणे या भागातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

### उडगीत बिरलिंगेश्वर महाराज मूर्तीप्रतिष्ठापनेसह कळसारोहण

**अक्कलकोट दि.१२ मे-**



उडगी (ता. अक्कलकोट) येथे श्री. बिरलिंगेश्वर मंदिराचे मूर्तीप्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा १३ व १४ मे यादरम्यान संपन्न होणार आहे. त्यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १३ मे रोजी अक्कलकोट, हन्नूर, चिक्कळी, उडगी येथील पाच पालख्यांचे आगमन होणार आहे. बुधवार १४ मे रोजी वेदमूर्ती गुडय्या स्वामी, वेदमूर्ती इरण्णा नंदीकोले शास्त्री यांच्या हस्ते पहाटे रुद्राभिषेक, होमहवन, श्री. बिरलिंगेश्वर गदगीय मूर्ती प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. सकाळी आठ वाजता गावाच्या मुख्य रस्त्यावरून कुंभमेळसह श्री. ब्रह्मलिंगेश्वर सहवाद्य संघ जकापूर यांच्या वतीने सर्व पालख्यांची मिरवणूक निघणार आहे. श्री. ष. ब्र. शिवशंकर महास्वामीजी आणि श्री. ष. जय गुरुशांतलिंग शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते श्री. बिरलेंगेश्वर मंदिराचे कळसारोहण सोहळा पार पडणार आहे. भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली आहे.सायंकाळी ९ वाजता श्री. आमोघसिद्धेश्वर ढोळ्ळीन संघ कुरघोट आणि श्री. महालिंगराया ढोळ्ळीन संघ शिवणागी यांच्या कन्नड धनगरी ओव्यांचे जुगलबंदी काव्यमैफल रंगणार आहे. या दर्शनाचा प्रसादाचा लाभ घ्यावा जीवन कृतार्थ करावे, असे आहावन आयोजकासह उमेश घोडके यांनी केले आहे. या सोहळ्याला आ. सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिद्धराम म्हेत्रे, आ. उत्तमराव जानकर, सुनील बंडगर, सोमनाथ वाघमोडे, रमेश गाडेकर, रुद्रय्या स्वामी, गुडय्या स्वामी, बरगले पुजारी, यल्लप्पा पुजारी, सदाशिव पुजारी, रायप्पा पुजारी, देवू पुजार, यल्लालिंग पुजारी लकप्पा पुजारी यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक उपस्थित राहणार आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## निमगाव येथे आजपासून राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १२ मे-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व स्वराज्य कबड्डी संघ निमगाव (ता.माळशिरस) यांच्या संयुक्त विद्यमाने स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार दि.१३ व १४ मे रोजी निमगाव येथे ६५ किलो वजन गटातील मॅटवरील राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित केली असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नागनाथ मगर व गोरख पवार यांनी दिली.

यावेळी माऊली गाडे, सचिन कदम, दादा पवार, सिताराम पवार, भाऊसाहेब मगर उपस्थित होते. स्पर्धेचे उद्घाटन शिवप्रसाद उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष शरद मोरे, शिवसेनेचे तालुकाध्यक्ष संतोष राऊत, मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक धनाजी माने साखळकर, शिवप्रसाद उद्योग समूहाचे तेजस मोरे आदी मान्यवरांच्या हस्ते मारुती मंदिरासमोर या स्पर्धा १३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू होणार आहेत स्पर्धेसाठी नोंदणी फी ७०० रुपये राहील स्पर्धेतील सर्व सामने मॅटवर होणार असून हे सामने क्लब बॉईज किंवा गाव वाईज खेळविले जातील खेळाडूला दुखापत झाल्यास आयोजक जबाबदार राहणार नाहीत. सामन्यात फेरबदल करण्याचा अधिकार नियोजन समितीकडे राहील. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक २० हजार रुपये, द्वितीय १५ हजार रुपये तृतीय व चतुर्थ क्रमांकास सात हजार व प्रत्येकी सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त उत्कृष्ट रायडर, उत्कृष्ट डिफेंडर व अष्टपैलू खेळाडू म्हणून बक्षिसे देण्यात येणार आहेत.

## महत्वाचे...



### वैराग येथील कर्करोग शिबिरात १६० जणांची तपासणी

**वैराग, दि. १२ मे-**

असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत वैराग प्राथमिक आरोग्य केंद्रात सोमवारी कर्करोग जनजागृती मोहीम शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये सुमारे १६० लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. शिबिराचे उद्घाटन तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिता बांगर यांच्या उपस्थितीत प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. वैराग येथे प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजीत कर्करोग जनजागृती शिबिरात अत्याधुनिक सर्व सोयींनी सुसज्ज कॅन्सर व्हॅन उपलब्ध करण्यात आली होती. शिबिरामध्ये स्त्री रोग तज्ञ डॉ. राऊत यांनी स्तन कर्करोग तसेच गर्भाशय कर्करोग याविषयी तपासणी व मार्गदर्शन केले. दंतरोग चिकित्सक डॉ. सांगवीकर यांनी मुखाच्या कर्करोगा संदर्भात तपासणी व मार्गदर्शन केले. शिबीरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योती तीर्थ, डॉ. एकनाथ निरगुडे यांनी परिश्रम घेतले. वैराग भागातील उपळे दुमाला, गौडगाव, तडवळे, पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत असणाऱ्या रुग्णांना १०२ ॲम्बुलन्सद्वारे वैराग येथील शिबीरात ने आण करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकांत कुलकर्णी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिता बांगर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शितल बोपलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर घेण्यात आले.




### भगवान बुध्दानी विश्वाला शांतीचा संदेश दिला : डॉ. बिराजदार

**सोलापूर, दि. १२ मे-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द.सोलापूर) जीवनातील आसक्तीत दु :खाचे मूळ आहे.याची जाणीव झाली की, मनातील स्वार्थीपणा नाहीसा होण्यास मदत होते. स्वार्थ कमी झाल्यास अहंकार कमी होतो. माणूस समाजशील बनतो आणि त्यातून करुणा निर्माण होते. करूणेतून शांती निर्माण होते. हाच विचार भगवान गौतम बुद्धानी दिला. तोच विचार जगाला तारणार असल्याचे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी श्री रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय व रामलिंगेश्वर समाज सेवा मंडळ आयोजित बुद्ध पौर्णिमा कार्यक्रमात केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भगवान गौतम बुध्दाच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक आशाताई बाळीकाई यांनी केले.सूत्रसंचालन व आभार महेश पट्टणशेट्टी यांनी मानले. कार्यक्रमास शारदादेवी बिराजदार, शिवराज बिराजदार, मीनाक्षी शेळगी, सुनीता पाटील, मळसिद्ध केंगार, संकेत बाळीकाई, ओम बाळीकाई उपस्थित होते.



### कोडोली येथील काव्यसंमेलनात सांगोल्याच्या कवयित्रींचे सादरीकरण

**सांगोला, दि.१२ मे-**

दरवर्षीप्रमाणे गुजरात राज्यातील अहमदाबाद येथील पलपब प्रकाशन या संस्थेच्या कार्यकारी अधिकारी लीना पाटील यांनी कोडोली, जि.सातारा येथील स्वराज कॉन्फरन्स हॉलमध्ये राज्यस्तरीय साहित्य संमेलन आयोजित केले होते. याचे उद्घाटन सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई यांचे हस्ते व कोरेगावचे आ. महेश शिंदे, कराड उत्तरचे आ. मनोज घोरपडे यांचे उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी रहिमतपूरचे ज्येष्ठ लेखक अनिल बोधे, सुरेश शिंगटे, विजय कदम, रेखा दिक्षित, प्रदीप कांबळे, अनिता नलगे, गणपतराव कणसे, विजय वेटम, प्रतिक मतकर उपस्थित होते. साहित्य संमेलनातील काव्यसंमेलनात सांगोला येथील मनिषा ठोंबरे, शैलजा गुळमिरे, विद्या शिर्के, प्रज्ञा देशपांडे यांनी आपल्या कविता सादर करत उपस्थित रसिक श्रोत्याकडून दाद मिळवली. ग्रामीण भागातील महिलांनी काव्य संमेलनात प्रतिनिधित्व केल्याबद्दल त्यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी विविध पुस्तकाचे प्रकाशन, मान्यवर साहित्यिकाचे मार्गदर्शन व नवोदित कवीचे काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

## पौर्णिमेला लाखो भक्तांनी घेतला अन्नछत्रात महाप्रसाद

### सलग सुट्यांमुळे अक्कलकोटमध्ये गर्दी; अन्नछत्र मंडळाचे स्तुत्य नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**

पौर्णिमा व सलग सुट्ट्यां मुळे अक्कलकोट येथे मोठी गर्दी झाली होती. या गर्दीमुळे भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी अन्नछत्र मंडळ न्यासाने महाप्रसादाची वेळ वाढवली अन लाखो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा..श्री स्वामी समर्थ महाराज की जय...श्री अन्नपूर्णा माता की जय..च्या जयघोषात येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सोमवारी पौर्णिमेनिमित्त महाप्रसादाची उत्कृष्ठ व्यवस्था झाल्याने भक्तांनी समाधान व्यक्त केले. अन्नछत्र मंडळ ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून महाप्रसादाची व्यवस्था केली होती. मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते विधिवत पूजा, धार्मिक कार्यक्रम भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी भक्तांच्या उपस्थितीत श्रींना नैवेद्य दाखविण्यात आला. स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री शमी-विघ्नेह गणेश मंदिर, ब्रह्मांडनायक उभी स्वामींची मूर्ती, नियोजित महाप्रसादगृह इमारत, सध्याचे अद्यावत तात्पुरते महाप्रसादालय, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, कार्यरत यात्री निवास-१, यात्रीभुवन-२, अतिथी गृह, आऊटडोअर व इनडोअर जीम, प्रशस्त वाहनतळ, टेकडीवरील श्री समर्थ वाटिका, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशमन, रुग्णवाहिका, आश्रयदाते कक्ष हे सर्व न्यासाचे विविध उपक्रम भक्तांच्या सेवेर्थ सुरु केलेल्या विविध उपक्रम व व्यवस्थेचे स्वागत करुन न्यासाचे कौतुक केले. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, सौरभ मोरे, मनोज निकम, सनी सोनटक्के, निखील पाटील, अतिश पवार, गोटू माने, योगेश कटारे, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, संजय गोंडाळ, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, पिंटू हळ्ळुरे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, कल्याण देशमुख, गोविंदराव शिंदे, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

> अक्कलकोट येथील अन्नछत्र मंडळ न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ठ नियोजन झाले होते. त्यांचे व्यवस्थापन पाहून आम्हा सर्व स्वामीभक्तांना समाधान वाटले.
> **- सुशांत निकम, वेंगुर्ले (कोकण).**

## 'अन्नछत्र'कडून कुस्तीगीरांना कीटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**

येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष तसेच नरेश श्रीमंत विजयसिंहराजे भोसले यांचे चिरंजीव जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या कुशल नेतृत्वाखालील संकल्पनेतून तालुक्यातील गरीब कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराक कीट वाटपाची योजना सुरू आहे. त्याअंतर्गत न्यासाकडून एप्रिल महिन्यात ७७ कीटचे वाटप रविवारी करण्यात आले.



तालुक्यातील जे पैलवान कुस्ती सरावासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, धाराशिव, संभाजीनगर आदि ठिकाणी आहेत अशा कुस्तीगरांसाठी न्यासाकडून मकर संक्रांतीपासून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यावेळी ५० जणांना किट देण्यात आले होते. गेली ३८ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे. अन्नछत्र मंडळात दररोज लाखो भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. याबरोबरच समर्थ महाप्रसाद सेवेबरोबरच आता तालुक्यातील गोरगरीब कुस्तीगीरांसाठी न्यासाकडून प्रसाद रुपी खुराकाचे वाटप प्रती महिन्यास करण्यात येत आहे. या कीटमध्ये कुस्तीगीरांना आवश्यक तूप, बदाम, खारीक, बडीसोप, खसखस, इलायची, धने आदि पदार्थांचा समावेश आहे. तालुक्यातील कुस्तीगीर अन्य ठिकाणी कुस्तीचा सराव करीत असले तरी त्यांची गरज ओळखून ७७ पैलवानांची निवड करण्यात आली. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै. महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी न्यासाचे सचिव शाम राव मोरे, मनोज निकम, अरविंद शिंदे, संदीप श्रीरामवार नांदेड, बाळासाहेब पोळ, निखिल पाटील, गोटू माने, प्रवीण घाटगे, एस.के. स्वामी, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, समर्थ घाटगे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, उपस्थित होते.

## बोरगावात शेळीला एकावेळी झाले चार करडू

### शेळीपालनाचा शेतीपूरक उद्योग फायद्याचा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १२ मे-**

बोरगांव(दे) (ता. अक्कलकोट) येथील प्रगतशील शेतकरी आनंदराव भोसले यांच्या शेळीने एकाच वेळी ४ करडूंना जन्म दिल्याने परिसरात कुतुहलाचा विषय झाला आहे. शेळीपालनाचा शेतीपूरक उद्योग फायद्याचा ठरत आहे. श्री. भोसले यांनी शेतीवरच अवलंबून न राहता जोड व्यवसायाकडे लक्ष दिले आहे. श्री. भोसले यांच्याकडे सध्या ३० शेळ्या व ७ बोकड आहेत. त्यातील



एका शेळीने ४ करडूनां जन्म दिला आहे. त्यांना पाहण्यासाठी आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी भोसले यांच्या फार्महाऊसला गर्दी केली होती. यावेळी शेतकऱ्यांनी जोड व्यवसायाला महत्व देण्याचे आवाहन श्री. भोसले यांनी केले.

## सांगोल्यात मोफत आरोग्य तपासणीसह शस्त्रक्रियेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१२ मे-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या एकनाथ हिरक आरोग्य वर्षानिमित्त वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना मदत कक्ष, खा.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, आरोग्यदुत फाऊंडेशन व खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने येथील कडलास रोडवरील खंडागळे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये बुधवार दि.२८ मे, शनिवार दि.७ जून व बुधवार दि.९ जुलै रोजी मोफत सर्व रोग निदान व शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे, अशी माहिती डॉ. परेश खंडागळे व डॉ.स्वाती खंडागळे यांनी दिली.

डॉ. परेश व डॉ. स्वाती खंडागळे यांचा वाढदिवस व लग्न वाढदिवसानिमित्त या शिबिराचे आयोजन केले आहे.

> उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मध्यंतरी सांगोल्यामध्ये शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची व खा.श्रीकांत शिंदे फाउंडेशनची स्थापना करण्याचे घोषित केले होते. लवकरच सांगोला शहरांमध्ये वैद्यकीय मदत कक्षाचे कार्यालय सुरू करण्यात येणार असून २४ तास रुग्णांच्या सेवेसाठी हा मदत कक्ष उपलब्ध असणार आहे. - सतीश सावंत, पंढरपूर विभाग प्रमुख, वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना मदत कक्ष.

यावेळी सिजिरियन, प्रसुती, फ्रॅक्चरच्या शस्त्रक्रिया, ॲपेंडिक्स, हर्निया, फिशर, गर्भाशय पिशवी काढणे, मुतखडा, प्रोस्टेट, दुर्बिणीद्वारे काही शस्त्रक्रिया मोफत केल्या जाणार आहेत.

## 'शहाजी' चे विद्यार्थी तब्बल २९ वर्षानंतर एकत्र

### जुन्या आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मे-**

अक्कलकोट येथील मराठा मंदिर मुंबई संचलित श्री शहाजी हायस्कूलच्या १९९६-९७ च्या दहावी ब वर्गातील विद्यार्थी तब्बल २९ वर्षानंतर एकत्र आले. यावेळी झालेल्या स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा देत गाण्याच्या भेंड्या अन संगीत खुर्चीचा खेळ रंगला होता.




शहाजी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित या कार्यक्रमास सन १९९६-९७ चे १० ब चे शिक्षक, माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्याध्यापक सुरेश फडतरे यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे स्वागत गुलाब पुष्प देऊन झाले. सर्व शिक्षक व शिक्षिकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक तारापुरे, ए. एम. घाडगे, घाडगे, बनसोडे, एम. बी. पाटील, चाचा बिराजदार, शहाबादे, कडगंची, भडकुंबे, बोधले, सुमती फडतरे उपस्थित होते. शिक्षकांनी माजी विद्यार्थी विद्यार्थिनीला पुढील भविष्याच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देत जुन्या आठवणींना उजाळा दिला. श्री. फडतरे यांनी मराठी कविता कणा याचे वाचन केले. माजी विद्यार्थी व त्याच शाळेतील शिक्षक अरविंद शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. तब्बल २९ वर्षानंतर एकत्र येऊन सर्वांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा देत शिक्षकाप्रती ऋण व्यक्त केले. स्नेह मेळाव्यात माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी गाण्याच्या भेंड्या, संगीत खुर्ची व इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमासह स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. माजी विद्यार्थी समद अत्तार यांनी देशभक्ती व मैत्रीपर गीत सादर केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी व सोलापूर विद्यापीठात कार्यरत विवेक कुसेकर, महेश धायगुडे, सैपन सुतार, सरताज मुजावर, अजय मोरे, सुनील प्रचंडे, सिद्धाराम जोडमोटे, सागर कासार, भीमाशंकर भास्कर, सुनील कटकधोंड, मनोहर देसाई, राघवेंद्र मठपती, सिद्धेश्वर विभुते, बसवराज कोरे, किरण शिंदे, स्वप्निल पाटील, सुधाकर कोणापुरे, मजहर तांबोळी, सादिक पाशा बागवान, सुनील चिक्कली, शंकर डोके, प्रसाद आलदी, गुरुदेवी बालकुंदी, नीता बाबलादी, सुप्रिया शहा, कृपाली कुलकर्णी, रुपाली पाटील, वैशाली जाधव, विना महिंद्रकर, उज्वला राठोड, रेखा चिक्कळी, वैशाली गोंडाळ, जयश्री कतनळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन गुरुदेवी बालकुंदी यांनी केले असून आभार रूपाली पाटील यांनी मानले.

## बार्शीतील अखिल भारतीय बौद्धधम्म परिषदेची सांगता

### डॉ. आंबेडकरांच्या 'प्रेरणाभूमी'तून चळवळीला नवा वेग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ मे-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि.१० मे १९२४ रोजी बार्शी येथे बहिष्कृत परिषदेत ऐतिहासिक भाषण दिले. या घटनेच्या शताब्दीनिमित्त दुसरी अखिल भारतीय बौद्धधम्म परिषद बार्शीत यशस्वीरित्या पार पडली. नालंदा स्तूप बुद्धीजम ॲण्ड रिसर्च ट्रस्ट व भारतीय बौद्ध महासभा (बार्शी शहर-तालुका) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेमुळे बार्शी हे 'धम्म चळवळीचे प्रेरणास्थान' म्हणून अधोरेखित झाले आहे.



यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या परिषदेत देशभरातील विविध बुद्ध विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते व बौद्ध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेत अनेक विचारप्रवर्तक भाषणे झाली. यामधून नवयान बौद्ध चळवळीच्या दिशा, समस्यांचा वेध व उपाय यांवर विस्तृत चर्चा झाली. यावेळी सत्यजित जानराव (अध्यक्ष, बौद्ध महासभा ता. बार्शी), डॉ. सुरेश वाघमारे (साहित्यिक व अभ्यासक, लातूर), डॉ. संघमित्रा खोरे (भारतीय समता संघ, पुणे), प्रा. डॉ. हर्ष जगझाप (सिनेट सदस्य, पुणे विद्यापीठ), एम.डी. सरवदे (राष्ट्रीय सचिव, भारतीय बौद्ध महासभा) यांची भाषणे झाली. धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना सत्यजित जानराव म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'नवयान' ही बौद्ध धर्माची नवी दृष्टी दिली. त्यांनी सांगितलेला धम्म हा प्रगत समाजरचनेचा मार्ग आहे. त्यांनी खऱ्या अर्थाने बौद्ध धम्माचे 'सामाजिक पुनर्जन्म' घडवले. बुद्ध, धम्म आणि संघ या त्रिरत्नांचा अर्थ आपण नव्यानं समजून घेतला पाहिजे. बुद्ध धम्म केवळ शांतीचा मार्ग नाही, तो अन्यायाविरुद्ध उठून उभं राहण्याची प्रेरणाही देतो.

धम्म परिषदेत चंद्रकांत लोंढे, पंडित राजगुरू यांनी सादर केलेल्या बुद्ध-भीम गीतांनी सभागृह भारावून गेले. ॲड. विवेक गजशिव, विश्वास वाघमारे, रमेश पालके, वंदना वाघमारे, सचिन पालके, कल्पना तुपीरे, समता सैनिक दल बार्शी यांचे आयोजनात मोलाचे योगदान होते.

#### परिषदेतील ठराव

- बार्शीला 'प्रेरणाभूमी' घोषित करण्याची शिफारस शासनाकडे करण्यात यावी.
- महाबोधी विहार बार्शीचा ताबा तात्काळ बौद्ध समाजाकडे हस्तांतरित करण्यात यावा.
- बौद्ध वस्तीतील शैक्षणिक विकासासाठी नगरपरिषदेच्या वतीने विशेष निधी देण्यात यावा.
- गट नं. ९३१ वर मंजूर बुद्धविहाराचे काम त्वरीत सुरु करण्यात यावे.
- दरवर्षी १० मे रोजी 'धम्म दिवस' साजरा करुन राष्ट्रीय स्तरावरील परिषद बार्शीत घेण्यात यावी.

#### डॉ. भिमराव आंबेडकर यांचा संदेश

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांनी परिषदेस दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. बार्शी नगरपरिषदेकडून मला दिलेले मानपत्र मी स्वीकारतो. लवकरच बार्शीस प्रत्यक्ष भेट देईन, असे त्यांनी नमूद केले.